01-06-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A 1
VTG/ MAP/ SBT/ 13:00

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

अधिवेशनाचा शुभारंभ " वंदे मातरम् " या गीताच्या समूह गायनाने झाला .

या नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/SBT/MAP. श्री. गायकवाड नंतर --- 13:05

म.वि.प. नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाबाबत.

**सभापती** : मी सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की, आज या अधिवेशनाचा पहिला दिवस आहे आणि आजच्या या पहिल्याच दिवशी माझ्याकडे आजचा प्रश्नोत्तराचा तास तहकूब करून तातडीने अत्यंत महत्त्वाच्या विषयावर चर्चा घडवून आणण्यासाठी म्हणून महाराष्ट्र विधान परिषद नियम 289 अन्वये एकूण तीन सूचना आलेल्या आहेत. त्यापैकी पहिली सूचना सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी दिली असून दुसरी सूचना सन्माननीय सदस्या डॉ.श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी 21 मे, 2009 रोजी गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा भागामध्ये नक्षलवाद्यांनी 16 पोलीसांची क्रूरतेने केलेली हत्या या विषयी दिली आहे. तसेच तिसरी सूचना सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी दिली आहे. मी या सन्माननीय सदस्यांना विनंती करीन की, त्यांनी दिलेल्या सूचनेला मी परवानगी का द्यावी या विषयी थोडक्यात, एक मिनिटामध्ये आपले म्हणणे मांडावे. तरी पहिल्या प्रथम सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी त्यांचे म्हणणे मांडण्यास परवानगी देतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या सुवर्णजयंती वर्षामध्ये महाराष्ट्र शासनाच्या कायद्याचे अगदी दिवसा ढवळ्या कशा प्रकारे धिंदवडे निघतील अशी घटना 21 मे 2009 रोजी गडचिरोली जिल्ह्यात घडली आहे आणि त्यामध्ये नक्षलवादी अतिरेक्यांनी पाच महिलांसह एकंदर 16 पोलिसांना अत्यंत क्रूरपणे ठार मारल्याची दुर्दैवी घटना घडलेली आहे. सभापती महोदय, त्या अगोदर तीन महिन्यापूर्वी अशीच एक घटना त्या भागात घडली होती आणि त्यात तीन पोलीस अधिकारी मारले गेले होते. त्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी या महाराष्ट्राला आश्वासित केले होते की, या घटनेची गंभीर दखल घेऊन नक्षलवादी चळवळीतील अतिरेक्यांचा तातडीने बंदोबस्त करून अशा घटना यापुढे पुन्हा घडणार नाहीत अशी कारवाई आम्ही करू. परंतु महाराष्ट्र शासनाला, माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या कोणत्याही इशाऱ्याला न जुमानता दिवसा ढवळ्या नक्षलवाद्यांनी मोठ्या संख्येने येऊन महिला पोलीस कर्मचाऱ्यांसह 16 च्या संख्येने पोलीस कर्मचारी व अधिकारी यांना ठार मारले आणि पोलिसांच्या ताब्यात असलेला शस्त्रसाठा लुटून न्यावा

..... बी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

असा भयानक थयथयाट सुरू केलेला आहे. आता अशा प्रकारे पोलिसांनाच मारले जाते आहे तर मग तेथील आदिवासी जनतेने काय करावे अशी परिस्थिती त्या भागात निर्माण झाली आहे. सभापती महोदय, महाराष्ट्रात ही अत्यंत गंभीर, भीषण अशी घटना घडलेलील आहे आणि या सभागृहाच्या माध्यमातून सरकारचे त्याकडे लक्ष वेधून सरकार या बाबतीत जनतेला, पोलिसांना काय सांगू इच्छिते आणि कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत तसेच नक्षलवाद्यांच्या बाबतीत कोणती पावले आतापर्यंत उचलली आहेत आणि उचलणार आहे हे जनतेला कळावे म्हणून या ठिकाणी तातडीने याबाबत चर्चा आपण घडवून आणावी यासाठी मी ही नियम 289 अन्वये सूचना दिली आहे ती आपण मान्य करावी आणि ही चर्चा घडवून आणावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी आता आपले म्हणणे मांडावे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, 26 नोव्हेंबरच्या दहशतवादी हल्ल्यानंतर सबंध देशाला एक हादरा बसला होता. परंतु त्यानंतरचे जे वर्तन राज्य सरकारकडून आणि एकूण यंत्रणांकडून अपेक्षित होते ते न झाल्यामुळे त्याबद्दलचा प्रचंड असंतोष समाजामध्ये आहे. त्यामुळेच अत्यंत व्यथित अंत:करणाने मी ही सूचना येथे दिलेली आहे. या संदर्भात नेमलेल्या प्रधान समितीचा अहवाल शासनाकडे आलेला आहे अशी माहिती आम्हाला मिळाली आहे परंतु त्यात नेमके काय आहे हे समजलेले नाही. मात्र त्याबद्दल शहिदांच्या पत्नींनी जे प्रश्न निर्माण केले आहेत त्याबद्दलचे स्पष्टीकरण शासनाकडून येणे आवश्यक आहे असे मला वाटते. सभापती महोदय, 26 नोव्हेंबरची घटना घडल्यानंतर 1 डिसेंबरला त्या हल्ल्यामध्ये शहीद झालेल्यांना 25 लाख रूपये मदत देण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आणि त्याचबरोबर त्यांच्या पाल्यांचे पदव्युत्तर शिक्षण देखील संपूर्णत: मोफत करावयाचे असेही सांगितले असताना प्रत्यक्षात त्यानुसार कु.मानसी शिंदे यांनी अर्ज केला असता केवळ 12 वी पर्यंतचे शिक्षण मोफत देणार असे त्यांना सांगण्यात आले. सभापती महोदय, एक तर शासनाने अशी आश्वासने देऊ नयेत आणि दिली तर अशा प्रकारे फसवणूक करू नये. सभापती महोदय, त्यांना जी 25 लाख रूपयांची मदत देण्यात आली त्यात देखील ॲडजेस्टमेंट करण्यात आली आहे. त्याबाबत मी आपण जेव्हा या विषयी चर्चेला अनुमती द्याल तेव्हा अधिक तपशील देण्यास तयार आहे. तेव्हा अशा प्रकारे शहिदांच्या कुटुंबियांचा अपमान करणे हे महाराष्ट्राला शरमेची बाब आहे. त्यामुळे त्या कुटुंबियांच्या मनामध्ये ज्या भावना या संबंधात निर्माण

..... बी 3 ..



KBS/SBT/MAP. श्री. गायकवाड नंतर --- 13:05

श्री. कपिल पाटील ..

झाल्या त्या श्रीमती कामटे आणि श्रीमती करकरे यांनी व्यक्तदेखील केल्या आहेत. त्यांची दखल आपण घेतली पाहिजे म्हणून आजचा प्रश्नोत्तराचा तास तहकूब करून, आजचे कामकाज स्थगित करून या सबंध प्रश्नाची चर्चा येथे तातडीने व्हावी यासाठी मी नियम 289 खाली ही सूचना दिली आहे तिला अनुमती देऊन आपण या विषयी चर्चा घडवून आणावी अशी आपणास विनंती करतो.

( यानंतर श्री. सरफरे .... सी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आता आपले म्हणणे मांडावे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या राज्याचे गेल्या सहा महिन्यातील सातत्याने चित्र पाहिले तर शहिदांची संख्या वाढतांना आपणास दिसत आहे. या राज्यातील लोकांमध्ये असुरक्षितता वाढीला लागली आहे. आमच्या असुरक्षिततेच्या प्रश्नावर कोणत्या स्वरुपाचे ठोस उपाय हे शासन उचलणार आहे? याबाबत समाजातील प्रत्येक घटकाचे विशेषत: महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्हयातील सर्वसामान्य नागरिकाचे या अधिवेशनाकडे लक्ष लागले आहे. अशावेळी एका मागोमाग एक असे वेगवेगळया प्रकारचे निर्णय शासनाकडून घेतले जात आहेत. परंतु तरीसुध्दा सामान्य माणसांचे बळी जात आहेत. त्याबाबत ठोस उपाय योजना होऊन सरकारी कर्मचारी, पोलीस आणि जे शहीद झाले आहेत त्या सर्वांच्या कुटुंबियांचे नीतिधैर्य वाढावे आणि जनतेला न्याय मिळावा यासाठी सरकारने गांर्भीयाने या प्रश्नाकडे लक्ष देऊन ठोस उपाय योजना सुचविली पाहिजे यासाठी या सदनाने हा प्रस्ताव स्वीकारावा अशी मी विनंती करते.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाचा विषय हा आजच्या कामकाजामध्ये नसल्यामुळे तो तांत्रिकदृष्टया स्वीकारता येणार नाही. एकंदरीत जी घटना घडली आहे, तिच्या अनुषंगाने विचार केला तर सन्माननीय मुख्यमंत्री, सन्माननीय उप मुख्यमंत्री, सन्माननीय संसदीय कामकाज मंत्री हे मघाशी माझ्या दालनामध्ये मला भेटावयास आले त्यावेळी या विषयासंबंधी चर्चा झाली. त्यामुळे ही एक अत्यंत महत्वाची बाब या निमित्ताने सदनासमोर आली आहे. मी याबाबतीत असा निर्णय देतो की, सभागृहाच्या आजच्या कामकाजामध्ये शोकप्रस्तावा व्यतिरिक्त अन्य शासकीय कामकाज व प्रश्नोत्तरे यांचा समावेश आहे. यामध्ये प्रश्नोत्तरे ही कोणत्याही परिस्थिती झाली पाहिजेत, त्यांना प्राधान्य दिले पाहिजे. त्या अनुषंगाने आज प्रश्नोत्तरे होतील. त्यानंतर शोकप्रस्ताव घेण्यात येईल, व त्यानंतर शासकीय कामकाज होईल. हे कामकाज पूर्ण झाल्यानंतर आज जी अर्धा तास चर्चा घेण्यात येणार होती, ती आज होणार नाही. त्याऐवजी नियम 97 अन्वये सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी याठिकाणी मांडलेल्या विषयावर चर्चा घेण्याचे ठरविले आहे. ही चर्चा आजच पूर्ण होईल.

त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी दिनांक 26 नोव्हेंबर 2008 रोजी अतिरेक्यांच्या हल्ल्यामध्ये शहीद झालेल्या शूर जवानांच्या अनुषंगाने अत्यंत महत्वाचा विषय मांडला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MAP/ SBT/

**सभापती**...

आहे. त्या संदर्भात शासनाला जेवढे करणे शक्य आहे तेवढे शासनाने केले आहे. त्यामध्ये काही उणिवा राहिल्या आहेत असे त्यांचे प्रामाणिक मत आहे. त्याबाबत सुध्दा या सार्वभौम सभागृहामध्ये चर्चा होऊन योग्य न्याय मिळेल या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी त्या विषयासंबंधी लक्षवेधी सूचना द्यावी ती लक्षवेधी सूचना मी जरुर घेईन.

श्री,. कपिल पाटील : सभापती महोदय, आपण ही लक्षवेधी सूचना या आठवडयामध्ये घ्यावी.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना द्यावी, मी ती जरुर घेईन.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनव्दारे एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणू इच्छितो. ऑस्ट्रेलियामध्ये आपल्या देशातील विद्यार्थ्यांवर वांशिक हल्ले होत आहेत. त्यामध्ये महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थ्यांचा समावेश आहे. हे विद्यार्थी त्या देशामध्ये शिक्षणासाठी गेले आहेत त्यांना इकॉनॉमिक बिल्डर म्हटले जाते. गेल्या अकरा वर्षात 100 विद्यार्थ्यांवर हल्ले झाले आहेत. आणि गेल्या महिन्यात 25 हल्ले मराठी आणि मराठेतर विद्यार्थ्यांवर झाले आहेत. त्यामध्ये तीन विद्यार्थी अतिशय क्रिटीकल अवस्थेत आहेत. याकरिता या सभागृहाने त्याची नोंद घेणे आवश्यक आहे. मी आपल्या माध्यमातून याठिकाणी सांगू इच्छितो की, याबाबत केंद्र सरकारला सांगणे अत्यंत गरजेचे आहे. तेव्हा याबाबत त्वरित कारवाई करुन तेथील विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी आणि राहण्यासाठी उपयुक्त वातावरण तयार करणे आवश्यक आहे.

**सभापती** : या देशाचे सन्माननीय पंतप्रधान, सन्माननीय परराष्ट्रमंत्री आणि केंद्र शासनाने यापूर्वीच याबाबतीत लक्ष घातलेले आहे. ही वस्तुस्थिती असली तरी या सदनाच्या दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्यांच्या ज्या भावना आहेत त्या सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी केंद्र शासनाला कळवाव्यात. आणि ऑस्ट्रेलियामध्ये असणाऱ्या विद्यार्थ्यांचे यथायोग्य संरक्षण होईल याची काळजी घेण्यासाठी सांगण्यात यावे.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, होय.

----

(यानंतर सौ. रणदिवे)

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: प्रश्नोत्तरे

**ओरोस (जि.सिंधुदुर्ग) येथील १७ जलस्वराज्य कामे पुर्ण करण्याबाबत**

**(१) * ५१०४० श्रीमती अलका देसाई, श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, श्री सुभाष चव्हाण,श्री.सय्यद जामा, श्री.जैनुद्दीन जव्हेरी,श्री. चरणसिंग सप्रा :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)ओरोस (जि.सिंधुदुर्ग) येथील जागतिक बँकेच्या आर्थिक सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या १७ जलस्वराज्य प्रकल्पाची कामे अंतिम टप्प्यात असताना १४ प्रकल्पांतर्गत गावातील वीज महावितरण कंपनीकडे सुमारे रुपये ३ लाख निधी भरणा करुनही वीज पुरवठा करण्यास होणाऱ्या दिरंगाईमुळे योजना सुरु होण्यास अडचण निर्माण होत असल्याचे माहे मार्च,२००९ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पांचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार** :(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत एकूण २२१ ठिकाणी वीज पूरवठा करण्याचे प्रस्तावित होते.त्यापैकी सद्यस्थितीत १४१ ठिकाणी वीज पुरवठा प्राप्त झाला आहे. प्रलंबित ८० विद्युत जोडणी प्रस्तांवापैकी १५ ग्रामपंचायती मधील ३१ ठिकाणी वीज मंडळाकडून पोल उभारणी करणे, वीज पुरवठा देणे या सारखी कामे प्रगतीपथावर आहेत.उर्वरित ४९ ठिकाणी ग्रामस्तारावरुन पंपाचा चाचणी अहवाल न दिल्यामुळे वीज वितरण कंपनी कडून विद्युत कनेक्श्न मिळणे प्रलंबित आहे.

(२) या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प संचालक, जलस्वराज्य प्रकल्प कार्यालय, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी दिनांक ३० एप्रिल,२००९ रोजी वीज वितरण कंपनीतील अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेवून प्रलंबित वीज जोडण्याबाबत तात्काळ कार्यवही करणेचे संबंधितांना सूचना दिल्या आहेत. या बाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, ओरोस हे सिंधुदूर्ग जिल्ह्यातील एक गाव आहे आणि तेथे जागतिक बँकेच्या मदतीने जलस्वराज्य प्रकल्पांची कामे सुरु झालेली आहेत. परंतु ही कामे बरोबर होत नाहीत, पुरेशी होत नाहीत आणि त्यामुळे त्या गावातील लोकांना, अजुबाजूच्या परिसरातील लोकांना पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत आहे, हे खरे आहे काय ? याबाबतीत शासन काय करणार आहे ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांनी ओरोस येथील जलस्वराज्य प्रकल्पांच्या कामाबाबत प्रश्न विचारलेला आहे.याठिकाणी विभागाने जे उत्तर दिले आहे,त्या माध्यमातून सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये जलस्वराज्य प्रकल्पाअंतर्गत ज्या योजना करावयाच्या आहेत, त्या सर्वांच्या बाबतीत आम्ही उत्तर देण्याचा प्रयत्न प्रश्न क्र.1,2 व 3 च्या अनुषंगाने केलेला आहे. मी



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.51040 . . . .

श्री.अजित पवार . . . .

सदनाला एवढेच सांगू इच्छितो की, येथे विजेच्या कनेक्शनबाबत आणि पिण्याच्या पाण्यासंबंधात योजना सुरु करण्याबाबत काही गोष्टी सांगितल्या होत्या. आता सप्टेंबर 2009 पर्यंत ही कामे पूर्ण करुन, तेथे विजेचे कनेक्शन देण्याचा विभागाचा प्रयत्न आहे आणि तशा पध्दतीने पिण्याच्या पाण्याच्या योजनांची कामे देखील त्याठिकाणी केली जातील.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये जलस्वराज्य प्रकल्पांची जी कामे सुरु आहेत, त्या कामांच्या संदर्भात बऱ्याच तक्रारी आलेल्या आहेत. म्हणून माझा माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न आहे की, ज्या प्रकल्पांच्या कामाच्या बाबतीत तक्रारी आलेल्या आहेत, त्यांची चौकशी करण्यात येणार आहे काय ? तसेच माझा दुसरा प्रश्न असा आहे की, पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की,"प्रलंबित 80 विद्युत जोडणी प्रस्तावांपैकी 15 ग्रामपंचायती मधील 31 ठिकाणी वीज मंडळाकडून पोल उभारणी करणे,वीज पुरवठा देणे यासारखी कामे प्रगतीपथावर आहेत."अशा प्रकारची कार्यवाही सुरु आहे. माझ्या माहितीप्रमाणे हा प्रकल्प पाच वर्षापूर्वी सुरु झाला आणि त्याची मुदत आजच्या तारखेपर्यंत होती. आता ही मुदत वाढवून दिलेली आहे की नाही याची मला कल्पना नाही. माझा प्रश्न असा आहे की, हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी किती कालावधी देण्यात आला होता ? तसेच पोलची उभारणी करणे, वीज कनेक्शन देणे इ.कामे कधी पूर्ण होणार आहेत ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितले की,पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचा सप्टेंबर 2009 पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्याच्या बाबतीत प्रयत्न राहणार आहे. सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न विचारला की,तेथील इतर काही योजनांच्या बाबतीत तक्रारी असून, त्याबाबतीत चौकशी केली जाणार आहे काय ? सिंधुदूर्ग जिल्ह्यापुरते बोलावयाचे तर तेथे जवळपास 211 ठिकाणी विद्युत पुरवठा करण्याचा प्रस्ताव आहे.तसेच तेथे वेगवेगळया प्रकारच्या योजना सुरु आहेत. परंतु याठिकाणी जर सन्माननीय सदस्यांनी मला नावे सांगितली की, अमुक-अमुक योजनांच्या ठिकाणी गडबड किंवा भ्रष्टाचार सुरु आहे, चुकीची कामे सुरु आहेत, तर त्या बाबतीत निश्चितपणे चौकशी केली जाईल आणि त्यातील दोषी व्यक्तींवर कारवाई देखील करण्यात येईल. तसेच ही कामे योग्य दर्जाप्रमाणे कशा प्रकारे पूर्ण करता येतील यादृष्टीने विभागाचा प्रयत्न राहील.





ता.प्र.क्र.51040 . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्ह्यातील जलस्वराज्य प्रकल्प मुदतीमध्ये पूर्ण न झाल्यामुळे काही ग्रामपंचायतींच्या विरोधात गुन्हे दाखल करण्याचा निर्णय तेथील जिल्हा परिषदेने घेतलेला आहे काय ? तसे असेल तर त्यांच्यावर कारवाई होणार आहे काय ? तसेच ज्याठिकाणी कामामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे, अशा ठिकाणी तेथील ग्रामस्थ उपोषणासाठी बसलेले आहेत हे माननीय मंत्री महोदयांना माहिती आहे. त्याचबरोबर याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे "कुसूर"गावातील जो टी.एस.पी.होता, त्याने तेथे बेनामी ठेकेदाराच्या नावावर काम केले. स्वत:च तेथील मेझरमेंट घेतले, स्वत:च त्याचे मुल्यांकनही केले आणि मोठ्या प्रमाणात बिले घेतली आहेत, हे खरे आहे काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी "कुसूर" गावाचा उल्लेख केला. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, याची चौकशी करण्यात येईल. येथे सन्माननीय सदस्य श्री.उपरकर यांनी मुद्दा मांडला की, याठिकाणी बेकायदेशीर गोष्टी झालेल्या आहेत, चुका झाल्या आहेत, त्यामुळे याबाबत ॲक्शन घेतली पाहिजे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक 51040.......

श्री. अजित पवार.......

त्याची चौकशी करण्यात येईल. चौकशी करुन जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर रीतसर कारवाई करण्यात येईल. जिल्हा परिषद ही एक स्थानिक स्वराज संस्था आहे. जिल्हा परिषदेने त्या बद्दलचा निर्णय घेतलेला असेल तर ते त्यांच्या पातळीवर त्याबद्दलची कारवाई त्या ठिकाणी करतील राज्य सरकारच्या अखत्यारीमध्ये यासंदर्भातील ज्या बाबी असतील त्याबद्दलची काळजी राज्य सरकार घेईल. काही चुकीचे चाललेले असेल तर त्याबाबत कारवाई करण्यात येईल.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "एकूण 221 ठिकाणी वीज पुरवठा करण्याचे प्रस्तावित होते. त्यापैकी सद्य:स्थितीत 141 ठिकाणी वीज पुरवठा प्राप्त झाला आहे. प्रलंबित 80 विद्युत जोडणी प्रस्तावापैकी 15 ग्रामपंचायती मधील 31 ठिकाणी वीज मंडळाकडून पोल उभारणी करणे, वीज पुरवठा देणे या सारखी कामे प्रगतीपथावर आहेत." परंतु प्रश्नामध्ये असे म्हटलेले आहे की,"ओरोस जि.सिंधुदुर्ग येथील जागतिक बँकेच्या आर्थिक सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या 17 जलस्वराज्य प्रकल्पाची कामे अंतिम टप्प्यात असताना 14 प्रकल्पांतर्गत गावातील वीज महावितरण कंपनीकडे सुमारे 3 लाख रुपये निधी भरणा करुनही वीज पुरवठा करण्यास होणाऱ्या दिरंगाईमुळे योजना सुरु होण्यास अडचण निर्माण होत असल्याचे माहे मार्च,2009 मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय?

महोदय, डी.पी.डी.सी.च्या मिटिंगमध्ये हा प्रश्न वारंवार येतो. त्या ठिकाणी वीज जोडणीच्या कामाच्या बाबतीत दिरंगाई केले जाते. जिल्हा परिषदेने त्या प्रकल्पाच्या संदर्भात निधी उपलब्ध करुन दिल्यानंतर सुध्दा त्या ठिकाणी जोडणीची कामे केली जात नाहीत. वर्षानुवर्षे अत्यंक वाईट अनुभव त्या जिल्हयाचा आहे. माझा स्पष्ट प्रश्न असा आहे की, उत्तरामध्ये जो खुलासा दिलेला आहे तो रेकॉर्डवर आहे. परंतु 17 जलस्वराज्य प्रकल्पाची कामे अंतिम टप्प्यात असताना 14 प्रकल्पांसाठी पोल उभारणी करणे आणि वीज जोडणी लवकर करणे हा कार्यक्रम प्रलंबित आहे तो ताबडतोब करण्यात येणार आहे काय आणि तो केव्हा करण्यात येईल?

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक 51040.......

श्री. अजित पवार : सभापती महोदय, "ओरस जिल्हा सिंधुदुर्ग येथील जागतिक बँकेच्या आर्थिक सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या 17 जलस्वराज्य प्रकल्पांच्या कामा बद्दलचा हा प्रश्न आहे. ओरस हे त्यातील एक गाव आहे. कुडाळ तालुक्यात 10 ग्रामपंचायतीत जलस्वराज्य प्रकल्पाची कमे चालू आहेत. कुडाळ तालुक्यात 10 ग्रामपंचायती येतात. त्या 10 ग्रामपंचायतीमध्ये एकूण 16 वेगवेगळया पध्दतीने पिण्याच्या पाण्याच्या योजना करण्यात येत आहेत. त्यामध्ये ओरसची पिण्याच्या पाण्याची एक योजना आहे. एकूण 16 विद्युत जोडणीची कामे आहेत. त्यापैकी 8 विद्युत जोडणीची कामे महावितरण कंपनीकडे प्रलंबित आहेत. ती कशा करिता प्रलंबित आहेत? तर ती पोल उभारणे, थ्री- फेजचे वायर कनेक्शन देणे,यासाठी प्रलंबित आहेत. याबाबतीत मध्यंतरी एक बैठक घेऊन ही कामे तातडीने करण्यास सांगितले आहे. उत्तरामध्ये देखील म्हटले आहे की, सप्टेबर, 2009 अखेरपर्यंत ही सगळी कामे करुन घेण्याचे नियोजन केलेले आहे. राहिलेल्या 8 विद्युत जोडणीच्या बाबतीत ग्रमापंचायतीच्या स्तरावर काही गोष्टी प्रलंबित आहेत. त्यामध्ये A-1 फॉर्म सादर केला आहे पण त्यासंदर्भातील चाचणी अहवाल प्रलंबित आहे. एका ठिकाणी A-1 फॉर्म सादर केलेलाच नाही. एका ट्रान्सफॉर्मरची आवश्यकता आहे. त्या ठिकाणी ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे काम चालू आहे. ॲड. गुरुनाथ कुलकर्णी साहेबांनी या ठिकाणी एक मुद्दा उपस्थत केलेला आहे. प्रश्न फक्त ओरसबद्दल विचारण्यात आला होता. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना फक्त ओरस बद्दलची माहिती पाहिजे का कुडाळ तालुक्यातील सगळया योजनांबद्दलची माहिती पाहिजे का सिंधुदुर्ग जिल्हयाची माहिती पाहिजे हे विभागाला नक्की कळत नव्हते. म्हणून उत्तर देत असताना संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्हयाचे उत्तर देण्याचा विभागाने प्रयत्न केला आहे. त्यामध्ये ओरस संबंधीचे उत्तर देखील देण्यात आलेले आहे. या सगळयाच योजनांच्या बाबतीत ग्रामपंचायतीने देखील त्यांच्या स्तरावर ज्या अडचणी असतील त्याबाबतच्या त्रुटी दूर केल्या पाहिजेत. महावितरण कंपनी त्या ठिकाणी विद्युत कनेक्शन ताबडतोब देईल, त्या ठिकाणी त्याबाबतची अडचण नाही तसेच या सगळया योजनांकरिता निधीची कुठल्याही प्रकारची अडचण नाही.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "सद्य:स्थितीत 141 ठिकाणी वीज पुरवठा प्राप्त झाला आहे." ती कोणती गावे आहेत, त्या गावांची नावे सभागृहाला कळतील काय? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, संबंधितांना काय सूचना देण्यात आलेल्या आहेत आणि त्या कधी देण्यात आलेल्या आहेत?

यानंतर श्री. बरवड....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 51040 ......

श्री. अजित पवार : सभापती महोदय, या 141 गावांची यादी माझ्याकडे आहे. ती पटलावर ठेवतो. आपण जर संमती दिली तर गावाची नावे वाचून दाखविण्याची माझी तयारी आहे.

**सभापती** : त्याची आवश्यकता नाही.

श्री. अजित पवार : आम्ही काय सूचना दिलेल्या आहेत याबाबत सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला. ज्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या योजना जलस्वराज्य मार्फत चालू आहेत त्याबद्दल तक्रारी आल्यानंतर आम्ही त्यांना सूचना दिल्या आहेत. सर्वेक्षण अंती राज्य वितरण कंपनीकडून ग्राहक कोटेशन अदा केले जाते, नवीन वीज जोडणीबाबत काही प्रचलित पध्दत आहे त्यामध्ये सातबारा, खाजगी मालक असल्यास त्याचे संमतीपत्र, ग्राहकाकडून डिमांड नोटचा भरणा राज्य वितरण कंपनीकडे करण्यात येतो अशा ज्या गोष्टी आहेत त्याबाबतीत ग्रामपंचायतींना सूचना दिलेल्या आहेत की, वीज बोर्ड कनेक्शन देण्यास तयार आहे पण विद्युत बोर्ड कनेक्शन देण्याकरिता ज्या कागदपत्रांची पूर्तता या ग्रामपंचायतींनी केली पाहिजे. ती पूर्तता लवकरात लवकर करुन द्यावी अशा प्रकारच्या सूचना त्यांना करण्यात आलेल्या आहेत.

----

**तारांकित प्रश्न क्रमांक - 51500**

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT

**नॅशनल रेयॉन कंपनीतील कामगारांच्या वेतनाबाबत**

**(३) * ५०७४३ श्री. संजय दत्त , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री सुभाष चव्हाण , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.सय्यद जमा , श्री. चरणसिंग सप्रा , श्रीमती अलका देसाई , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. राजेंद्र जैन , श्री. लक्ष्मण जगताप , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. संजय पाटील , डॉ. वसंत पवार , प्रा. फौजीया खान : तारांकित प्रश्न क्रमांक ४८३६९ ला दिनांक १९ डिसेंबर, २००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :**
सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नॅशनल रेयॉन कंपनीतील कामगारांच्या वेतनासह विविध प्रश्नांबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत कोणता निर्णय घेतला आहे व त्या अनुषंगाने कामगारांच्या कोणकोणत्या मागण्या मान्य करण्यात आल्या,

(३) अद्याप निर्णय घेऊन मागण्या मान्य केल्या नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व याबाबत केव्हा निर्णय घेण्यात येणार आहे ?

**श्री.नवाब मलिक** : (१) होय.

(२) जमिनीच्या विक्रीतून प्राप्त झालेल्या रकमेतून व्यवस्थापन व कामगार संघटना यांच्यामध्ये दिनांक ५ सप्टेंबर, २००८ रोजी झालेल्या करारानुसार सर्व कामगारांच्या देय रकमा अदा कराव्यात असा निर्णय दिनांक ७.२.२००९ रोजी शासनस्तरावर उभयपक्षांच्या आयोजित केलेल्या बैठकीत घेण्यात आला. तसेच या करारानुसार Early Retirement Scheme नुसार राजीनामा देणाऱ्या कामगारांना त्यांची कायदेशीर देणी, जसे थकीत पगार, रजेचा पगार, बोनस, रजा रोखीकरण व उपदानाची रक्कम देण्याचे मान्य केले आहे. याबाबतीत कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, आमच्या भागाचा हा अत्यंत गंभीर प्रश्न आहे आणि या सार्वभौम सभागृहाच्या माध्यमातून तेथील कामगारांना न्याय मिळावा ही माझी प्रार्थना राहणार आहे. प्रथम मी माननीय मंत्रिमहोदयांना धन्यवाद देऊ इच्छितो की, त्यांनी या प्रश्नाचे गांभीर्य ओळखून यासंबंधी दोन बैठका सुध्दा घेतलेल्या आहेत. परंतु, "We are leading nowhere." म्हणून त्या दृष्टीकोनातून माझे दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, बैठका झ ाल्यानंतर याबाबतीत कार्यवाही सुरु आहे. सन्माननीय मंत्रिमहोदयांनी याची माहिती द्यावी की, एकूण ड्यूज किती आहेत आणि आतापर्यंत त्यातील किती कामगारांना देण्यात आले ? त्यासाठी काही कालमर्यादा निश्चित केलेली आहे काय ? त्या ठिकाणी केमिकल प्लँट सुरु आहे परंतु नायलॉन प्लँट बंद आहे आणि क्लोरीन प्लँट बंद आहे. हे प्लँट सुरु करण्यासाठी जे मेन्टेनन्स लागते, जे पैसे लागतात त्यासाठी सरकारकडे काही योजना आहे काय ? शासनाकडे

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 50743 ..... श्री. संजय दत्त ....

रिहॅबिलिटेशन पॅकेज किंवा काही योजना आहे काय ? जी जमीन विकली आहे त्यातील पैसे पुरत नसतील तर सरकार काय करणार आहे ?

श्री. नवाब मलिक : सभापती महोदय, या एनआरसी कंपनीच्या कामगारांचे थकीत पैसे एप्रिल, 2008 पासून प्रलंबित आहेत. त्यासाठी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी 2008 च्या ऑक्टोबर महिन्यामध्ये बैठक घेतली. कंपनीने अशी मागणी केली की, ही जागा विकण्यासाठी आम्हाला परवानगी द्यावी. शासनाने ती परवानगी दिली. रहेजा बिल्डरबरोबर त्यांनी 166 कोटी रुपयांमध्ये व्यवहार केला. त्यातील त्यांना 40 कोटी रुपये मिळाले. त्यांनी तीन अटी घातल्या होत्या. त्यामध्ये आम्हाला केडीएमसीकडून एनओसी मिळवून द्यावी, शासनाकडून एनओसी मिळवून द्यावी तसेच फेन्सींग करावे अशा अटी होत्या. मी स्वत: फेब्रुवारी महिन्यामध्ये दोन बैठका घेतल्या. त्या बैठकीमध्ये आपण असा निर्णय दिला की, ही सगळी कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी. ती सगळी कार्यवाही पूर्ण केल्यानंतरही हा व्यवहार पूर्ण होत नाही. आतापर्यंत कामगारांचे 22 कोटी रुपवे थकीत आहेत. त्यासाठी अशी सूचना दिली की, जर व्यवहार पूर्ण होत नसेल तर आपण तो रद्द करावा आणि एखादी शासनाची यंत्रणा जसे एमएमआरडीए असेल त्यांना ताबा देऊन पैसे मिळवा. कंपनीला रिव्हाईव्ह करता येईल काय यासाठी आम्ही रहेजा बिल्डरला सुध्दा शासनामार्फत लिहिले आहे. त्यांनी असे उत्तर दिले की, माझा काही संबंध नाही. तसेच एनआरसीच्या मॅनेजमेंटला सुध्दा पत्र दिलेले आहे की, त्यांना मुदत देऊन मग हा व्यवहार रद्द करुन एमएमआरडीएमार्फत हे पेमेंट होऊन कंपनी रिव्हाईव्ह करता येईल काय यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हा प्रश्न याकरिता गंभीर आहे की, ज्या काळात रहेजा यांनी 140 कोटी रुपये किंमत दिली होती त्यानंतर किंमत कमी झालेली आहे. त्यामुळे रहेजा यातून बॅकआऊट होण्याचा प्रयत्न करीत आहे, हे गैरकायदेशीर आहे. रहेजा कंपनीने तीन प्रकारच्या अटी घातल्या होत्या. त्यामध्ये शासनाची एनओसी, केडीएमसी महानगरपालिकेची एनओसी मिळवून द्यावी याबाबत अट होती. बिल्डरच्या तीनही अटी आपण पूर्ण केल्या असल्यामुळे त्यांनी 40 कोटी रुपये डिपॉझीट केलेले आहेत. हे कामगार मला भेटले. आता ही कंपनी बॅकआऊट होत असेल तर त्याबाबतीत फेवर करण्याचे कारण नाही.

यानंतर कु. थोरात ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MAP/ यापूर्वी श्री.बरवड 13:30

ता.प्र.क्र.50743...... श्री.नितीन गडकरी....

कायदेशीररित्या बाबी तपासून 40 कोटी रुपये जप्त केले पाहिजेत. त्यांना सांगितले पाहिजे की, तुम्ही जेवढे पैसे कबूल होते, तेवढे शासनाने क्लीअर केले आहेत. तुम्ही जागा विकत घ्यावी. मी शासनावर आरोप करीत नाही. परंतु रहेजा कंपनी बॅक आऊट होत आहे. त्याचे शासनाने डायरेक्ट किंवा इनडायरेक्ट समर्थन करु नये. किंबहुना, शासनाने त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करावी, हे पैसे वसुल करावेत, एमएमआरडीएला ते शक्य होणार नाही. कारण 140 कोटीची किंमत आता 85 कोटीपर्यंत येणार आहे अशी माझी माहिती आहे, त्यामुळे शासनाचे नुकसान होणार आहे. त्यावेळी त्यांनी टेंडर भरलेले आहे. तेव्हा रहेजा कंपनीकडून या पैशाची वसुली करण्यात यावी. ती सरकार करणार काय, अटी व शर्थी पूर्ण केल्यानंतर, सगळया एनओसी पूर्ण केल्यावर ते जर घेत नसतील तर त्यावर शासन कारवाई करणार काय, शासनाला ते असे पत्र कसे काय लिहू शकतात, शासन 40 कोटी रुपये जप्त करणार काय, हे पैसे कामगारांचे असल्यास किती दिवसाच्या आत कामगांराना परत दिले जाणार आहेत, याबाबत उत्तर देण्यात यावे.

श्री.नवाब मलिक : सभापती महोदय, त्या कामगारांना हे शासन देणे लागत नाही. कंपनीच्या व्यवस्थापनाकडे कामगारांचे पगार थकीत आहे. ऑक्टोबर, 2008 मध्ये शासनाने त्यांना एनओसी दिलेली आहे. केडीएमसीमध्ये आणि त्यांच्यात वाद होता म्हणून ते एनओसी देत नव्हते. तो वाद मिटवून केडीएमसीने एनओसी दिलेली आहे. फेन्सिंगची अट पूर्ण करण्यात आलेली आहे. तरी देखील त्यांचे आपसातील व्यवहार पूर्ण होत नाहीत. रहेजांना मदत करण्याची शासनाची भूमिका नाही. रहेजांचा व्यवहार पूर्ण होत नसेल आणि कामगारांची थकीत देणी मिळण्यासाठी शासनाने 365 एकर जमिनीबाबत दोन पर्याय ठेवलेले आहेत. एक म्हणजे तुम्ही रहेजांबरोबरचा व्यवहार रद्द करावा, त्यांचे पैसे फॉरफिट करावे, पण याबबातची कार्यवाही एनआरसीकडे प्रलंबित आहे. या सर्व सूचना देऊनही ते कार्यवाही करीत नाहीत. परंतु पुन्हा 40 कोटी रुपये फॉरफिट करुन पुन्हा एक जाहिरात देऊन टेंडर काढावे, नंतर जमीन विकून कामगारांचे पैसे द्यावेत अशा सूचना देण्यात येतील.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.50743....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी जेव्हा ठाणे जिल्हयात गेलो होतो तेव्हा एक कामगार मला भेटले होते. त्यांच्यावर 2008 सालापासून उपासमारीची वेळ आलेली आहे. मंत्रिमहोदयांनी सांगितले की, शासनाने तिन्ही अटी पूर्ण केलेल्या आहेत. फेन्सिंगची अट सुध्दा त्यांनी मान्य केलेली आहे. व्यवस्थापन आणि रहेजा यांच्यामधील व्यवहार खाजगी असला तरी हजारो कामगारांचे भविष्य 2008 पासून वेठीला टांगले गेले आहे. हा खाजगी व्यवहार आहे असे सांगून शासनाने बाजूला होता कामा नये. शासनाला माझी विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्री स्तरावर यासंबंधी एक बैठक बोलवावी. हा व्यवहार पूर्ण होत असेल तर तो पूर्ण करुन पैसे उपलब्ध करुन त्यांचे प्रश्न सोडवावेत. तसे नसेल होत तर कामगार विभागाने कराराची तपासणी करुन कोण खरा आहे कोण खोटा आहे हे पाहून सरकारने ठाम भूमिका घेतली पाहिजे की, तुमचे हे वागणे बरोबर नाही. ही रक्कम तुम्ही फॉरफिट करावी. त्या कंपनीचे व्यवस्थापन याबाबत कार्यवाही करण्याच्या स्थितीमध्ये नाही. आम्ही शासनाकडे जाऊ असे त्या कंपनीचे व्यवस्थापन सांगत आहे. यासंबंधी उच्च स्तरावर निर्णय घेऊन कामगारांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाईल काय ?

श्री.नवाब मलिक : एप्रिल, 2009 मध्ये रहेजा डेव्हलपरला शासनाने पत्र लिहिलेले आहे की, 166 कोटींचा तुमचा जो व्यवहार झाला होता तो पूर्ण करावा. कामगारांचे पैसे देणे गरजेचे आहे. परंतु त्यांनी शासनाला असे पत्र पाठविले आहे की, आमचा शासनाशी संबंध नाही. आमचा संबंध एनआरसीशी आहे. त्यामुळे शासनाने एनआरसीला हा व्यवहार लवकरात लवकर पूर्ण करुन कामगारांचे पैसे देण्याबाबत पत्र लिहिलेले आहे. विधिमंडळाचे हे अधिवेशन संपल्यानंतर याबाबत पुन्हा एक बैठक बोलवून यासंबंधी काय कायदेशीर कारवाई करता येईल हे पाहून कामगारांचे पैसे मिळवून देण्याबाबत प्रयत्न केला जाईल.

श्री.संजय केळकर : हा एक प्रातिनिधिक प्रश्न आहे. ठाणे जिल्हयात एनआरसीसारख्या असंख्य कंपन्या आहेत. पॉयशा, इंडियन रबर अशा कंपन्या आहेत. त्या कंपन्यांनी कामगारांना व्यवस्थापनाने वाऱ्यावर सोडलेले आहे. जमीन विक्रीचे व्यवहार होऊन तेथे मॉल उभे राहिले आहेत, निरनिराळया कंपन्या उभ्या राहिल्या आहेत. परंतु एकेका कंपनीतील शेकडो कामगारांना

3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांचा मोबदला मिळालेला नाही. शासन स्तरावर यासंबंधी ठोस धोरण ठरविले जाणार आहे काय, कारण हजारो कामगारांना या कंपन्यांनी वाऱ्यावर सोडलेले आहे. डिसेंबर, 2008 मध्ये इंडियन रबर कंपनीसंबंधी माननीय मंत्रिमहोदयांनी स्पष्टपणे आदेश दिले होते. त्या कंपनीच्या जमिनीच्या विक्रीचा व्यवहार 20 कोटी रुपयांचा व्हावयास पाहिजे होता तो केवळ 2 कोटींचा झाला. त्यामुळे तो जमीन विक्रीचा व्यवहार रद्द करुन जमिनीची पुन्हा विक्री करुन कामगारांची देणी द्यावीत असा शासनाने आदेश दिला होता. ठाणे जिल्हयातील असंख्य कंपन्यांमधील कामगार आता मरण पावले आहेत. परंतु त्यांचे प्रश्न अद्याप सुटलेले नाहीत.

.                                   यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 50743....

श्री. नवाब मलिक : हे खरे आहे की, कामगारांची थकीत देणी बाकी होती. दिनांक 12 मार्च 2005 रोजी शासनाने असा निर्णय घेतलेला आहे की, जो पर्यन्त कामगारांची थकीत देणी दिली जात नाही तोपर्यन्त एकाही कंपनीला विकास करण्यास परवानगी दिली जाणार नाही. त्यासंदर्भात जी.आर.काढण्यात आला. त्यामुळे या राज्यातील 70 हजार कामगारांची 2100 कोटीची थकीत देणी त्यांना मिळवून देण्याच्या कामी यश पाप्त झाले आहे. ज्या कंपनीतील कामगारांचे पैसे देण्यात आले नसतील त्या कंपनीला विकासाची परवानगी दिली जात नाही. जर एखाद्या कंपनीमध्ये कामगारांचे पैसे न देता विकासाचे काम सुरु असेल तर त्या कंपनीला दिलेली एनओसी रद्द करुन चालू असलेले विकास काम थांबविले जाईल. कामगारांचे पैसे दिल्या शिवाय विकास होऊ देणार नाही.

श्री. चंद्रकांत छाजेड : 166 कोटी रुपयांचा करार झालेला आहे. 40 कोटी रुपये मिळालेले आहेत. सगळया एनओसी मिळाल्यानंतर आणि 40 कोटी रुपये जमा झाल्यानंतर सरकारच्या धोरणाप्रमाणे कामगारांना 22 कोटी रुपयांचे वाटप का करण्यात आले नाही ? सरकारने या बाबतीत कंपनीशी मध्यस्थी करुन हे पैसे कामगारांना किती दिवसात देण्यात येतील ?

श्री. नवाब मलिक : कंपनी सुरु करण्यात आलेली आहे. कंपनीचे नॉयलॉन आणि केमिकल असे दोन प्लॅण्ट आहेत. त्या पैशातून कंपनी रिव्हाईव्ह केलेली आहे. रेयॉनमधील कामगारांना 50टक्के आणि केमिकल प्लॅण्टमधील कामगारांन 75 टक्के पगार देण्याचे ठरविण्यात आलेले आहे. जे पैसे आले होते त्याचा विनियोजन कसा करायचा हे युनियन आणि मॅनेजमेण्ट यांनी करार करुन ठरविलेले आहे. उर्वरित पैसे आल्यानंतर "ERS" घेतलेल्या कामगारांची थकीत देणी देण्यात येतील.

डॉ. वसंत पवार : एनआरसी व्यवस्थापन आणि कामगार संघटना यांच्यामध्ये व्यवहार झालेला आहे. Early Retirement Scheme नुसार राजीनामा देणा-या कामगारांना त्यांची कायदेशीर देणी, जसे थकीत पगार, रजेचा पगार, बोनस, रजा रोखीकरण व उपदानाची रक्कम देण्याचे मान्य केले आहे. व्हॉलण्टरी रिटायरमेंट स्कीमध्ये 20 वर्षे सेवा झाल्यानंतर राजीनामा देण्याची तरतूद आहे. या प्रकरणी कामगारांचा राजीनामा घेण्याची काय गरज होती ? राजीनामा घेतलेल्या कामगारांची कायदेशीर देणी देण्याचे शासन कंपनीला बंधनकारक करणार आहे काय ?

..2..



(ता.प्र.क्र. 50743....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नवाब मलिक : जे कामगार राजीनामा देण्यास तयार आहेत त्यांची देणी देण्याचे युनियन आणि मॅनेजमेण्टने ठरविले. त्यानुसार 577 लोकांनी "Early Retirement Scheme" घेण्याचे मान्य केले. 124 लोकांची देणी देण्यात आली. उर्वरित कामगारांची देणी अजून देण्यात आलेली नाहीत. "Early Retirement Scheme" मधील कामगारांची थकीत देणी दिल्यानंतर उर्वरित रक्कम कंपनी रिव्हाईव्ह करण्यासाठी वापरण्यात येईल.

श्री. प्रकाश शेंडगे : कांमगारांचा मूळ प्रश्न बाजूला ठेवून ही कंपनी जमिनीच्या विक्री व्यवहारापर्यन्त जाते. कामगारांचे 22 कोटी रु. थकीत राहीपर्यन्त हे शासन झोपले होते काय ? अर्लि रिटायरमेंट स्कीममधील कामगारांचे थकीत वेतन, ग्रॅच्युईटी, बोनस, प्रॉव्हिडण्ट फंड असे एकूण 22 कोटी रुपये थकलेले आहेत. ज्या मालकाने कामगारांची ही थकीत देणी दिलेली नाही त्या मालकावर शासनाने कोणती कायदेशीर कारवाई केली आहे ? नसेल तर काय कारवाई करणार आहे ? खरे म्हणजे 40 कोटी रु. रहेजाच्या घशात कसे जातील याचे प्लॅनिंग कलेले आहे असे वाटते. ज्या मालकाने कामगारांची देणी थकविली आहेत त्याच्यावर कोणती कायदेशीर कारवाई शासन करणार आहे ?

श्री. नवाब मलिक : 40 कोटी रुपये शासनाकडे नाही तर मॅनेजमेण्टकडे आलेले आहेत. त्यातून "ERS" मधील कामगारांचे पैसे देण्यासंबंधी आणि कंपनी सुरु ठेवण्यासंबंधी मॅनेजमेण्ट आणि युनियन यांनी एकत्र बसून ठरविलेले आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MAP/ SBT/ 13:40

ता.प्र.क्र.50743.....

श्री.नवाब मलिक.....

या कंपनीतील कर्मचा-यांना थकीत पगार, रजेचा पगार इत्यादी रक्कम दिली नाही, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई कामगार विभागाने केली आहे. मध्यस्थी करुन ही कंपनी कशी चालू ठेवता येईल आणि या कंपनीतील कामगारांची थकीत देणी कशी मिळवून देता येईल यादृष्टीने शासन प्रयत्न करीत आहे.

---------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**आदिवासी भागात दारूची निर्मिती व विक्री न करण्याचा केंद्र शासनाचा आदेश असताना गडचिरोली जिल्ह्यात मोहफुलापासून दारू बनविण्याचा कारखाना उभारण्यात येत असल्याबाबत**

**(४) * ५२७०० श्री.अरुण गुजराथी , श्री. जितेंद्र आव्हाड :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी भागात दारूची निर्मिती व विक्री न करण्याचा केंद्र शासनाचा आदेश असताना गडचिरोली जिल्ह्यात मोहफुलापासून दारू बनविण्याचा कारखाना उभारण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार जिल्ह्यात कारखाना उभारणीस प्रतिबंध व दारू विक्री न करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.गणेश नाईक** : (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.अरुण गुजराथी : माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या लेखी उत्तरामुळे माझे समाधान झलेले आहे.

श्री.गणेश नाईक : आभारी आहे.

श्री. नितीन गडकरी : सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्याबद्दल मला काही आक्षेप घ्यावयाचा नाही. आदिवासी शेतक-यांच्या दृष्टीने हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. आदिवासी क्षेत्रात आदिवासींना मोहफुलाचा व्यवसाय करु देण्यास शासनाने निर्णय घेतलेला आहे. मोहफुलापासून इथेनॉल आणि आर.एस.तयार होते. इथेनॉल आणि आर.एस.तयार करण्यासाठी मोहफुले साडेचार ते पाच रुपये भावाने खरेदी केले जातात. मोहफुले आदिवासी गोळा करतात. त्या आदिवासींकडून 10 रुपये किलोने मोहफुले खरेदी केली तर

3...



ABG/ MAP/ SBT/ 13:40

आदिवासींना आर्थिक फायदा होऊ शकतो. देशात श्री.विजय मल्ल्या मद्याचे उत्पादन करतात. त्याप्रमाणे आपण साखर कारखान्यांत इथेनॉलच्या माध्यमातून मद्यांचे उत्पादन करीत असतो. आदिवासी भागातील आदिवासींना मोहफुलापासून मद्यनिर्मिती वा अन्य निर्मिती करण्यासाठी परवानगी दिली पाहिजे. मोहफुलापासून मोठया प्रमाणात इथेनॉल तयार होऊ शकते. मी अमेरिकेतील एका प्रयोगशाळेत गेलो होतो. इथेनॉलपासून अनेक उत्पादने होतात या गोष्टी मी तेथे पाहिल्या आहेत. पर्यायाने तेथे अनेकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे. या बाबतीत माननीय मंत्री महोदयांबरोबर चर्चाही झालेली आहे. त्या अनुषंगाने शासनाने निर्णय घेतला आहे. आदिवासी भागातील आदिवासींची गरीबी दूर करण्यासाठी मोहफुलाच्या किंमतीत वाढ करुन आदिवासींना मोहफुलापासून विविध प्रक्रिया करण्याची परवानगी द्यावी. तसेच अन्य लोकांना देखील मोहफुले खरेदी करण्याची शासनाने परवानगी द्यावी. मोहफुलाच्या किंमतीमध्ये वाढ केल्यास आदिवासींना आर्थिक फायदा होईल आणि म्हणून याबाबतीत शासनाची भूमिका काय आहे ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, प्रामुख्याने गडचिरोली आणि वर्धा या दोन जिल्हयांमध्ये कसल्याही प्रकारचे मद्याचे उत्पादन, विक्री आणि वाहतूक यावर बंदी घालण्यात आलेली आहे. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी गडचिरोली जिल्हयात मोहफुलापासून दारु बनविण्याचा कारखाना उभारण्यात येत आहे आहे काय असा प्रश्न विचारला असतान शासनाकडून "नाही" असे उत्तर देण्यात आले आहे. शासनाने जे लेखी उत्तर दिले आहे, त्या उत्तराने सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांचे समाधान झाले आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी पुढची भूमिका मांडली आहे. आदिवासी स्वत:च्या पायावर उभा रहावा म्हणून आदिवासींना मोहफुलापासून एखादी डिस्टीलरी काढण्याची परवानगी शासन देईल काय? सभापती महोदय, आदिवासी भागातील आदिवासींना स्वत:च्या वापराकरिता मोहफुलापासून दारु निमिर्ती करण्याची शासनाकडून परवानगी देण्यात आली आहे. आदिवासींना स्वत:कडे 25 किलो मोहफुले ठेवण्याची परवानगी शासनाने दिलेली आहे. आदिवासींनी ग्रामपंचायतीला कळविले तर एका आदिवासीला 75 किलो मोहफुले स्वत:कडे ठेवता येतात. त्यांना गरज भासते त्यावेळी ते त्यांच्यापूरते मद्य निर्मिती करु शकतात. आदिवासींच्या बाबतीत शासनाने यासंबंधीची भूमिका

4...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पूर्वीपासून घेतलेली आहे. आदिवासींना मोहफुलापासून मद्य निर्मिती करण्याची परवानगी देण्यात यावी अशा प्रकारची मागणी या निमित्ताने केलेली आहे. परंतु सध्या तरी ही मागणी शासनाच्या विचाराधीन नाही. परंतु सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी या अनुषंगाने ज्या काही उपयुक्त सूचना केल्या आहेत, त्याबाबतीत मी एवढेच सांगू इच्छितो की, "सजेशन्स फॉर ॲक्शन".

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आज आदिवासींनी गोळा केलेल्या मोहफुलास फक्त साडेचार ते पाच रुपये किलो असा भाव मिळतो. परंतु आदिवासींकडून ही मोहफुले खरेदी करण्याची परवानगी खाजगी लोकांना दिली तर ते या मोहफुलाला 8 ते 10 रुपये भाव मिळू शकतो. पर्यायाने आदिवासींचे उत्पन्न दुप्पट होऊ शकते. म्हणून आदिवासींना या गोष्टीचा फायदा का देण्यात येत नाही ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, आदिवासींनी केलेल्या मेहनतीला जास्त मोबदला कसा दिला जाईल यादृष्टीने शासन निश्चितपणे लक्ष देईल.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, आदिवासी धान उत्पादक शेतक-यांचे धान हमी भावात शासनाकडून खरेदी केले जाते. त्याप्रमाणे या आदिवासींनी गोळा केलेली मोहफुले हमी भावात शासनाकडून खरेदी केले जाईल काय ? आदिवासींची मोहफुले साडेचार ते पाच रुपये किलो या भावाने खरेदी केली जात आहेत. आदिवासींनी गोळा केलेली मोहफुले शासनाने हमी भावाने खरेदी केली तर आदिवासींच्या उत्पन्नात मोठया प्रमाणात भर पडू शकेल. म्हणून याबाबतीत शासनाची भूमिका काय आहे?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, "सजेशन फॉर ॲक्शन".

श्री. केशवराव मानकर : खाजगी व्यापारी सुध्दा आठ ते दहा रुपये भावाने मोहफुले खरेदी करु शकतात. पर्यायाने आदिवासींच्या आर्थिक उत्पन्नात निश्चितपणे भर पडेल.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, यासंदर्भात विभागाच्या अधिका-यांना निश्चितपणे विचार करण्यास सांगण्यात येईल.

----------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुरुड (जि.रायगड ) तालुक्यातील आंबोली लघुपाटबंधारे धरण प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला न दिल्याबाबत**

**(५) * ५०३५३ श्री. जयंत पाटील , श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरुड (जि.रायगड ) तालुक्यातील आंबोली लघुपाटबंधारे धरण प्रकल्पासाठी संपादीत करण्यात आलेल्या जमिनीची २० टक्के रक्कम तसेच घरांच्या, झाडांच्या किंमती शेतकऱ्यांना अद्यापही अदा करण्यात आल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी या संपादित जमिनीची रक्कम मिळण्यासाठी दिनांक १३ सप्टेंबर, २००८ रोजी जिल्हाधिकारी, रायगड यांची भेट घेतली होती तसेच दिनांक ६ ऑक्टोबर, २००८ रोजी लोकशाही दिनी एक निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने संपादित केलेल्या उर्वरित २० टक्के जमिनीची रक्कम शेतकऱ्यांना अदा केली आहे काय,

(४) असल्यास, केव्हा, अद्यापही अदा न केल्यास विलंबाची कारणे कोणती ?

**डॉ.पतंगराव कदम** : (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) भूसंपादन अधिनियम १८९४ चे तरतुदीनुसार मौ.आंबोली (प्र.क्र.१५०३ अ) येथील भूसंपादन प्रकरणी खातेदारांना २० टक्के नुकसान भरपाईची रक्कम दि.५.०३.०९ व दि.२८.३.०९ रोजी अदा करण्यात आली आहे. तसेच मौ.तिसली (प्र.क्र. १५०४ अ) येथील भूसंपादन प्रकरणी खातेदारांना २० टक्के नुकसान भरपाईची रक्कम दि.२०,२१ व २२ जानेवारी, २००९ रोजी अदा करण्यांत आलेली आहे. उर्वरीत मौ.आंबोली (प्र.क्र.१५०२ब) व मौ.तिसले (प्र.क्र.१५०४ब) भूसंपादन प्रकरणी अंतिम निवाड्याचे मंजूरी नंतर खातेदारांना कलम १२ (२) खाली नुकसान भरपाईच्या नोटीसा देण्यात आल्या नंतर, खातेदारांना २० टक्के (फळझाडे, वनझाडे, घरे, बेडे इत्यादीसह) नुकसान भरपाई देणेची तजवीज ठेवली आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, किती खातेदारांना किती रक्कम आतापर्यंत अदा केली आहे? उर्वरित 20 टक्के रक्कम किती दिवसात दिली जाणार आहे?

डॉ.पतंगराव कदम : 80 टक्के रक्कम पूर्ण दिली असून उर्वरित 20 टक्के रक्कम 15 दिवसात दिली जाईल.

-------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**वरळी दुग्ध शाळेची जागा महानंदा दूध संघाला देण्याबाबत**

**(६) * ५२३३८ श्री. अरविंद सावंत , डॉ. दीपक सावंत , श्री. अनिल परब , डॉ. निलम गोऱ्हे , श्री.किरण पावसकर , श्री.परशुराम उपरकर :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई वरळी येथील शासकीय डेअरीची जागा राज्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांची शिखर संस्था असलेल्या महानंदा या दुध उत्पादक संस्थेला देण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरळी येथील समुद्रकिनारी असलेल्या या मोक्याच्या जागेवर अनेकांनी दुधाची विक्री दिवसेंदिवस कमी होत असल्याचे कारण देवून ती जागा मिळविण्याबाबतचा काही प्रस्ताव शासनाकडे आले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने काय निर्णय घेतला आहे ?

**श्री.रविशेठ पाटील** : (१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, ता.प्र.क्र.52338.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, उत्तरामध्ये किरकोळ दुरुस्ती करावयाची आहे. पहिल्या उत्तरामध्ये "नाही" या शब्दानंतर "परंतु अर्थसंकल्पामधील भाषणामध्ये शासनाने दुधाची व्यवस्था टप्प्याटप्प्याने सहकार क्षेत्राकडे हस्तांतरित करण्याचा उल्लेख केला होता" असे वाचावे.

श्री.अरविंद सावंत : सुधारित उत्तर संशय निर्माण करणारे आहे. वरळी डेअरीची जागा अत्यंत मोक्याच्या ठिकाणी आहे. दुस-या बाजूला शिखर संस्था महानंद याठिकाणी सनदी अधिकारी न नेमल्यामुळे प्रचंड भ्रष्टाचार झाल्यानंतर तेथे सनदी अधिकारी नेमण्यात आले. त्यांच्याकडून तेथील भ्रष्टाचार उघडकीस आणला गेला. त्यानंतर वर्ग.1 चे अधिकारी त्याठिकाणी नेमण्यात आले, कालांतराने ते मंत्रीमहोदयांचे खाजगी सचिव झाले. आता पुन्हा दुग्धविकास आयुक्तांकडे तेथील कारभार सोपविला आहे. अर्थसंकल्पीय भाषणात काहीही म्हटले असले तरी शासनाकडे अशा प्रकारचा प्रस्ताव आला आहे का?

श्री.हसन मुश्रीफ : उत्तरात स्पष्ट म्हटले आहे. अशा प्रकारचा प्रस्ताव शासनाकडे आलेला नाही.

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सुधारित उत्तरामध्ये मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे अर्थसंकल्प मांडला त्यावेळी हे नमूद करण्याचे कारण म्हणजे आपल्याला भविष्यात जे करायचे आहे त्याचा इशारा देण्यासाठी होते का? महानंद डेअरीकडून मागणी आली तर त्यांना शासन जागा देणार का?

श्री.हसन मुश्रीफ : शासनाचे धोरण असे आहे की, दुधाच्या व्यवसायातून शासनाने बाहेर पडायचे व टप्प्याटप्प्याने हा व्यवसाय सहकार क्षेत्राकडे सोपवायचा. 2009 पर्यंत 22 शीतकरण केंद्रे सहकार क्षेत्राकडे हस्तांतरित केली आहेत. वरळी येथील जागेबाबत कोणताही प्रस्ताव आज शासनाकडे विचाराधीन नाही.

श्री.अरविंद सावंत : प्रस्ताव विचाराधीन नसेल तर वरळी डेअरीची जागा कोणत्याही परिस्थितीत दुग्ध व्यवसाय सोडून इतर व्यवसायासाठी विकण्यात येणार नाही असे ठामपणे मंत्रीमहोदय सांगतील काय?

श्री.हसन मुश्रीफ : आज तरी तसा प्रस्ताव विचाराधीन नाही. भविष्यात काय होईल हे मला माहिती नाही.

ॲड.अनिल परब : तसा प्रस्ताव आला तर वरळी डेअरीत काम करणाऱ्या कामगारांना महानंद डेअरीमध्ये सामावून घेतले जाईल काय?

श्री.हसन मुश्रीफ : प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या पूर्व विदर्भातील ७.३१ लाख हेक्टर क्षेत्रासाठी जाहिर केलेले अर्थसहाय्य**

**(७) * ५०३०३ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री.केशवराव मानकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या पूर्व विदर्भातील ७.३१ लाख हेक्टर क्षेत्रासाठी माहे डिसेंबर, २००८ मध्ये शासनाने प्रति हेक्टरी ४००० रुपयांप्रमाणे दोन हेक्टरपर्यंत अर्थसहाय्य देण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरिता ३०० कोटींची आर्थिक तरतूदही करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक ३१ मार्च, २००९ अखेर या तरतूदीतील किती रक्कम भंडारा व गोंदिया जिल्ह्यांना मिळालेली आहे व त्याचा लाभ किती लाभार्थ्यांना देण्यात आला आहे,

(४) ज्यांना अद्याप ही आर्थिक मदत मिळालेली नाही असे किती लाभार्थी आहेत व त्यांना ती केव्हा देण्यात येणार आहे ?

**श्री.सुरेश वरपुडकर, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता** : (१) होय.

(२) याकरिता रु.२८८.०५ कोटी इतका निधी नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया या पाच जिल्ह्यांना वितरित करण्यात आला आहे.

(३) व (४) भंडारा व गोंदिया या जिल्ह्यांना आवश्यक असलेला अनुक्रमे रु.७१३०.५६ लाख व रु.७३९४.४४ लाख इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

भंडारा जिल्ह्यात ११२३७७ शेतकऱ्यांना रु.३७८५.४६ लाख व गोंदिया जिल्ह्यात १७१७०८ शेतकऱ्यांना रु.५५५९.०७ लाख इतक्या निधीचे वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरित लाभार्थ्यांना मदत वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, प्रश्न भाग 4 मध्ये किती शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळाली नाही याबाबत नेमके उत्तर आलेले नाही. आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील हा प्रश्न व 58 क्रमांकाचा प्रश्न याचे विषय समान आहेत. परंतु दोन्ही प्रश्नांच्या उत्तरांमध्ये वेगवेगळी आकडेवारी देण्यात आली आहे. ही दुरुस्ती केल्याशिवाय प्रश्न चर्चेला घेण्यात काही अर्थ नाही.

(नंतर के.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 50303........

श्री. सुरेश वरपुडकर : महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारले की, 4 नंबरच्या प्रश्नामध्ये किती शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत मदत मिळाली नाही ? मी असे सांगू इच्छितो की, महाराष्ट्र शासनाने आतापर्यंत संपूर्ण रक्कम दिलेली आहे. 8.17 लाख एकूण शेतकरी असून त्यापैकी 5.29 लाख शेतकऱ्यांना मदत वाटप केलेली आहे व उर्वरित शेतकऱ्यांना मदत देण्याचे बाकी आहे.

श्री. नितीन गडकरी : 288.5 कोटी एवढा निधी नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा आणि गोंदिया या पाच जिल्ह्यांना वितरित करण्यात आल्याचे म्हटले आहे. त्यानुसार भंडारा जिल्ह्यात 7130.56 लाख व गोंदिया जिल्ह्यात 7394.44 लाख एवढा निधी दिलेला आहे. प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये 58 क्रमांकावर अशाच स्वरुपाचा प्रश्न असून त्यात दिलेली आकडेवारी मात्र विसंगत आहे. त्यात नागपूर जिल्हा-2323.50 लाख, भंडारा जिल्हा-7130.56 लाख, गडचिरोलीसाठी 5600 लाख, गोंदिया जिल्ह्याला 7394.44 लाख व चंद्रपूरसाठी 6356.50 लाख अशी ही आकडेवारी आहे.......

श्री. सुरेश वरपुडकर : महोदय, वितरित केलेला निधी आणि प्रत्यक्ष वाटप केलेला निधी अशी ही आकडेवारी आहे, त्यात तफावत नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : सन्माननीय सदस्यांनी क्रमांक 4 या उपप्रश्नाच्या माध्यमातून स्पेसिफिकली अशी विचारणा केली आहे की, अद्याप आर्थिक मदत मिळालेली नाही असे किती लोक आहेत आणि त्यांना ती मदत केव्हा देण्यात येणार आहे ? हाच या प्रश्नाचा मूळ गाभा आहे. माननीय मंत्री महोदयांनी मात्र किती लोकांना मदत वाटप केली ही माहिती दिलेली आहे परंतु किती लोकांना मदत वाटप बाकी आहे ही माहिती दिलेली नाही. तारांकित प्रश्न विचारत असताना एक महिन्याची पूर्वसूचना देवून सुध्दा उत्तर दिलेले नाही, हे योग्य नाही. म्हणून ज्या शेतकऱ्यांना मदत देणे बाकी आहे त्यांना किती दिवसात अशा मदतीचे वाटप करण्यात येईल? तसेच एकूण किती रकमेचे वाटप करणे शिल्लक राहिले आहे ?

श्री.सुरेश वरपुडकर : महोदय, एकूण 288.05 कोटी एवढ्या रकमेपैकी 195 कोटी रुपयाचे वाटप आतापर्यंत झालेले आहे आणि 93 कोटी रुपयांचे वाटप व्हावयाचे आहे. एकूण 8.17 लाख शेतकऱ्यांना हे वाटप करावयाचे असून त्यापैकी उर्वरित रकमेपैकी 5,29,871 रुपयांचे वाटप झालेले असून उर्वरित खातेदारांच्या अडचणी असल्याने वाटप झालेले नाही. यामध्ये

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 50303........ श्री. सुरेश वरपुडकर ......

शेतकऱ्यांची खातेफोड झालेली नसणे, काही लोकांचे बँकेत खातेच उघडलेले नाही तर काही लोक गावाला गेलेले असल्यामुळे ही आकडेवारी दिवसेंदिवस वाढत आहे. जसजसे शेतकरी आपली खातेफोड करतील तसतसे हे वाटप करण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : महोदय, 8.17 लाख एवढे एकूण शेतकरी असून त्यातील किती लोकांना वाटप झालेले आहे त्याचे आकडे दिलेले आहेत. खातेफोड वगैरे अडचणी दूर होतील त्यावेळेस त्यांना मदत द्यावी परंतु अशा अडचणी सर्वच शेतकऱ्यांच्या नाहीत. इतरांच्या बाबतीत मात्र 15 दिवसात मदत वाटप करण्याचे आदेश शासन देणार काय ?

श्री. सुरेश वरपुडकर : खातेफोड जसजशी होईल तसतसे जिल्हाधिकाऱ्यांकडून मदत वाटप करण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : प्रश्नोत्तराच्या यादीतील क्र. 7 व 58 यातील आकडेवारी जी वाचून दाखविली ती चुकीची असल्याचे माझ्या तोंडी राहू नये. कारण दोन्हीही प्रश्न एकच आहेत म्हणून माझ्या तोंडी असे राहू नये, ते रेकॉर्डवरुन काढून टाकावे, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे, आकडेवारीची जी चूक असेल ती माननीय मंत्री महोदयांनी दुरुस्त करुन घ्यावी.

श्री. सुरेश वरपुडकर : ठीक आहे.

------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**भंडारा व गोंदिया जिल्हयातील मालगुजारी तलावांची कामे योजनांमधून तसेच नियमित निधीतून पूर्ण करण्याबाबत**

**(८) * ५१५५९ श्री. राजेंद्र जैन , श्री. जितेंद्र आव्हाड : तारांकित प्रश्न क्रमांक ४९५१८ ला दिनांक १९ डिसेंबर, २००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा व गोंदिया जिल्हयातील मालगुजारी तलावांची मग्रारोहयो, राष्ट्रीय कृषि विकास योजना, राष्ट्रीय समविकास योजना इ.योजनांमधून तसेच नियमित निधीतून प्रस्तावित असलेल्या कामासंदर्भात करण्यात येत असलेली कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात** :(१) व (२) भंडारा व गोंदिया जिल्ह्यात मग्रारोहयो, राष्ट्रीय कृषी विकास योजना,राष्ट्रीय समविकास योजना व नियमित निधी इत्यादी योजनांमधून एकूण ७१५ माजी मालगुजारी तलावांची दुरूस्ती करण्याचे नियोजन आहे. त्यापैकी भंडारा जिल्ह्यातील १५१ तर गोंदिया जिल्ह्यातील २५१ मालगुजारी तलावांची दुरूस्ती पूर्ण झालेली असून भंडारा जिल्ह्यातील ६७ व गोंदिया जिल्ह्यातील ५३ माजी मालगुजारी तलावांची दुरूस्ती करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री राजेन्द्र जैन : सभापति महोदय, भंडारा और गोंदिया जिले में करीब 4500 से ज्यादा मालगुजारी तालाब है. ये तालाब अंग्रेजों के शासन काल में श्रम दान से निर्माण किए गए थें. अब ये तालाब क्षतिग्रस्त हो गए हैं, गेट टूट गए हैं. इसलिए इन तालाबों की दुरुस्ती आवश्यक हो गई है. उत्तर में लिखा गया है कि भंडारा जिले में 151 और गोंदिया जिले में 251 मालगुजारी तालाबों की दुरुस्ती पूर्ण हो गई है. जबकि कुल 715 मालगुजारी तालाबों की दुरुस्ती करने का नियोजन है. 4500 मालगुजारी तालाबों की दुरुस्ती के बारे में सोचा जाए तो यह कहना पड़ेगा कि शासन ने किसी भी प्रकार से ध्यान नहीं दिया है. चूंकि ये दोनों जिले मालगुजारी तालाब के जिले होने के कारण और नक्सलग्रस्त जिले होने के कारण सिंचाई का अनुशेष दिखाई नहीं देता. इन जिलों में कितने मालगुजारी तालाब है, इसकी संख्या क्या शासन के पास है, इन तालाबों की दुरुस्ती करने के लिए क्या सरकार विशेष निधि देगी और नक्सलग्रस्त क्षेत्र के लिए बनाए गए एक्शन प्लान के निधि में से इन तालाबों की दुरुस्ती के लिए पैसे देने के बारे में क्या सरकार निदेश देगी ?

...2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, भंडारा आणि गोंदिया जिल्हयात मलागुजारी तलावांची एकूण संख्या 3182 एवढी आहे. सन 2007 पूर्वी 1288 मालगुजारी तलावांचे काम पूर्ण करण्यात आलेले असून 1183 मालगुजारी तलाव सुस्थितीत आहेत. मालगुजारी तलावांना या पूर्वी 2702 या हेडखाली, राष्ट्रीय समविकास योजनेतून तसेच रोजगार हमी योजनेंतून निधी उपलब्ध करुन दिला जात होता. कृषीचा विकास दर 4 टक्क्याच्या पुढे नेण्याच्या संदर्भात आपला जो कार्यक्रम आहे त्या राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या अंतर्गत मलगुजारी तलावांचा कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. भंडारा जिल्हयातील मालगुजारी तलावांची 151 कामे पूर्ण झाली असून 402 मालगुजारी तलावांची कामे विविध योजनेतून गेल्या दोन वर्षात पूर्ण करण्यात आलेली आहेत. भंडारा आणि गोंदिया जिल्हयातील 120 मालगुजारी तलावांची कामे प्रगतीपथावर असून 193 कामे सर्व्हेक्षणामध्ये आहेत. मालगुजारी तलावांना राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून आता निधी दिला जात असून या योजनेतूनच मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात येतील.

श्री. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, भंडारा आणि गोंदिया जिल्हयात मालगुजारी तलाव मोठया प्रमाणात आहेत. हे मालगुजारी तलाव खाजगी पद्धतीने बांधण्यात आलेले आहेत. अनुशेष काढतांना मालगुजारी तलावांची सिंचन क्षमता जिल्हयाच्या सिंचन क्षमतेमध्ये दांडेकर समितीने धरली होती. बॅकलॉग आणि इंडिकेटर समिती समोर जेव्हा मालगुजारी तलावांचे मुद्दे आले त्यावेळी मापंदड बदलवत असतांना, या जिल्हयावर अन्याय होतो म्हणून त्यांनी स्वतंत्रपणे अनुशेष काढून दिलेला आहे. खाजगी पद्धतीने तयार करण्यात आलेल्या मालगुजारी तलावांची सिचंनक्षमता धरुन या जिल्हयांवर अन्याय झालेला आहे. यासंदर्भात माझे असे म्हणणे आहे की, भंडारा आणि गोंदिया जिल्हयात 3182 मालगुजारी तलाव आहेत परंतु हे तलाव आता उद्ध्वस्त झालेले असून, हे मालगुजारी तलाव अनेक वर्षापूर्वी बांधलेले असून गाळामुळे या तलावामध्ये पाणी साठले जात नाही, या मालगुजारी तलावांची पाणी साठवण्याची क्षमता संपलेली आहे. त्यामुळे या भागाचा अनुशेष भरुन काढण्याच्या दृष्टीने निश्चित असा कार्यक्रम शासन देणार आहे काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :51559...

श्री. बाळासाहेब थोरात : गोंदिया आणि गडचिरोली जिल्हयातील मालगुजारी तलाव 100 ते 250 हेक्टरच्या आतील आहेत. गोंदिया आणि गडचिरोली जिल्हयाच्या दृष्टीने मालगुजारी तलावाचा प्रश्न हा सर्वात मोठा आहे. मालगुजारी तलावाकडे शासनाने जाणीवपूर्वक लक्ष दिलेले आहे एवढेच नाही तर मालगुजारी तलावाच्या संदर्भात जलसंपदा विभागाच्या माध्यमातून सुध्दा ही कामे सुरु आहेत. मालगुजारी तलावाची कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे. मालगुजारी तलावाची कामे विशिष्ट कालखंडात पूर्ण व्हावीत यासंदर्भात सन्माननीय सदस्यांची जी अपेक्षा आहे ती निश्चितपणे पूर्ण केली जाईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, विदर्भाच्या दृष्टीने मालगुजारी तलावाचा प्रश्न हा फार महत्वाचा आहे. मालगुजारी तलाव हे खाजगी पद्धतीने बांधण्यात आलेले आहेत. मालगुजार म्हणजे खाजगी माणसे. आम्ही सुध्दा मालगुजार होतो परंतु आता आमचे फक्त पडके वाडे शिल्लक राहिलेले आहेत. माननीय मंत्रीमहोदय श्री.रामराजे निंबाळकरांना याची चांगली कल्पना आहे कारण जसे "राजे" संपले तसे "मालगुजार" संपले. खाजगी मलागुजारी तलाव आहेत असे म्हणून विदर्भाच्या संदर्भात जेव्हा बॅकलॉग काढण्यात आला तेव्हा मालगुजारी तलाव खाजगी असतांना देखील या तलावामुळे जे सिंचन होत होते ते सुध्दा बॅकलॉगमध्ये धरण्यात आले होते.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 51559...श्री.नितीन गडकरी ..

त्या सिंचनाशी या शासनाचा डायरेक्टली वा इन-डायरेक्टली काहीही सबंध नव्हता. दांडेकर समितीने चूक केली होती असे म्हणणे बरोबर होणार नाही परंतु ही बाब नजरचुकीने राहून गेली इंडीकेटर समिती समोर हा विषय आल्यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी. देशमुख यांनी सांगितल्या प्रमाणे इंडिकेटर समितीने ही बाब निदर्शनास आणून दिली होती की, भंडारा आणि गोदिंया या जिल्हयांवर अन्याय करणारा हा निर्णय आहे. सभापती महोदय, या ठिकाणी आदरणीय जलसंपदा मंत्री उपस्थित आहेत. माननीय कृषी मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, हा विषय त्यांच्या विभागाशी संबंधित नाही. बॅकलॉग काढत असतांना इंडिकेटर समितीने शासनाला शिफारस केलेली आहे की, त्यावेळी नजर चुकीने ही बाब राहून गेलेली आहे. तेव्हा मालगुजारी तलावाची दुरुस्ती करणें, गाळ काढणे, बॅकलॉग मध्ये या बाबी गृहीत धरणे या करता जर तरतूद केली तर भंडारा आणि गोदिंया या जिल्हयामध्ये कमीत कमी 80 हजार हेक्टर्स क्षेत्र ओलिता खाली येणार आहे. फार मोठा इम्पॅक्ट देणारा हा प्रश्न आहे आणि या संदर्भात इंडिकेटर समितीने देखील शिफारस केली आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी आता जी भावना व्यक्त केली आहे. त्यानुसार भंडारा आणि गोदिंया जिल्हयाच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळयाचा आणि भवितव्याचा हा प्रश्न आहे . माननीय जलसंपदा मत्र्यांनी जर या प्रश्नाचे उत्तर दिले तर या प्रश्नाला न्याय मिळेल.

तेव्हा इंडिकेटर समितीने केलेल्या शिफारशीप्रमाणे शासन विचार करणार आहे काय ?

श्री.अजित पवार :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख आणि सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी या ठिकाणी जो प्रश्न विचारला आहे त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, जलसंपदा विभागाची भूमिकासुध्दा तशीच आहे. या वर्षी जलसंपदा विभागाने यांत्रिकी विभागाकरिता नवीन मशिनरी विकत घेतली आणि जेवढे पैसे जल संधारण विभाग या मालगुलारी तलावाच्या दुरुस्तीकरता देऊ शकेल तेवढे पैसे तो विभाग खर्च करीत आहे. मालगुजारी तलावाची क्षमता 100 हेक्टर्स आहे की 250 हेक्टर्सची आहे या संदर्भात कोणताही भेदाभाव न करता बाकीच्या तलावाच्या संदर्भात आपण यांत्रिकी विभागाची मशिनरी उपलब्ध करुन देऊन त्यातून काही तलावाची दुरुस्ती करीत आहोत. भंडारा आणि गडचिरोली या दोन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 51559.. श्री.अजित पवार...

जिल्हयामध्येच हे तलाव आहेत असे नाही तर चंद्रपूर जिल्हयामध्ये अशा प्रकारचे तलाव आहेत तसेच नांदेड जिल्हयामध्ये सुध्दा अशाच प्रकारचे तलाव आहेत.सभापती महोदय, मी सभागृहाला या निमित्ताने सांगू इच्छितो की, येणा-या बजेटमध्ये देखील खास मालगुजारी तलावाच्या नूतनीकरणाकरिता, दुरुस्ती करण्याकरिता काही तरतूद कशी करता येईल या दृष्टीने जल संपदा विभाग निश्चित प्रयत्न करणार आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : शोक प्रस्ताव

**मु.शी.** : श्री.एम.ए.अजीज, माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री.छगन भुजबळ ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री.एम.ए.अजीज, माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव माडतो :-

" श्री. एम.ए.अजीज, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते "

कै.एम.ए. अजीज यांचा जन्म 12 जून 1945 रोजी जालना येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.एस्सी., एम.बी.बी.एस., सी.एम्.एस.सी. पर्यत झाले होते.

कै. अजीज यांनी कॉलेज ऑफ एज्युकेशन खिलाफत कमिटीचे व्हाईस चेअरमन, उर्दू एज्युकेशन सोसायटी, औरंगाबाद व सेंटर फॉर हिस्टॉरिकल स्टडिज इन इंडियाचे चेअरमन, होमगार्डस् ॲन्ड सिव्हील डिफेन्स संस्थेचे अधिव्याख्याता तसेच खैरुल इस्लाम हायर एज्युकेशन सोसायटी, ऑल इंडिया खिलाफत कमिटी व हिंदू - मुस्लिम सेंटर ऑफ युनिटी, मुंबईचे विश्वस्त म्हणूनही काम केले होते. ते कॉग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते.

कै. अजीज यांना 1984 मध्ये उत्कृष्ट " समाज सेवा कार्याबद्दल " राष्ट्रपतीपदक तसेच 1997 मध्ये अमेरिकन बायोग्राफिकल इन्स्टिटयूटकडून " विसाव्या शतकातील उत्कृष्ट सामाजिक सेवेबद्दलचा " पुरस्कारही मिळाला होता.

कै. अजीज हे सन 2002 मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर नामनियुक्त झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे शुक्रवार, दिनांक 8 मे 2009 रोजी दु:खद निधन झाले.

-----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ( नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या सभागृहातील आमचे सहकारी श्री.एम.ए.अजीज यांच्या दु:खद निधनाबद्दलचा जो शोक प्रस्ताव माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी मांडला आहे त्याचे मी समर्थन करतो . या शोक प्रस्तावाच्या संदर्भात त्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्याच्याशी मी सहमत आहे . श्री.एम.ए.अजीज हे उच्च विद्याविभूषित आणि सामाजिक सेवेची तळमळ असलेले उत्तम कार्यकर्ते होते .

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

विशेषत: या सभागृहामध्ये वक्फ बोर्डाच्या जमिनींबाबत बरीच चर्चा झाली तेव्हा त्या संबंधात व्यक्तीश: त्यांच्या संबंधात काही वक्तव्य माझ्याकडून घडले होते. त्यानंतर त्यांनी माझ्याकडे स्वत: येऊन त्याबाबतीतील त्यांची भूमिका माझ्यासमोर स्पष्ट केली आणि घडलेल्या घटना कशा कशा आहेत याचीही माहिती दिली. सभापती महोदय, हा विषय जरी वेगळा असला तरी मी आपल्याला आवर्जून सांगू इच्छितो की, मरहूम डॉ. एम.ए.अजीज हे अतिशय खिलाडू वृत्तीचे होते असा माझा अनुभव आहे. या सभागृहाच्या कामकाजामध्ये देखील उच्च विद्याविभूषित असलेल्या डॉ. अजीज यांनी चांगल्या प्रकारे आपला ठसा उमटविला आहे. विशेषत: सामाजिक सेवेतील प्रश्न अत्यंत तळमळीने ते मांडत असत. व्यक्तिगत जीवनामध्येही ते माझे अगदी चांगले स्नेही असणारे असे एक मित्र आपल्यातून गेलेला आहे. सभापती महोदय, मी भारतीय जनता पक्षाच्या वतीने तसेच माननीय विरोधी पक्षनेता यांच्याकडे देखील काही दु:खद घटना घडली असल्याने ते आज येथे उपस्थित राहू शकले नाहीत पण त्यांच्या वतीने देखील मी डॉ. अजीज यांना श्रद्धांजली वाहतो आणि देव त्यांच्या आत्म्यास शांती देवो अशी प्रार्थना करतो.

**

प्रा. बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, अगदी आता आतापर्यंत आपल्या सभागृहाचे सदस्य असलेले, 2002 पासून 2008 पर्यंतच या सदनाचे सदस्य असलेले डॉ. एम.ए.अजीज यांचे दु:खद निधन झाले आहे त्याबद्दल माननीय उपमुख्यमंत्र्यांनी जो शोक प्रस्ताव येथे मांडला आहे त्यावर माझ्या सहवेदना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. डॉ. एम.ए.अजीज हे आताच सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी म्हटल्याप्रमाणे उच्च विद्याविभूषित होतेच पण आपल्या समाजाचे प्रतिनिधीत्व करीत असताना या सभागृहामध्ये त्यांची एक विशिष्ट पद्धत होती. आक्रमकपणे बोलणे हा त्यांचा स्वभाव नसतानाही काही वेळेस, प्रसंगी काही गोष्टी अगदी स्पष्टपणे येथे मांडण्याची वेळ आली तेव्हा तशाच प्रकारे भूमिका त्यांनी घेतली होती. अगदी ही एक दोन वर्षातील गोष्ट आहे. त्या घटनेची आठवण झाल्यावाचून राहत नाही. अशा या मरहूम डॉ. अजीज यांना मी मनापासून श्रद्धांजली अर्पण करतो.

**

..... एन 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते आणि माननीय उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांनी डॉ. एम.ए.अजीज, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे. डॉ. अजीज हे या सदनामध्ये सदस्य म्हणून होते आणि ते एक प्रामाणिक आणि काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत असे कार्यकर्ते होते. ते इतक्या लवकर आपल्यातून जातील असे कधीही वाटले नव्हते. या सदनातून सदस्य म्हणून निवृत्ती घेताना त्यांना एका अत्यंत क्लेषकारक अनुभवातून जावे लागले होते त्याची आठवण आता होते. ते महाराष्ट्र वक्फ बोर्डाचे अध्यक्ष होते आणि त्यांच्या कारकीर्दीमध्ये त्या बोर्डाच्या जमिनी हडप करण्यात आल्या असा आरोप त्यांच्याच पक्षातील काहींनी विशेषत: त्यांच्याच पक्षातील एका मंत्र्याने समोरासमोर केला होता आणि या सभागृहामध्ये त्यासंबंधात जवळपास दोन तास मोठी चर्चा झाली. त्यावेळेस त्यांनी सांगितले होते की, माझ्या हातून अशा प्रकारचे पाप घडले असेल तर मी तत्काळ राजीनामा देईन. त्यावेळेस त्यांनी केलेले भाषण मला आजही आठवते. सभापती महोदय, या सदनामध्ये सदस्य म्हणून ते सभागृहाच्या सर्वच कामकाजामध्ये अगदी हिरिरीने भाग घ्यायचे आणि विशेष म्हणजे तेव्हा केव्हाही या सभागृहात मराठीमध्येच आवर्जून भाषण करायचे. ते काँग्रेस पक्षाशी अत्यंत निष्ठावंत असल्याने पक्षाला अडचणीत आणणारे विषय वा प्रश्न ते केव्हाही करीत नसत. विशेषत: मराठवाड्यातील सामाजिक प्रश्न घेऊन ते येथे अनेकदा बोलायचे. असे आमचे सहकारी सदस्य आता आपल्यातून कायमचे निघून गेलेले आहेत. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या आत्म्यास शांती मिळावी अशी प्रार्थना करतो.

( यानंतर श्री. सरफरे ....ओ 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी मरहूम डॉ. महमूद अब्दूल अजीज, माजी विधान परिषद सदस्य यांच्या दु:खद निधनाबद्दल जो दुखवटयाचा प्रस्ताव मांडला आहे त्याला सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी व अन्य सन्माननीय सदस्यांनी पाठिंबा दिला आहे. या शोक प्रस्तावावर मी सुध्दा माझ्या सहभावना व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

मरहूम डॉ. अजीज यांचा जन्म 12 जून 1945 रोजी जालना येथे झाला. त्यांचे वैद्यकीय क्षेत्रातील शिक्षण बी.एस्सी व एम.बी.बी.एस., सी.एम.एस.सी. पर्यंत अत्यंत चांगल्या पध्दतीने झाले. डॉ. अजीज यांनी कॉलेज ऑफ एज्युकेशन खिलापत कमिटीचे व्हाईस चेअरमन, उर्दू एज्युकेशन सोसायटी औरंगाबाद व सेंटर फॉर हिस्टॉरिकल स्टडिज इन इंडियाचे चेअरमन, होमगार्डस् अँड सिव्हिल डिफेन्स संस्थेचे अधिव्याख्याता तसेच खैरुल इस्लाम हायर एज्युकेशन सोसायटी, ऑल इंडिया खिलापत कमिटी व हिंदू-मुस्लिम सेंटर ऑफ युनिटी, मुंबईचे विश्वस्त म्हणूनही काम केले. मरहूम डॉ.अजीज हे

कॉंग्रेसचे एक निष्ठावंत असे कार्यकर्ते होते. तसेच, त्यांनी सन 2002 पासून 2008 पर्यंत या सदनाचे सदस्य म्हणून काम केले आहे. या सदनामधील अत्यंत परखड विचाराचा, स्पष्ट बोलणारा आणि समाजातील सर्वांशी अत्यंत जीवाभावाच्या नात्याने संबंध ठेवणारा अशापध्दतीचा सार्वजनिक क्षेत्रातील एक सहकारी मित्र म्हणून त्यांच्याकडे हे सदन पहात होते. ते माझे फार जवळचे सहकारी मित्र होते. ते अचानकपणे आपल्यातून जातील असे कुणालाही वाटले नव्हते. दिनांक 8 मे 2009 रोजी त्यांचे दु:खद निधन झाले. त्यांच्या कुटुंबियांवर ओढवलेल्या दु:खद प्रसंगामध्ये मी व्यक्तिश: सामील आहे.

सन्माननीय सदस्यांनी स्तब्ध उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोकप्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकुल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

आता मी सभागृहाचे कामकाज 15 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

(2.13 ते 2.29 पर्यंत बैठक स्थगित झाली.)

------

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/MMP/KGS पूर्वी श्री.सरफरे . . . . 14:25

(स्थगितीनंतर)

**सभापतीस्थानी - माननीय सभापती**

**विद्यमान सन्माननीय सदस्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा**

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे व सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांचा आज वाढदिवस असल्यामुळे सभागृहाने त्यांचे अभिनंदन करावे अशी मी विनंती करतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे व सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांच्या वाढदिवसानिमित्त हे सभागृह त्यांचे अभिनंदन करीत आहे व त्यांना शुभेच्छा देत आहे.

----

. . . .पी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहातील गणपूर्तीबाबत

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,सभागृहामध्ये कोरम नाही. याठिकाणी माननीय राज्यपालांनी नियुक्त केलेल्या 12 सन्माननीय सदस्यांनी तरी किमान सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहे. आता सभागृहात सत्ताधारी पक्षाचे एकही सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत.शासनाला याची जाणीव होण्यासाठी तरी सभागृहाचे कामकाज किमान पाच मिनिटांसाठी तहकूब करावे अशी माझी विनंती आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय कृषी मंत्री सभागृहात बसलेले आहे त्यांना याबाबतीत काही सांगावयाचे आहे काय?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, कामकाज सुरु करावे तो पर्यंत सदस्य सभागृहात येतील.

**सभापती** : ठीक आहे.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MMP/

**पृ.शी./मु.शी.**: अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

श्री. हसन मुश्रीफ ( नगरविकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, सन 2009 चा अध्यादेश क्रमांक 3- महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (तात्पुरत्या तरतुदी) अध्यादेश, मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** :अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन 2009 चा अध्यादेश क्रमांक 7- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** :अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय,सन 2009 चा अध्यादेश क्रमांक 5- महाराष्ट्र वैद्यकीय सेवा - व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन 2009 चा अध्यादेश क्रमांक 8 - मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर अनुक्रमांक 9 वर माननीय मुख्यमंत्र्यांचा विधेयक मागे घेण्याबाबतचा प्रस्ताव दाखविण्यात आला आहे, तो मांडण्यास मला अनुमती द्यावी.

**सभापती** : ठीक आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** महानगरपालिका व नगरपरिषदा (दुसरी सुधारणा )
विधेयक.

**L.A. BILL NO. XXVI OF 2008.**

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

श्री. हसन मुश्रीफ ( नगरविकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, सन 2008 चे विधानसभा विधेयक क्रमांक 26- मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,1949,नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम,1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा,नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यकरिता विधेयक, मागे घेण्यास मी सभागृहाची अनुमती मागातो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक मागे घेण्यास सभागृहाची अनुमती आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती माहोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.स.वि.26 मागे घेतो.

**सभापती** : सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 26 मागे घेण्यात आले आहे.

----

..4..



**पृ.शी./मु.शी.:** अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.(पुढे सुरु..)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात (कृषी मंत्री ) : सभापती महोदय, सन 2009 चा अध्यादेश क्रमांक 6- महाराष्ट्र कापूस बी-बीयाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन 2009 चा अध्यादेश क्रमांक 4 - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन 2009 चा अध्यादेश क्रमांक 9 - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब तंत्रशास्त्र विद्यापीठ व कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) ( सुधारणा ) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर अनुक्रमांक दहावर विधेयक मागे घेण्याबाबतचा प्रस्ताव दाखविण्यात आला आहे तो मांडण्यास मला अनुमती द्यावी.

**सभापती** : ठीक आहे.

..5.



**पृ.शी.**: कापूस बी-बीयाणे (पुरवठा, वितरण विक्री व विक्रीच्या किमतीचे

निश्चितीकरण यांचे विनियमन ) विधेयक.

**L.A. BILL NO. LXIII OF 2008.**

(A BILL TO REGULATE THE SUPPLY, DISTRIBUTION, SALE AND FIXATION OF SALE PRICE OF COTTON SEEDS AND FOR THE MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री. बाळासाहेब थोरात (कृषी मंत्री) : सभापती महोदय, सन 2008 चे विधानसभा विधेयक क्रमांक 63 कापूस बी-बियाण्यांचा पुरवठा,वितरण व विक्री करणे,तसेच त्यांची विक्री किंमत निश्चित करणे याबाबत विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित वा तदनुषंगिक बाबींसाठी विधेयक मागे घेण्यास मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 63 मागे घेतो.

**सभापती** :सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 63 मागे घेण्यात आले आहे.

---

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विधेयकांना अधिसंमती

**सभापती** : दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याची यादी सचिव वाचून दाखवतील.

सचिव : खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली.

(1) सन 2006 चे विधानसभा विधेयक क्रमांक 72- मुंबई महानगरपालिका (तिसरी सुधारणा ) विधेयक, 2006.

(2) सन 2009 चे विधानसभा विधेयक क्रमांक 1- महाराष्ट्र (पुरवणी ) विनियोजन विधेयक, 2009

(3) सन 2009 चे विधानसभा विधेयक क्रमांक 2- महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक, 2009.

(4) सन 2009 चे विधान परिषद विधेयक क्रमांक 1- महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, 2009.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : नियम 93 अन्वये आज ज्या सूचना आलेल्या आहेत त्यामध्ये यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, मधुकर चव्हाण, विनोद तावडे यांनी " ठाणे शहरात मोठ्या प्रमाणात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होणे, महानगरपालिका आवश्यक पाण्यापेक्षा केवळ 50 टक्के पाणीपुरवठा करीत असून पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करण्यास करीत असलेली टाळाटाळ, शहरात अवैध नळ जोडण्या असून अनधिकृत बांधकामांना चोरटा पाणीपुरवठा होत असल्याने शासनाचे कोट्यवधी रुपयांचे होत असलेले नुकसान " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर, मधुकर चव्हाण यांनी "कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत सुमारे 319 कामगार रोजंदारी तत्वावर गेल्या 14 वर्षापासून काम करीत असून सदर कामगारांना सेवेत कायम करण्याचा निर्णय महासभेने ठराव संमत करुनही या प्रस्तावावर शासनाची अंमलबजावणी न झाल्याने सदर कर्मचाऱ्यांनी आंदोलन करण्याचा दिलेला इशारा " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर, मधुकर चव्हाण यांनी " ठाणे जिल्ह्यातील विविध धरणांमधील पाणी मुंबई महापालिका, जलसंपदा विभाग आणि औद्योगिक विकास महामंडळाकडून उचलले जाऊन सदर पाणी कारखाने, महापालिका व नगरपालिका इत्यादी संस्थांना विकून त्याव्दारे शासनास कोट्यवधी रुपयांचा महसूल मिळणे, डिसेंबर, 2008 अखेर पाणी उचललेल्या संस्थांनी उपकरापोटीची सुमारे 30 कोटी रुपये अद्यापही जिल्हा परिषदेस न दिल्याने जिल्ह्यांच्या विकास कामांना निधी उपलब्ध न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .......

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री जयंत प्र. पाटील, कपिल पाटील यांनी " मुंबई-पुणे महामार्गावर खोपोली फाट्यावर दिनांक 31.5.2009 रोजी ट्रेलरने दिलेल्या धडकीने चौघेजण ठार तर नऊ जण जखमी होणे, सदरच्या अपघातामुळे संतप्त जमावाने महामार्गावर दगडफेक करुन खोपोली शहरात बंद पुकारणे, यामुळे सदर महामार्गावरील वाहतूक 5 तास खोळंबणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अनिल परब यांनी "मराठवाड्यात नेहमीच पावसाळ्यात धुमाकूळ घालणाऱ्या विजेने गेल्या पाच वर्षात 486 जणांचा बळी घेणे, या विभागात वीज कोसळण्याचे प्रमाण जास्त असल्याने प्रत्येक जिल्ह्यात वीज रोधक यंत्र बसविण्याचा शासनाने निर्णय घेऊन प्रत्येक जिल्ह्याला एक लाख रुपयांचा निधी देणे, तथापि औरंगाबाद जिल्ह्याचा अपवाद वगळता एकाही जिल्ह्याला सदर वीज रोधक यंत्रे गेल्या दोन वर्षापासून बसविलेली नसणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

**पृ.शी./मु.शी.**: विशेष उल्लेख

**सभापती** : आज विशेष उल्लेखाची कोणतीही सूचना आलेली नाही.

---

**पृ.शी./मु.शी.**: सदस्यांच्या राजीनाम्याची घोषणा.

**सभापती** : नाशिक विभाग पदवीधर मतदारसंघातून महाराष्ट्र विधान परिषदेवर निवडून आलेले श्री. प्रताप नारायणराव सोनवणे, वि. प. स. यांनी महाराष्ट्र विधान परिषदेतील त्यांच्या जागेचा दिलेला राजीनामा मी मंगळवार, दिनांक 26, मे, 2009 रोजी मध्यान्होत्तर स्वीकारला आहे.

---

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS

**पृ.शी./मु.शी.**: सभापती तालिका नामनिर्देशित करणे

**सभापती** : मी महाराष्ट्र विधान परिषद नियमातील नियम 8(1) अन्वये खालील सभासदांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित करतो :-

(1) श्रीमती अलका देसाई

(2) श्री. हेमंत टकले

(3) श्री. संजय केळकर

(4) श्री. सुरेश जेथलिया

--

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**</u>

**सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या अर्धा तासाच्या चर्चा आज घेण्यात येणार नाहीत. त्याऐवजी मी मघाशी जाहीर केल्याप्रमाणे गडचिरोली जिल्हयात नक्षलवाद्यांनी पोलिसांवर केलेल्या हल्ल्यासंबंधी नियम 97 खाली चर्चा घेण्यात येणार आहे. आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.10 वाजता पुन्हा भरेल.

( दुपारी 2.40 ते 3.10 पर्यंत मध्यंतर )

----

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मध्यंतरानंतर**

**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**सभागृहातील गणपूर्तीसंबंधी**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहामध्ये गणपूर्ती नाही. मला माफ करा, परंतु अशा प्रकारे जर ट्रेझरी बेंच या सभागृहाला अवमानित करु लागला तर ती अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. मी मघाशी ही बाब आपल्या निदर्शनास आणून दिली होती आणि आताही तिच परिस्थिती आहे. सभागृहामध्ये अत्यंत महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु होत असताना सत्ताधारी पक्षाचे केवळ दोनच सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये उपस्थित आहेत. गडचिरोलीमध्ये नक्षलवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात पोलीस कर्मचारी ठार झाल्यासंबंधीच्या विषयावर या सभागृहामध्ये चर्चा सुरु करावयाची असेल तर माननीय गृहमंत्री सभागृहामध्ये उपस्थित असणे आवश्यक आहे. तेव्हा सभागृहामध्ये नसलेल्या गणपूर्तीचा मी निषेध व्यक्त करुन सभागृहाची बैठक 15 मिनिटाकरिता तहकूब करावी अशी मी आपणास विनंती करतो. तसेच सभागृहामध्ये गणपूर्ती ठेवण्यासंबंधी सरकारला आपल्या दालनामध्ये योग्य ती समज द्यावी. आज अधिवेशनाचा पहिला दिसून असून सुरुवातीपासूनच या सभागृहाला सरकारने अवमानित करण्याचे ठरविले असेल तर दुर्दैवाने आम्हाला देखील आमच्या पध्दतीने समाचार घेणे भाग पडेल आणि मग त्याबद्दल आपण आम्हाला दोष देऊ नका.

श्री. विनोद तावडे : अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासूनच सभागृहामध्ये गणपूर्ती नसणे योग्य नाही. सत्ताधारी पक्ष विरोधी पक्षाला इतका लाईटली घेत असेल तर त्याबाबतीत चिंता व्यक्त करावीशी वाटते.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहाचे काम अत्यंत योग्य पध्दतीने चालावे यादृष्टीकोनातून सत्तारुढ पक्षाने कटाक्षाने काळजी घेणे गरजेचे आहे. या सभागृहात माननीय रोजगार हमी योजना मंत्री उपस्थित आहेत. त्यांच्या माध्यमातून मी जरुर सांगू इच्छितो की, संसदीय कामकाज मंत्र्यांना तसेच गृहमंत्र्यांना आपण सांगा. पहिल्या दिवशीच अशा पध्दतीने कामकाज झाले तर त्याची नैतिक जबाबदारी सत्तारुढ पार्टीवर जरुर येते. हा प्रकार आणि ही पध्दत एकंदरीत संसदीय प्रथा आणि परंपरेच्या दृष्टीने योग्य नाही. सभागृहात माननीय गृहमंत्री उपस्थित नाहीत, माननीय गृहराज्यमंत्री उपस्थित नाहीत. माननीय गृहमंत्री अथवा माननीय गृह राज्यमंत्र्यांनी चर्चेसाठी सभागृहात उपस्थित रहावे असा माझा त्यांना निरोप द्यावा. आता मी सभागृहाचे कामकाज 15 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

श्री. मदन पाटील : सभापती महोदय, आपल्या निदेशाप्रमाणे मी माननीय मंत्री महोदयांना सभागृहात उपस्थित राहण्याबाबतचा निरोप देतो.

**सभापती** : ठीक आहे. आता मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.17 ते 3.32 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

यानंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**पृ.शी.**: गडचिरोली जिल्हयातील धानोरा येथे नक्षलवाद्यांबरोबर झालेल्या भीषण चकमकीत 2 पोलीस अधिकाऱ्यांसह 16 पोलीस जवांनाचा झालेला मृत्यू

**मु.शी.**: गडचिरोली जिल्हयातील धानोरा येथे नक्षलवाद्यांबरोबर झालेल्या भीषण चकमकीत 2 पोलीस अधिकाऱ्यांसह 16 पोलीस जवांनाचा झालेला मृत्यू यासंबंधी श्री.दिवाकर रावते, डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**सभापती** : या चर्चेसाठी एकूण अडीच तासांचा वेळ निश्चित करण्यात आला आहे. अडीच तासाच्या वेळेत ही चर्चा पूर्ण करावयाची आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे प्रस्ताव मांडतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"दिनांक 21 मे, 2009 रोजी वा त्यासुमारास गडचिरोली जिल्हयातील धानोरा ते मुरुमगाव मार्गावर सुमारे 500 नक्षलवाद्यांबरोबर झालेल्या भीषण चकमकीत दोन पोलीस अधिकाऱ्यांसह 16 पोलीस जवान ठार होणे, त्यात पाच महिला पोलिसांचा समावेश असणे, तीन महिन्यांच्या आत दुसऱ्यांदा ही घटना घडणे, अशीच घटना 30 जानेवारी, 2009 रोजी धानोरा तालुक्यातील मस्के गावात झालेल्या चकमकीत पोलीस उपनिरीक्षकांसह नक्षलवाद्यांनी 15 पोलिसांचे गळे चिरुन त्यांना ठार मारण्यात येणे, चकमकीनंतर मृत पोलिसांची सर्व शस्त्रे व दारुगोळा लुटून नेण्यात येणे, नक्षलग्रस्त भागात बंदोबस्ताला जाताना तेथील नक्षलग्रस्तांची संख्या व शस्त्रसज्जता याबाबतची गुप्त माहिती घेवूनच त्या तुलनेत पोलिसांच्या तुकड्या पाठविणे आवश्यक असून नक्षलग्रस्त भागात बेसावधपणा दाखविलेल्या शस्त्रसज्ज 500 नक्षलवाद्यांनी पोलिसांवर गोळीबार करुन त्यांना ठार केल्याने शासनाची त्या परिसरातील गुप्तवार्ता संघटनेला नक्षलवाद्यांच्या संख्येचा अंदाज न आल्याने

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते......

इतक्या मोठया संख्येने पोलीस ठार झाल्याने नक्षलवाद्यांचा बंदोबस्त करण्यास शासनाला आलेले अपयश, याबाबत जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट, यावर शासनाने करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, मी अत्यंत दु:खद अंतकरणाने हा प्रस्ताव मांडण्यास उभा आहे. सरकारची नाचक्की करावी, सरकारच्या ध्येयधोरणावर टीकाटिप्पणी करावी, सरकारचे अपयश सांगावे ही भावना नाही. दुर्दैवाने जे घडले त्यातून जे जे पुढे येईल ते कसे स्वीकारावे हा प्रश्न सदनाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या जनतेला पडला आहे. अशी ही गंभीर घटना आहे. 25 मे, 2009 रोजी राज्यातील सर्वच वृत्तपत्रांच्या प्रथम पृष्ठावर या घटनेची बातमी वाचावयास मिळाली. त्या दिवशीची पहाट वृत्तपत्र वाचण्याकरिता अत्यंत धक्कादायक आणि गंभीर विचार करायला लावणारी अशी होती. निवडणुका पार पडल्या होत्या. निवडणुकीचे निकाल लागले होते. काही जण सुखात होते तर काही जण दु:खी होते. निवडणुकीच्या निकालाची चिकित्सा सुरु होती. अशा वेळेला गडचिरोली जिल्हयातील धानोरा गावात नक्षलवाद्यांनी पेरलेल्या भूसुरुंगाचा स्फोट होऊन 16 पोलीस मृत्युमुखी पडले. प्रथमत: 4 महिला पोलीस मृत्युमुखी पडल्याची नोंद झाली. पोलिसांच्या दुर्दैवाची कारणे नेहमी वाचली जातात. पोलिसांच्या भ्रष्टाचाराबद्दल, 26/11 च्या घटनेनिमित्त सदनामध्ये चर्चा होईल त्यावेळी जरुर बोलता येईल. शूर पोलिसांबद्दल आणि जबाबदारी टाळणाऱ्या अधिकाऱ्यांबद्दल बोलता येईल.

(नंतर डब्ल्यु.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .......

हे सगळे होत असताना महिन्याभरापूर्वी सतत आणि सातत्याने राज्यात पोलिसांची संख्या कमी आहे त्यामुळे त्यांच्यावर निर्माण झालेला ताण, पोलिसांना निरुपयोगी शस्त्रास्त्रे देण्याबाबतची चर्चा तर सभागृहात नेहमीच होत असते. मग पोलीस दल सक्षम कसे होणार यासंबंधीची चर्चा होते आणि त्यासाठी या सदनात मंत्री महोदय शासनाच्या वतीने, आम्ही भविष्यात पोलीस दल सक्षम होण्यासाठी काय करणार यासंबंधीचे आडाखे बांधत असतात. दुर्दैव मात्र असे आहे की, या सदनात जी आश्वासने दिली जातात त्यांची पूर्तता होते की नाही याचाही विचार करणे अगत्याचे असते. हजारो आश्वासने सभागृहाच्या माध्यमातून शासनाने दिली परंतु त्यांची पूर्तता झालेली नाही आणि हे सुध्दा देशात नंबर एक वर असलेल्या राज्याच्या बाबतीत, ही खेदजनक बाब आहे. या राज्यातील पोलिसांच्या संदर्भात सभागृहाच्या माध्यमातून वारंवार हीच दुर्दैवी घटना आम्ही मांडत आलो आणि आजही मांडावी लागत आहे. म्हणून आश्वासन समितीच्या माध्यमातून अशा प्रकारचे काही विषय तातडीने घेता येतील काय याबाबत सर्वपक्षीय सन्माननीय सदस्यांनी विचार करणे आवश्यक आहे. कारण समितीमध्ये सर्वच पक्षाचे आमदार सदस्य म्हणून असतात. निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर दिल्लीत जल्लोष होता, काँग्रेस पक्ष विजयी झालेला होता आणि शपथविधीची तयारी सुरु होती. शपथविधीची चर्चा सुरु असताना नक्षलवाद्यांनी अत्यंत रक्तरंजित अशी सलामी देऊन शासनाला सांगून टाकले की, देशाला पाकिस्तानी अतिरेक्यांकडून धोका असताना आम्ही त्याच्याही पुढे एक पाऊल टाकून काम करु लागलो. दहशतवाद्यांपेक्षाही पुढचे पाऊल स्वकीयांनी टाकल्याची ही घटना आहे. यवतमाळमध्ये ज्या अय्यरांची प्रेतयात्रा निघाली त्या अंत्ययात्रेला हजारोच्या संख्येने सहभागी होऊन लोकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. हे सर्व मी ज्यावेळेस वाचले त्यावेळेस मी देखील सैरभैर झालो. यवतमाळ, वाशिम, अकोला भागात संध्याकाळी 4 ते 7 च्या दरम्यान आमच्या शहीद झालेल्या पोलिसांना श्रध्दांजली अर्पण करण्याचा कार्यक्रम शिवसेनेच्या वतीने ठेवला होता. हा कार्यक्रम शिवसेनेचा असला तरी पक्षाच्या पलिकडे जाऊन लोक उपस्थित होते. त्यात अनेक डॉक्टर्स, वकील अशा थोर मंडळींनी एकत्र येऊन आपल्या भावना व्यक्त केल्या. मी हे केवळ सभागृहात नोंद व्हावी म्हणूनच सांगत नाही तर राज्यातील जनतेच्या भावना किती तीव्र आहेत हे सांगण्याचा प्रयत्न करीत आहे.

....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

दि. 26.11.2008 च्या घटनेनंतर पाकिस्तानी अतिरेक्यांच्या विरोधात राज्यातील जनतेची जी तीव्र भावना होती तीच भावना नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात जे पोलीस जवान मृत्युमुखी पडले होते त्यावेळेस व्यक्त करण्यात आली. त्यासंबंधी आजच्या चर्चेतून शासन किती बोध घेणार आहे. या हल्ल्यात श्री. अशोक अय्यर, उप निरीक्षक श्री. घोरपडे, श्री. मांदाडे, श्री. श्री. उसेंडी, श्री. सुरेश किरंगे रा. मालेवाडा, श्री. मडावी, रा. जाराबंडी, श्री. नैताम, रा. गडचिरोली, श्री. शेट्टीवार, रा. चामोरशी, श्री. टेंभुर्णे, राह. वळसा तसेच महिला पोलीस श्रीमती गेंदकुंवर अरेदिया, रा. मुरुमगांव, श्रीमती अलका गावंडे, रा. कुरखेडा, श्रीमती शकुंतला आलाम, राह.अहेरी, श्रीमती शोभा नाडे, रा. वळसा, श्रीमती सुनीता कालो, रा. धानोरा यानंतर वाहनचालक श्री. दुर्गे व श्री. रोहणकर असे 16 पोलीस जवान नक्षलवाद्यांचे बळी ठरले. मी ही नावे वाचण्याचे कारण असे की, विधिमंडळाच्या कार्यवाहीच्या पुस्तिकेत ती कायमची नोंदली जावीत म्हणून वाचली. 26.11 च्या घटनेनंतर थोड्याच कालावधीत ही दुर्दैवाची घटना घडली व 16 पोलीस त्यात शहीद झाले. यासंबंधी फार मोठी चर्चा करावी अशा मन:स्थितीत मी नाही किंवा विरोधी पक्षाने प्रस्ताव आणून कुठेतरी शासनाची लक्तरे टांगली अशाही मताचा मी नाही. ही लक्तरे तुमची आमची सर्वांचीच आहेत. राज्यातील जनतेचा आक्रोश कसा आहे त्याचा जाब आपल्यालाच द्यावा लागणार आहे. शेवटी ही जबाबदारी शासनाचीच असते. विरोधी पक्षाने शासनाच्या प्रयत्नांना साथ दिली पाहिजे हे खरे असले तरी शासनाचीच ही जबाबदारी आहे व ती त्यांनी स्वीकारली पाहिजे, अशी ही घटना आहे. खरे म्हणजे नक्षलवादी चळवळ ही सुरुवातीला बरीच वाटायची कारण एका शोषित घटकाला न्याय देण्यासाठी निर्माण झालेले हे आंदोलन असे त्याचे स्वरुप होते.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, नक्षलवादाच्या चळवळीला हिमालयाच्या पायथ्याच्या गावापासून सुरुवात झालेली आहे. त्या ठिकाणी एका सावकाराने एका शेतक-याची जमीन बळजबरीने ताब्यात घेतली होती व त्यामध्ये एका शेतमजूराची हत्या झाली व त्यापासुनच नक्षलवादी चळवळीला सुरुवात झालेली आहे. अन्यायाविरुध्द लढण्यासाठी 1966 मध्ये शिवसेनेची स्थापना झाली होती आणि बरोबर एक वर्षाने कम्युनिस्ट नेते श्री. चारु मुजूमदार यांनी जमिनदारांविरुध्द लढा देण्यासाठी नक्षलवादी चळवळ सुरु केली आणि या चळवळीमधून प्रतिगामी आणि पुरोगामी चळवळीला सुरुवात झाली. जे अन्यायग्रस्त व शोषित आहेत त्यांना या चळवळीमुळे न्याय मिळेल या दृष्टीकोनातून या चळवळीकडे सुरुवातीला राज्यकर्त्यांनी पाहिले होते. या चळवळीला बंगालपासून सुरुवात झाली होती. शोषित लोकांना न्याय मिळावा यासाठी या चळवळीला माननीय शिवसेना नेते श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी जाहीर पाठिंबा दिला होता. त्यावेळी विविध पक्षाच्या मोठ-मोठया लोकांनी शोषित लोकांना न्याय मिळावा या भावनेने या चळवळीला पाठिंबा दिला होता. या चळवळीचा एवढा मोठा भस्मासूर तयार होईल याची त्यावेळेस कोणालाही कल्पना आली नव्हती. त्यामुळे नक्षलवादाच्या संदर्भात अभ्यास करण्याची गरज आहे, असे मला या ठिकाणी खेदाने म्हणावेसे वाटते. नक्षलवादी चळवळ अगोदर जेथे दाट जंगल होते तेथपर्यंतच मर्यादित होती. नक्षलवादी चळवळ ही केवळ महाराष्ट्रापुरतीच मर्यादित आहे असे नाही. गेल्या पाच वर्षामध्ये केंद्रशासनाला डाव्यानी पाठिंबा दिला होता व त्या पाच वर्षामध्येच या नक्षलवाद चळवळ सगळीकडे म्हणजे संपूर्ण देशात जोमाने पसरली गेली. आता या नक्षलवादी चळवळीने जवळ जवळ 8-9 राज्यात आपले हातपाय चांगल्या पध्दतीने पसरविलेले आहेत. नक्षलवादी चळवळ आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, बिहार, केरळ व कर्नाटकपर्यंत गेलेली आहे. गेल्या पाच वर्षात डाव्यांचा केंद्र सरकारला पाठिंबा असल्यामुळे ही चळवळ मोठया प्रमाणात संपूर्ण देशात पसरली गेली. त्यामुळे या चळवळीच्या संदर्भात गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. दिनांक 21 मे, 2009 रोजी गडचिरोली जिल्हयातील धानोरा ते मुरुमगाव मार्गावर सुमारे 500 नक्षलवाद्यांबरोबर झालेल्या भीषण चकमकीत दोन पोलीस अधिका-यांसह 16 पोलीस जवान ठार झाले त्यामध्ये पाच महिला पोलिसांचा देखील समावेश आहे. अशीच घटना 30 जानेवारी, 2009 रोजी घडली व त्यामध्ये 16 पोलीस जवान शहीद झाले होते.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

गेल्या 10 वर्षात शहिदांच्या संख्येत वाढ झालेली आहे. 1996 मध्ये नक्षलवाद्यांनी 156 लोकांचा बळी घेतला होता, त्याच प्रमाणे 1997 मध्ये 428,1998 मध्ये 270, 1999 मध्ये 263 तसेच सन 2003 मध्ये 450, सन 2004 मध्ये 500 पेक्षा जास्त, सन 2005 मध्ये 892, सन 2006 मध्ये 700 आणि सप्टेंबर, 2008 पर्यंत 658 व्यक्ती नक्षलवाद्याचे बळी ठरले.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MAP/ SBT/ प्रथम श्री.जुन्नरे 15.45

श्री.दिवाकर रावते .....

या नक्षलवाद्यांनी केवळ पोलिसांना मारले होते अशातला भाग नाही. या सभागृहात चिन्ना मतावीच्या संदर्भात चार वेळा चर्चा उपस्थित झाली होती . सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी त्या संदर्भात चर्चा उपस्थित केली होती हे मला आठवते. आदिवासींना पोलीस गोळया घालून ठार मारतात आणि मूळ नक्षलवादी मात्र बाजूलाच राहतात या संदर्भात सभागृहात या पूर्वी चर्चा झाली होती. श्री.विजय वडेट्टीवार हे पूर्वी आमच्या पक्षात होते . चिन्ना मतावीच्या प्रकरणी त्यांनी रणकंदन उभे केले होते. त्यावेळी वयोवृध्द अशा चिन्ना मतावीला मदत देण्याच्या संदर्भात कोर्टाला आदेश द्यावे लागले होते. आम्ही ज्याला मारले होते तो नक्षलवादीच होता याच्याशी मात्र सरकार नेहमीच्या पध्दतीने ठाम होते. या विषयाच्या संदर्भात सभागृहात चर्चा झाली होते हे मला चांगले आठवते. महाराष्ट्राच्या एका बाजूला गडचिरोली आणि चंदपूर जिल्हयातील जंगलात मोठया प्रमाणावर नक्षलवाद आहे . हा नक्षलवाद संपूर्ण राज्यामध्ये नाही. नक्षलवाद्यांची कार्यालये त्या भागातच का आहेत या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री नितीन गडकरी यांनी बोलावे कारण ते त्या भागात सतत जात येत असतात आणि ते संबंधिताशी सतत बोलत असतात. त्याच प्रमाणे या विषयाच्या संदर्भात त्यांनी पुष्कळ अभ्यास केलेला आहे .त्यामुळे या संदर्भात त्यांनीच बोलावे अशी मी त्यांना विनंती करतो. मी मात्र त्याबाबत जास्त काही बोलणार नाही. नक्षलवाद्यांची चळवळ त्या भागात आहे, त्यांची कार्यालये नागपूर विभागातच आहेत. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी या क्षेत्रात बरेच काम केलेले असल्यामुळे त्यांनी या विषयी सविस्तर बोलावे अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, नक्षलवाद्याच्या संदर्भातील अत्यंत चिंतेचा विषय या ठिकाणी माडत असतांना मला एका गोष्टीचे दुःख होत आहे. सरकार या प्रकरणी झोपलेले आहे काय असा प्रश्न मला शासनाला या निमित्ताने विचारावासा वाटतो. सभापती महोदय, माननीय गृह मंत्री या ठिकाणी उपस्थित असून त्यांच्याकडून आमच्या काही अपेक्षा आहेत. दिनांक 26/11/2008 रोजी मुंबईवर जो दहशवादी हल्ला झाला होता त्या संदर्भात श्री राम प्रधान यांची समिती नेमण्यात आली होती त्यांनी दिलेल्या अहवालासंबंधी आपण येथे नंतर चर्चा करणार आहोतच. त्यावेळी आम्हाला जे काही सांगावयाचे आहे ते आम्ही येथे सांगणार आहोत. या प्रकरणी शासनाला आलेले यश आणि अपयश सांगण्यासाठी मी उभा नाही. परंतु तुम्ही म्हणजे सरकार आहे. गृह मंत्री म्हणजे श्री जयंत

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

पाटील नाही तर गृहमंत्री म्हणजे सर्व जनतेचे संरक्षण करण्याचे सामर्थ्य असलेली व्यक्ती म्हणून आम्ही आपल्याकडे पाहत आहोत. मुख्यमंत्री ज्यावेळी एखादे निवेदन करतात त्यावेळी ते राज्याचे प्रमुख म्हणून जनतेला ते शब्द देत असतात. तेव्हा माननीय गृह मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, एका प्रश्नाचे उत्तर आज तुम्हाला द्यावे लागणार आहे.म्हणूनच आज आग्रहाने आम्ही आपल्याला येथे बोलावलेले आहे. फेब्रुवारी महिन्यामध्ये 16 पोलीस अधिकारी मारले गेले होते त्यावेळी माननीय मुख्यमंत्री तातडीने त्या ठिकाणी गेले होते. त्याच प्रमाणे माननीय गृह मंत्री सुध्दा त्यावेळी त्या ठिकाणी गेले होते. त्या घटनेमध्ये जे पोलीस अधिकारी शहीद झाले होते त्यांना आदरांजली वाहण्यात आली होती. त्यावेळी मी टी.व्ही.वर पहात होतो तसेच एक जागरुक कार्यकर्ता म्हणून बारकाईने त्यावेळच्या बातम्यासुध्दा ऐकत होतो. त्यावेळी टी.व्ही. वर जे सांगण्यात आले होते तेच दुस-या दिवशी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाले होते. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री असे म्हणाले होते की, "आमच्या शूर वीर पोलीस जवानांनी प्राणाची पर्वा न करता नक्षलवाद्यांशी लढा दिला होता. 100 ते 200 संख्या असलेल्या नक्षलवाद्यांनी पोलिसांवर भ्याड हल्ला केला होता. ही घटना माझ्या मनाला बोचणारी आहे." माननीय मुख्यमंत्र्यांच्या मनाला ही घटना बोचली होती असे ते म्हणाले होते. तेव्हा ही गोष्ट कृतीत दिसते किंवा नाही अशा प्रकारचा प्रश्न निर्माण झाला आहे आणि या प्रश्नाच्या संदर्भात आज ही चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या मनाला बोचणारी ही घटना होती असे त्यांनी सांगितले होते. त्यावेळी त्यांनी असेही सांगितले होते की, "कालचा हा दु:खद प्रसंग मी विसरणे शक्य नाही ". फेब्रुवारी महिन्यात 16 पोलीस शहीद झाले होते आणि त्या घटनेचा माननीय मुख्यमंत्र्यांच्या मनावर मोठा आघात झाला होता . अशा प्रकारे अत्यंत संवेदनशील मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्याला लाभले असल्यामुळे त्यांचे वक्तव्य ऐकतांना आम्हाला त्यांचा अभिमान वाटला होता. फेब्रुवारी महिन्यात जी काही दु:खद घटना घडली होती ती त्यांच्या मनाला बोचली होती. त्यानंतर त्यांना जी काही जाणीव झाली होती त्यातून मी अत्यंत कणखर मुख्यमंत्री आहे असे सांगण्याकरता त्यांनी अशी घोष्णा केली की, "नक्षलवाद्यांचा बिमोड करण्यासाठी येत्या तीन वर्षात 1300 कोटी रुपये देण्यात येतील." सभापती महोदय, ही घोषणा करीत असतांना जे पोलीस शहीद झाले होते त्यांच्या कुटुंबियांच्या त्यांनी भेटी घेतल्या होत्या. श्री. अनामी रॉय हे पोलीस महासंचालक आहेत. माननीय मुख्यमंत्री बोलल्यानंतर जबरदस्तीने,

3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

योग्यता नसतांना, हाकलून द्यावे असे कोर्टाने सांगितले असतांना श्री.अनामी रॉय यांनी खुलासा केला होता. दिनांक 26.11.2008 रोजी मुंबईवर जो दहशतवादी हल्ला झाला होता त्या घटनेमध्ये ते दोषी आहेत असे आमचे ठाम मत असतांना कारण नसतांना शासनाशी संघर्ष झाला असे मला वाटावयास लागले आहे. तुमच्याशी केलेला संघर्ष हा दिवाकर रावते यांनी व्यक्ती म्हणून केलेला नव्हता . गृह मंत्री म्हणून श्री. जयंत पाटील यांच्याशी मी व्यक्ती म्हणून संघर्ष केलेला नव्हता तर सरकार म्हणून मी तो संघर्ष केला होता. त्या घटनेची न्यायालयीन चौकशी करण्यात यावी अशी मी मागणी केली होती. फेब्रुवारी महिन्यात ही घटना घडल्यानंतर श्री अनामी रॉय काय म्हणाले होते ? त्यांना आजच्या आज हाकलून लावले पाहिजे. त्यावेळी काही पोलीस बळी गेले होते. त्यानंतर आज पुन्हा 17 पोलीस बळी गेले आहेत. त्यावेळी श्री. अनामी रॉय असे म्हणाले की, " पोलीस जवानांचे बलिदान व्यर्थ जाऊ देणार नाही. नक्षलवाद्यांचा खात्मा करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. " मी त्यांना सांगू इच्छितो की, तुम्ही नक्षलवाद्यांचा खात्मा करु शकला नाहीत . एकाही नक्षलवाद्यांना तुम्ही मारु शकला नाही उलट त्यांनी पुन्हा मे महिन्यामध्ये 4 महिला पोलिसांसह 16 पोलिसांना यमसदनाला पाठविले होते. तेव्हा श्री. अनामी रॉय यांना मी विचारु इच्छितो की, " कोणाचा खात्मा केला गेला ? " पोलीस महासंचालकाच्या पदावरुन श्री अनामी रॉय यांनी ज्यावेळी महाराष्ट्राला आश्वासित करणारी घोष्णा केली होती त्यावेळी त्या घोषणेला अशा प्रकारचे प्रत्युत्तर मिळालेले आहे. तेव्हा शासन आता श्री.अनामी रॉय यांचे काय करणार आहे असा प्रश्न निर्माण झ ाला आहे.

**(सभापतीस्थानी तालिकासभापती श्री.हेमंत टकले )**

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MAP/ SBT/ श्री. गायकवाड नंतर --- 15:40

श्री. रावते ....

सभापती महोदय, 26 नोव्हेंबरच्या घटनेमध्ये श्री.अनामी रॉय होते आणि आताच्या या नक्षलवाद्यांच्या घटनेमध्येदेखील तेच आहेत. या महाराष्ट्रामध्ये त्यावेळी म्हणजे 26 नोव्हेंबरला जनता मारली गेली पण कालच्या या नक्षलवाद्यांच्या घटनेमध्ये आपले पोलीस मारले गेले आहेत. एवढ्या मोठ्या पदावर बसल्यानंतरही अनामी रॉय यांना अशा घटनेचे आकलनच होत नाही असे यातून दिसून येते. तेव्हा अशा या श्री.अनामी रॉय यांचे आपण काय करणार याचेही उत्तर आपल्याला या चर्चेअंती द्यावे लागेल हे माननीय गृहमंत्र्यांनी लक्षात घ्यावे. त्यासाठीच आम्ही अत्यंत आग्रहाने आपल्याला येथे बोलाविले आहे. सभापती महोदय, फेब्रुवारी महिन्यात घडलेली घटनाच एवढी गंभीर होती, आता मे महिन्यात घडलेली घटनादेखील तितकीच गंभीर आहे यात शंका नाही. पण फेब्रुवारीमध्ये घडलेल्या घटनेचा धसका किती बसला होता ? त्यावेळी निवडणुका समोर आल्या होत्या. अशा वेळी खंबीर भूमिका घेणार असल्याची भूमिका माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केली. त्या भूमिकेचे आम्ही स्वागत केले. पण प्रत्यक्षात तशी भूमिका अमलात आली नाही तेव्हा त्या खंबीरपणाचे नेमके काय झाले, काय आपण केले याचे उत्तर माननीय गृहमंत्र्यांना येथे द्यावेच लागेल. पण माननीय मुख्यमंत्र्यांनी केंद्राकडून यासाठी जादा कुमक मागवितो असे सांगितले असले तरी ... म्हणजे कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी केंद्र सरकारकडून सीआरपी आणि एसआरपी या दोन बटालियन्स नक्षलवाद्यांच्या वाढत्या कारवायांना पायबंद घालण्यासाठी मागविण्यात येणार असल्याची माहिती 10 एप्रिल 2009 रोजी केलेल्या घोषणेमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी म्हटले होते. निवडणुकीवर बहिष्कार घालणार, निवडणुका होऊ देणार नाही अशा प्रकारची घोषणा नक्षलवाद्यांनी केल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, नक्षलवाद्यांच्या वाढत्या कारवाया काबूत आणण्यासाठी केंद्र सरकारकडून सीआरपी आणि एसआरपीच्या दोन बटालियन्स आम्ही मागविणार आहोत. नक्षलवाद्यांना नेपाळ व लिट्टेकडून मदत मिळत असल्याचे मंत्रालयात आज झालेल्या चर्चेमध्ये पोलिसांनी सांगितले. सभापती महोदय, नक्षलवाद्यांना नेपाळकडून म्हणजे माओवाद्यांकडून आणि लिट्टेकडून मदत मिळते असे मंत्रालयाच्या प्रेसरूममध्ये सांगितले गेले. तुमच्याकडे एवढी माहिती येते हे चांगले आहे. सभापती महोदय, मी माझ्या पक्षाच्या वतीने बिहारमध्ये काम करीत होतो. तेथे मी सहा महिने काम केले. दहशत कशी असते ते मी तेथे अनुभवले आहे. दहा गाड्या भरून माणसे बरोबर घेतल्याशिवाय तेथे फिरता येत नव्हते तरी देखील मी तेथे 8 ते 10 तालुके पालथे

..... झेड 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

घातले, अगदी नेपाळच्या सीमेवरील तालुक्यांमध्ये देखील गेलो होतो. तेथे मी जे पाहिले ते सारे भयानक होते. तेथे जमीनदार विरूद्ध हाच लढा आहे. पण तेथे हा लढा नक्षलवादी नावाने नाही तर मिले या नावाने हा लढा चालविला जातो. तेथे माओवादी आणि लेनिनवादी एकत्र येऊन त्यांनी मिले नावाची एक संघटना निर्माण केली आहे आणि बिहारमध्ये ती संघटना जमीनदारांच्या विरोधात लढते आहे. या संघटनेची माणसे जमीनदारांच्या जमिनीमध्ये जातात आणि तेथे आपला झेंडा रोवतात मग त्या जमिनीत जाण्याची त्या जमीनदाराची हिम्मत होत नाही. अशा प्रकारचा संघर्ष तेथे चालला आहे. तेथे हा संघर्ष नक्षलवाद्यांच्या नावाने होत नाही तर मिले नावाच्या संघटनेकडून होत आहे. हे सारे मी बिहारमध्ये काम करताना पाहिले आहे, अनुभवले आहे. हे तर फारच विचित्र चालले आहे. शोषित शेतकऱ्यांकरता, शेतमजुरांसाठी, आदिवासींना न्याय देण्यासाठी म्हणून निर्माण झालेली चांगली संघटना म्हणून आम्हाला वाटत होते आणि त्या संघटनेला पाठिंबा द्यावा असेही एके काळी वाटत होते पण आता ती संघटना दहशतवादी म्हणून ओळखली जात आहे. मूळ लढा एका बाजूला राहिला आणि आता खंडण्या वसूल करणे, प्रचंड पैसे वसूल करणे व त्या पैशाच्या माध्यमातून या भूमितील नागरिकांचे, जनतेचे आणि सर्वसामान्यांचे मुडदे पाडणे आणि आतंकवाद्यांच्या बरोबरीने शस्त्रास्त्रे बाळगणे अशा प्रकारची संघटना ही तयार झालेली आहे. त्यांचा बंदोबस्त आपण कसा करणार हा प्रश्न येथे उपस्थित झालेला आहे. याचा धाक इतका होता की, निवडणुकीच्या काळात श्रीमती सोनिया गांधींचा रोड शो त्या भागात आयोजिण्यात येणार होता तो देखील रद्द करावा लागला. गृहमंत्री म्हणून आपल्याला ही घटना देखील माहिती असेल. हा रोड शो रद्द करण्याचा आदेश तेथील पोलीस अधिकाऱ्यांनी दिला कारण या संघटना त्यांच्याबाबतीतही काही घातपात करील अशी भीती त्यांना वाटत होती. इतके हे गंभीर असे प्रकरण आहे. तेव्हा केवळ या घटनेमध्ये 16 पोलीस मारले गेले एवढ्याच पुरते हे प्रकरण गंभीर आहे वा मर्यादित विषय नसून हा विषय किती महत्त्वाचा हे यावरून आपल्यालाही समजून येईल. सभापती महोदय, अत्यंत दुर्दैव असे आहे की, असे असतानाही आपण कोण माणसे, कशी माणसे नेमतो आहोत ? तेथे पोलीस अधिकारी म्हणून श्री.गुप्ता हे आहेत. मी त्यांना एक दोन वेळा भेटलो आहे. आपण कसे हे अधिकारी नेमले आहेत ? आपण कोणाशी लढणार आहोत ? हे तरी आपण लक्षात घेतले आहे का ? ज्यांच्याशी आपणास लढायचे आहे ते जवळ जवळ एक सैन्यच आहे. त्यांच्याकडे

.... झेड 3 ...



KBS/ MAP/ SBT/ श्री. गायकवाड नंतर --- 15:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

अत्याधुनिक हत्यारे आहेत. ज्याप्रमाणे लिट्टे आणि श्रीलंका सरकारचा लढा होता तशाच प्रकारचा नक्षलवाद्यांबरोबर आपलाही हा लढा आहे. सभापती महोदय, नक्षलवादी विरोधी पथकाचे प्रमुख श्री.गुप्ता हे वार्ताहरांशी बोलताना वृत्तवाहिनीवर दिसत होते. त्यांना नक्षलवाद्यांशी मुकाबला करणे म्हणजे सरकारचा बाहुला-बाहुलीचा खेळ वाटत असावा अशा प्रकारचा त्यांचा ॲपिरिअन्स होता. मुंबईत झालेल्या हल्ल्याच्या वेळी दहशतवाद्याशी चकमक म्हणजे जीवावरचा खेळ कसा असतो हे नॅशनल सेक्युरिटी गार्डस्‌नी त्यावेळेस दाखविले होते. कारण तेव्हा टीव्हीवर कमांडो कसे उतरले वगैरे हे सारे दाखविले जात होते. ...

( यानंतर श्री. सरफरे .... एए 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, नक्षलवाद्यांबरोबर लढणाऱ्या पोलिसांच्या प्रमुखांना, नक्षलवादी विरोधी पथकाच्या प्रमुखांना माईकसमोर चार शब्द बोलतांना धाप लागत होती. ते थांबून थांबून बोलत होते. त्याचे उत्तर आपण कसे देणार आहात? त्यांच्या ठिकाणी आपण श्री. नागरे पाटील यांना पाठवावे. ते हुशार आहेत. मी सर्व दूर चित्रवाहिन्यांना धन्यवाद देतो की, त्यांनी महाराष्ट्रातील जनतेसमोर हे चित्र ठेवले. काही वेळेस आपणास हे नको वाटत असले तरी या माध्यमाव्दारे संपूर्ण चित्र लोकांपुढे येत असते. त्यामुळे त्यामध्ये तुम्हा-आम्हाला लपविण्यासाठी काही शिल्लक राहिलेले नाही. धाप लागणारा पोलीस अधिकारी नक्षलवाद्यांशी कसा काय लढणार? हा माझ्या मनात प्रश्न निर्माण होतो. वाढत्या बळींच्या संख्येसंदर्भात आपण काय करणार आहात? हा प्रश्न मला भेडसावत आहे.

सभापती महोदय, पूर्वी नक्षलवादी मारले जायचे. आता नक्षलवाद्यांचे तंत्र बदलले आहे. त्याबाबतच्या बातम्या आपण वाचल्या आहेत. परंतु आपला तो अभ्यास नाही, आपला तो प्रांत नाही. पूर्वी नक्षलवादी 10-12 च्या गटाने येत असत, आणि पोलीस देखील 10-12 च्या गटाने असत. त्यांची आमने सामने लढाई होत असे. त्यामध्ये एक त्यांचा नक्षलवादी मारला गेला तर एक आपला पोलीस मारला जायचा असे युद्ध चालायचे. हे लक्षात आल्यानंतर ते आता 400-500 च्या गटाने फिरावयास लागले. आपले 5-15 पोलीस आणि त्यांचे 500 लोक यामध्ये आपले पोलीस मरतात आणि त्यांचे लोक पळून जातात हे पोलिसांनाही माहीत आहे. त्यांनी आता गुरीला वॉर निर्माण केले आहे. जगामध्ये गुरीला वॉर आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा गनिमी कावा या दोघांना तोड नाही. यामध्ये गुरीला वॉर श्रेष्ठ की, गनिमी कावा हा युध्द शास्त्रामधील मोठा मुद्दा आहे. त्यापुढे जाऊन त्यांनी त्या जंगलामध्ये हे मोठे युध्द तंत्र अवलंबिले आहे. याचा अभ्यास करणारे निष्णात पोलीस आपल्याकडे आहेत काय?

सभापती महोदय, दि.26.11.2008 च्या अतिरेक्यांच्या हल्ल्यानंतर माननीय गृहमंत्र्यांनी घोषणा केली ती अजून अंमलात आणण्यात त्यांना यश आले नाही. त्यांनी कमांडोचे पथक तयार केले, त्यामध्ये प्रशिक्षपण देण्यासाठी काही लोक निवडले, परंतु प्रशिक्षण झेपत नाही म्हणून त्यातील अर्धे लोक पळून गेले. या मराठी भूमीचे आणि मराठी मातीचे हे दुर्दैव आहे. ज्याठिकाणी या भूमीत छत्रपती शिवाजी महाराजांनी मावळे पुरविले, सैन्य पुरविले त्याठिकाणी गनिमी कावा झ ोपत नाही म्हणून पळणारी कुठली अवलाद निर्माण झाली? त्यामुळे आपल्याला कमांडो मिळत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

नाहीत हे आमचे दुर्दैव आहे. आता आम्ही फक्त चित्रपटामध्येच कमांडो बघतो. सभापती महोदय, अशाप्रकारे गुरीला वॉर बरोबर सामना करणारे जवान जर आपल्याला मिळत नसतील तर ते आपले दुर्दैव आहे असे म्हणावे लागेल. ही चळवळ 13 राज्यांमध्ये फोफावलेली आहे. कालच्या पाच वर्षाच्या कालावधीत केंद्र सरकारने या देशाला काय दिले? देशाच्या 13 राज्यांमध्ये पसरलेल्या नक्षलवादी चळवळीचे आंदण दिले. याचे कारण डाव्यांच्या पाठिंब्यावर यांचे सरकार टिकून होते. जगायचे की मरायचे? शेवटी अणुबॉम्बच्या विषयावर त्यांनी धक्का दिला तो वेगळा भाग झाला. साडे चार ते पाच वर्षे कसे तरायचे? हे नसतील तर काय होईल? त्या डाव्यांनी काय केले? त्यांनी बाहेरुन पाठिंबा दिला. त्याबरोबरच अत्यंत क्रूर अशी नक्षलवादी चळवळीची देणगी 13 राज्यांमध्ये पसरवून दिली. ते पाप तर तुमच्या डोक्यावर आहे. पुढील निवडणूकीमध्ये आपण हा विषय घेणार की नाही? कारण आता हे मृत्यू झाले आहेत. सभापती महोदय, माननीय वनमंत्री श्री. बबनराव पाचपुते यामध्ये आपल्या विभागाचा सुध्दा विषय समाविष्ट आहे. कालच्या पोलिसांवरील हल्ल्यासंदर्भात झाडे कापून पोलिसांना अडविले गेले. ती कापलेली झाडे उचलणारी वेगळी माणसे आहेत. ज्यावेळी पोलिसांचे पथक जाते त्यावेळी त्याच्या पाठिमागे फॉलो अप पथक गेले पाहिजे अशा आपल्या सूचना आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

आज आम्हाला माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराच्या माध्यमातून एक गोष्ट समजली पाहिजे. याठिकाणी 16 च्या 16 पोलीस कर्मचाऱ्यांची तुकडी पुढे गेली आणि ते सगळेच्या सगळे पोलीस कर्मचारी गोळीबारामध्ये गारद झाले. अशा वेळी त्यांच्यामागून त्यांना फॉलो-अप करणारी पोलिसांची तुकडी का नव्हती ? जर तसे नसेल या गोष्टीला कोण जबाबदार आहे ? यासाठी जे कोणी जबाबदार असतील, त्यांचे तुम्ही नाव जाहीर करावे आणि त्या संबंधितांवर कोणती कारवाई करणार आहात ? हे देखील जाहीर करावे. आपण या सदनाच्या माध्यमातून यासंबंधातील कणखर अशी प्रशासकीय भूमिका जाहीर करीत नाही, तोपर्यंत पोलीस,कर्मचारी जे कोणी संबंधित लोक असतात, ते असेच वागतात. 26/11 रोजी जी घटना घडली, त्यावेळी गृह विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती चित्कला झुत्शी या मस्तपैकी "ताज" हॉटेलमध्ये बसलेल्या होत्या, मस्त खात-पीत होत्या, त्यांना बाहेर काढण्यात आले. मग त्या सर्वांबरोबर गेल्या. त्यानंतर त्या निवृत्तही झाल्या. पण त्यांच्यावर काही कारवाई झालेली नाही. कोणावरही कारवाई झालेली नाही. तसेच त्यांना मोठा निरोप समारंभ देखील दिला. 26/11 च्या घटनेनंतर मर्दुमकी गाजवून जिवंत बाहेर आल्याबद्दल सेन्डॉपही दिला. याबाबतीत लोकांपर्यंत योग्य संदेश जात नाहीत. आज माननीय मंत्री महोदय या बाबतीत कोणती ठाम भूमिका मांडणार आहेत ? याला जबाबदार कोण आहे ? संबंधितांना जबाबदार ठरविणार आहात की नाही ? हा विषय आहे, म्हणून मी येथे ही बाब मांडत आहे.

सभापती महोदय, हेलिकॉप्टरचा विषय आहे. माननीय गृहमंत्री महोदय, आपण माननीय मुख्यमंत्र्यांच्या बरोबर सुरुवातीला शहिदांना आदरांजली वहाण्यासाठी गेला होतात, तेव्हा जनतेला असे सांगितले की, आम्ही काय-काय करु ? आम्ही हेलिकॉप्टर ठेऊ. अमुक करु, तमुक करु. मग या घटनेच्या वेळी हेलिकॉप्टर कुठे होते ? तेव्हा हेलिकॉप्टर का नव्हते ? आपण नागपूर येथून त्याठिकाणी हेलिकॉप्टरने गेला होतात. तसे जाणे भाग आहे. तुम्ही हेलिकॉप्टरने का गेलात ? असा माझा प्रश्न नाही. तुमच्यासमोर दुसरा मार्ग नव्हता. हेलिकॉप्टरने जाणे आवश्यक होते.पण आम्ही नक्षलवाद्यांचा हल्ला झाल्यानंतर आमच्या पोलिसांना संरक्षण देण्यासाठी हेलिकॉप्टर वापरणार आहोत आणि त्यासाठी तरतूद करणार आहोत असे सांगितल्यानंतर देखील अजूनपर्यंत हेलिकॉप्टर उपलब्ध झालेले नाही अशी स्थिती आहे.यासंदर्भात आपण फेब्रुवारीच्या अगोदर जाहीर केलेले होते आणि मे महिन्यामध्ये पोलीस मृत्युमुखी पडले आहेत.यासंदर्भात आपली नक्की भूमिका

. . . .2 बी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

काय आहे? आपण स्वत: हेलिकॉप्टर घेऊन गेलात. परंतु यावेळेला त्यांना हेलिकॉप्टर का उपलब्ध होऊ शकले नाही ? हा प्रश्न आहे.नक्षलवाद्यांकडे रॉकेट लाँचर्स् आहेत, इतर सर्व अत्याधुनिक शस्त्रे आहेत. मंत्रालयामध्ये झालेल्या बैठकीच्या वेळेस गृह सचिवांच्या माध्यमातून असे सांगण्यात आले आहे की,या नक्षलवाद्यांना लिट्टेंची मदत आहे,नेपाळ मधून मदत मिळत आहे.तुम्हाला हे सर्वकाही माहिती असताना,आपण भविष्यकाळासाठी आपली कोणती भूमिका मांडणार आहात हे आम्हाला या चर्चेच्या माध्यमातून समजणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, ही दुदैवी घटना आहे आणि आम्ही त्याबाबत सरकारला सतत घोळवून-घोळवून सांगण्यासाठी येथे उभे नाही. 26/11 च्या हल्ल्यामध्ये देखील महाराष्ट्रातील पोलीसच मृत्युमूखी पडले, नक्षलवाद्यांच्या हल्ल्यामध्येही पोलिसच मारले जात आहेत.कालपर्यंत या देशामध्ये शोषितांकरता लढणाऱ्या नक्षलवाद्यांना काय मिळवावयाचे आहे, ते कशासाठी लढत आहेत ? हे काही कळत नाही.ते का लढत आहेत ? लोकांना कशासाठी मारत आहेत ? यामागे त्यांचा काय उद्देश आहे? खंडण्या कशासाठी वसूल करीत आहेत ? काय-काय प्रकार करीत आहेत ? सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेबांना याची जास्त माहिती असल्याने,ते आपल्या भाषणा-मध्ये हा विषय मांडतीलच.परंतु दुर्दैवाने नक्षलवाद्यांची चळवळ फोफावत चाललेली आहे. प्रशासनाला वेठीला धरण्याची त्यांची ताकद ही आणखी प्रखर होत चालली आहे आणि त्या वेळेलाच प्रशासन कुठेतरी कमकुवत पडत आहे,कमी पडत आहे. आता मी "दुबळे" असे म्हणू शकत नाही. कारण तसे म्हणणे हा पोलिसांचा अवमान केल्यासारखे होईल. प्रशासकीय इच्छाशक्ती दुबळी असू शकते. पोलीस हे ट्रेनिंगच्या माध्यमातून लढण्यासाठीच तयार झालेले असतात. पण जर त्यांच्यामागे राजकीय इच्छाशक्ती आणि सरकारचे सामर्थ्य योग्य पध्दतीने उभे राहिले नाही तर मात्र ते हतबलच असतात, शेवटी त्यांचा बळीच जातो. तसेच तुमच्यापुढे त्यांचा धापा टाकणारा प्रमुख येत असेल तर ते दुर्दैव आहे आणि मग तो कसा लढणार, हा देखील एक प्रश्न आहे.

श्री.नितीन गडकरी (खाली बसून) : आमचे गृहमंत्री श्री.जयंत पाटील, हे त्यांच्यापेक्षा जास्त फिट आहेत.

श्री.दिवाकर रावते : ठीक आहे, ते फिट आहेत, पण त्यांची अशी कोणती अगतिकता आहे? की, तिकडे असे लोक ठेवलेले आहेत. मी याठिकाणी एक बाब सांगू इच्छितो.श्री.गद्रे नावाचे ......

. . . .2 बी-3



APR/MAP/SBT 16:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

आय.ए.एस.अधिकारी आहेत. शासनाने तेव्हा त्यांची तेथे कलेक्टर म्हणून नेमणूक केली होती. त्यांच्याकडे जाऊन अभ्यास करावा. मी त्यांना मुद्दाम भेटण्यासाठी गेलो होतो. त्यांना तेथे कलेक्टर म्हणून नेमल्यानंतर त्यांचा नक्षलवाद्यांबरोबर सुसंवाद होता, ते त्यांच्याशी बोलत होते आणि तुम्ही विकासाच्या आड येऊ नका असे त्यांना सांगत होते आणि त्यांनी एका वेगळया पध्दतीने त्या भागात विकास करुन दाखविला आहे. या गोष्टीला 7-8 वर्षे झाली असतील, नक्की आता मला आठवत नाही. पण एक अधिकारी असे करु शकतो, मग बाकीचे काय करीत आहेत ?

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

मला तेवढे माहिती आहे की, हे योग्य की अयोग्य. पण कोणत्या मार्गाने ? तो माझा प्रश्न नाही. नाहीतर तुम्ही उभे राहून सांगाल की, ते त्यांना सामील आहेत वगैरे. तुमचे काही सांगता येत नाही.

श्री.नितीन गडकरी (खाली बसून) : उद्या त्यांच्याबद्दल चौकशी सुर करतील आणि त्यांना मंत्रालयातील लोक त्रास देतील. तुम्ही बोलू नका.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला जी माहिती आहे, ती मी सांगितली. मी त्यांना भेटलो होतो, त्यांच्याकडून माहिती घेण्यासाठी भेटलो. ज्याप्रमाणे मी माननीय श्री.नितीनभाऊंना भेटलो होतो, त्यावेळी मी सरकारमध्ये नव्हतो.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.. ..

जंगल खात्याला न जुमानता चिखलदरा आणि धारणी या संपूर्ण आदिवासी भागातील रस्ते जोडण्याचा कार्यक्रम आखण्यात आला होता. त्यावेळी उत्सुकता म्हणून मी त्याठिकाणी गेलो होतो त्यावेळी श्री. गद्रें यांना भेटलो होतो. नक्षलवादी चळवळीला एक माणूस सामोरा जाऊन विकास करु शकतो तर मग या शासनाचे कुठे काय अडलेले आहे? त्या ठिकाणी श्री.गुप्ता यांच्या सारखे अधिकारी नेमण्यात आलेले आहेत असे सगळे विषय यामध्ये निर्माण झालेले आहेत. शासनाने यासंदर्भातील आपली भूमिका स्पष्ट आणि रोखठोक मांडावी. अगतिकता सोडावी. आता तो भाग शोषित राहिलेला नाही. आतंकवादी आणि नक्षलवादी सारखेच आहेत. श्रीलंकेत जसा लिट्टेचा बंदोबस्त करण्यात आला, त्याच पध्दतीने या सरकारला आता पाऊल उचलावे लागेल. या संदर्भात नेहमी चार राज्ये एकत्र येतात, केंद्रात बैठका घेतल्या जातात, नक्षलवाद्यांविरुध्द कारवई करतो, ॲक्शन घेतो असे निर्णय घेतले जातात परंतु कठोर कारवाई होत नाही. परंतु महाराष्ट्र राज्याने नक्षलवाद्याविरुध्द कठोर कारवाई करुन आपल्या राज्यापुरते तरी त्यांना हद्दपार करण्यात यावे, त्यानंतर बाकीचे राज्य महाराष्ट्राची मदत मागतील आणि सक्षम होतील. श्री. वीरप्पन नावाच्या एका चंदन तस्कराने साऱ्या देशाला कित्येक वर्षे झुंजवले. त्याने सैन्य आणले, विमाने आणली. तो एक चंदन तस्कर होता. या देशाची कायदा व सुव्यवस्था अतिशय दुबळी आहे. म्हणून मी या चर्चेच्या माध्यमातून माननीय मंत्रिमहोदयांना विचारु इच्छितो की, चद्रपूर, गडचिरोली या नक्षलग्रस्त भागातील जनतेला शासन कशा पध्दतीने दिलासा देणार आहे ? त्या ठिकाणी शहीद झालेल्या पोलिसांच्या बाबतीत नक्की काय करण्यात येणार आहे? अन्यथा याठिकाणी ज्यांनी हा प्रस्ताव आणलेला आहे त्यांची देखील तीच अवस्था होण्याची शक्यता आहे. तेव्हा याबाबतची संपूर्ण माहिती सभागृहासमोर येण्याची आवश्यकता आहे. भविष्यात या महाराष्ट्राला सक्षम पोलीस मिळाले पाहिजेत, ही अपेक्षा व्यक्त करतो आणि शहीद झालेल्या पोलिसांना या सभागृहाच्या माध्यमातून आदरांजली अर्पण करुन मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद. जय हिंद. जय महाराष्ट्र.

---

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ( नागपूर विभाग पदवीधर ) :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी नियम क्रमांक 97 अन्वये जो प्रस्ताव चर्चेला आणलेला आहे त्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

माणसाची संवेदनशीलता कशी नष्ट झाली आहे याचे उत्तम उदाहरण या घटनेतून मिळते. अध्यक्ष महाराज, दि.21 मे रोजी धानोरा गावाच्या पोलीस स्टेशनपासून 20 मिनिटांच्या अंतरावर आणि गावापासून अवघ्या 3 कि.मी. अंतरावर या 5 महिलांसह 16 पोलिसांची हत्या झालेली आहे. मी या ठिकाणी मुद्यांची पुनरावृत्ती करणार नाह. पण सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी सांगितले त्यापेक्षा ही भयानक अशी गोष्ट आहे. पोलीस निरीक्षक श्री. अय्यर यांचे डोळे बाहेर काढले श्रीमती अलका गावंडे ही महिला पोलीस गर्भवती असताना तिच्या पोटावर गोळया मारल्या. श्रीमती फिरोदिया या महिलेचे दोन्ही हात तोडण्यात आले (अडथळा) वर्तमानपत्रात यासंबंधीची बातमी आली होती. यासंबंधात मला जी माहिती मिळाली होती ती अशी आहे.परंतु अतिशय क्रुरतेने मारण्यात आलेले आहे. क्रुरतेला देखील काही मर्यादा असतात त्या सगळया मर्यादा ओलांडलेल्या आहेत. हैदराबादमध्ये राष्ट्रीय स्वंयसेवक संघ आणि विद्यार्थी परिषदेसंबधीची एक संस्था आहे. विद्यार्थी परिषदेचे बरेच कार्यकर्ते आंध्र प्रदेशात शहीद झालेले आहेत. विद्यार्थी परिषदेचे विद्यार्थी या विषयावर काम करतात. त्यांनी दिल्लीमध्ये तीन दिवसांची एक कॉन्फरन्स घेतली होती त्या कॉन्फरन्समध्ये मी सहभागी झालो होतो. अध्यक्ष महाराज, पशुपतीनाथ पासून ते तिरुपतीपर्यंत रेड कार्पेट एरिया तयार करण्याचे षडयंत्र त्यांनी रचलेले आहे.एकीकडे आतंकवादी येत आहेत आणि हजारो, शेकडोच्या संख्येने निरपराध लोकांची ठिकठिकाणी हत्या करीत आहेत. दुसरीकडे नक्षलवादी येत आहेत आणि ते देखील निरपराध लोकांची हत्या करीत आहेत. आणि तिसरीकडे महाराष्ट्रात मराठा आरक्षणावरुन जाती-जातीमध्ये भांडणे लावण्यामध्ये पक्ष नेतृत्वातील अनेक लोक आपली ताकद खर्च करीत आहेत. अध्यक्ष महाराज, खरे म्हणजे हा प्रश्न सरकारला खरोखर समजला आहे काय? हाच खरा प्रश्न आहे. मी सन्माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, या शासनातील सगळे मंत्री आजपर्यंत फक्त गडचिरोलीला गेले असतील. पण मला सुदैवाने म्हणा किंवा दुर्दैवाने म्हणा त्या ठिकाणी जाण्याच्या दोन संधी मिळाल्या आहेत. एकदा छत्तीसगडच्या

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.......

निवडणुकीच्यावेळी छत्तीसगडचे मुख्यमंत्री श्री. रमणसिंग यांनी महाराष्ट्राच्या सीमेवर छत्तीसगडमध्ये जी गावे आहेत तेथे प्रचारासाठी या असे मला सांगितले होते. मी त्या ठिकाणी जात असताना माझ्या बरोबरच्या महाराष्ट्रातील पोलिसांचे शस्त्र त्यांनी
काढून घेतले, त्यानंतर मी हेलिकॉप्टरमध्ये बसलो.

यानंतर श्री. बरवड ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ......

मी चार सभा घेतल्या. मी अक्षरश: माझ्या कुलदेवतेला हात जोडून हेलिकॉप्टरमध्ये बसलो. सगळी गावे 100 टक्के नक्षलग्रस्त होती. मला असे वाटले की, आपल्या आयुष्यात आज परत संध्याकाळ बघत नाही. पण मी सुखरुप परत आलो. दुसऱ्या दिवशी त्याच ठिकाणी त्याच गावात मतपेटी नेत असताना हेलिकॉपटरवर त्यांनी गोळ्या झाडल्या. दुसरी चूक मी लोकसभेच्या निवडणुकीमध्ये माझ्या स्वभावाच्या चांगुलपणामुळे असेल किंवा मूर्खपणामुळे असेल पण केली. मी यावेळी धानोरा, सिरोंचा आणि एटापल्ली या ठिकाणी गेलो. गडचिरोलीपासून सिरोंचा हे ठिकाण 185 किलोमीटर आहे. मी या तीनही गावांमध्ये जाहीर सभांकरिता गेलो. तेथील एस.पी. तसेच इतर अधिकाऱ्यांशी बोललो. ते म्हणाले साहेब, येथे आले पाहिजे कारण लोकशाहीच्या दृष्टीने आपण लोक आलात तर बरे होईल, पण कोणीही इकडे येत नाहीत. मी कसे हो म्हटले आणि कसे ठरविले हे मला माहीत नाही, पण मी त्या ठिकाणी गेलो. माझी मान शरमेने खाली गेली. मी धानोरा गावात दुपारी 1.00 वाजता उतरलो. त्यावेळी माझ्या सभेमध्ये तीन ते साडेतीन हजार लोक सहभागी झाले होते. उन्हात सभा सुरु होती. तपमान 47 डिग्री होते. त्यावेळी त्या ठिकाणी उतरल्यानंतर चार पोलीसवाल्यांनी मला कव्हर केले आणि त्यांनी बंदुका अशा ठेवल्या आणि त्यांच्या बरोबर मी व्यासपीठावर गेलो. त्या ठिकाणी गेल्यानंतर त्यांनी तेथील पदाधिकाऱ्यांना हे आधीच सांगून ठेवले होते की, साहेब आल्यावर ते पहिल्यांदा बोलतील. त्यामुळे चालू असलेली भाषणे बंद केली. मी बोलण्यासाठी उभा राहिलो. माझे भाषण संपले. मला कार्यकर्ते म्हणाले की, साहेब, चहा घ्या. लगेच तेथील पोलीसचा माणूस म्हणाला की, साहेब, माझी आपल्याला विनंती आहे की, आपण लवकरात लवकर हे स्थान सोडले तर बरे होईल. मी चहाही घेतला नाही. मी उठलो. पुन्हा हेलिकॉप्टरमध्ये बसून निघून गेलो. धानोरा, सिरोंचा आणि एटापल्ली या तीनही गावांमधील ही परिस्थिती आहे. हा हार्डकोअर नक्षलवादी एरिया आहे. म्हणजे मी आंध्रप्रदेशच्या सीमेवर गेलो. ही परिस्थिती का निर्माण झाली आहे ? आपल्याला माहीत असेल की, बाबा आमटे यांनी किंवा श्री. सुरेश व्दादशीवार यांनी याबाबतीत काही आठवणी लिहिलेल्या आहेत. आजही गडचिरोली जिल्ह्यामध्ये मिठाच्या ऐवजी लाल मुंग्या बारीक करुन त्याचा वापर मीठ म्हणून करतात अशी परिस्थिती आहे. मी मंत्री असताना जिद्दीने फॉरेस्ट आणि एन्व्हायर्नमेंट ॲक्टचे उल्लंघन करुन

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS

श्री. नितीन गडकरी .....

गडचिरोली जिल्ह्यामध्ये त्या काळात 250 कोटी रुपयांचे रस्ते आणि पूल बांधण्याचे काम केले. या जिल्ह्याला न्याय मिळाला पाहिजे यादृष्टीने मी विशेष रुपाने त्याच्या मागे लागलो. मी सगळेच काम काही करु शकलो नाही. पण मेळघाटमधील 100 ची 100 गावे जोडली गेली. पण एक गोष्ट माझ्या लक्षात आली जी मी विचारपूर्वक सांगू इच्छितो की, या ठिकाणी शासन जिवंत नाही, अस्तित्वात नाही. मी आज माननीय मंत्रिमहोदयांना आव्हान करतो. गडचिरोली जिल्ह्यामध्ये डॉक्टर्सच्या किती जागा रिकाम्या आहेत ? तहसिलदारांच्या किती जागा रिकाम्या आहेत ? तलाठ्यांच्या किती जागा रिकाम्या आहेत ? शिक्षण विभागाच्या किती जागा रिकाम्या आहेत ? याच्या याद्या काढाव्यात. आपल्या सर्वपक्षीय आमदारांना बदल्यांचा फार शौक जडलेला आहे. एखाद्याची बदली झाली की, त्याची बदली रद्द करण्यासाठी पत्र लिहितो. मंत्र्यांकडे जातो. मी त्यांनाही दोष देत नाही. ते आग्रही नसतात त्यामुळे सगळ्या बदल्या रद्द होतात. सभापती महोदय, शाळेची इमारत आहेत तर शिक्षक नाही, शिक्षक आहे तर इमारत नाही, दोन्ही आहेत तर विद्यार्थी नाहीत आणि तीनही आहेत तर शिक्षण नाही अशी स्थिती आहे. मी एका ट्रस्टचा अध्यक्ष होतो. आम्ही या भागामध्ये 350 एकशिक्षकी शाळा चालवित होतो. आर्थिकदृष्टया आता त्या शाळा बंद पडल्या. पण त्या ठिकाणी शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नाहीत. दवाखान्यांची अवस्था तर अशी आहे की, त्या ठिकाणी औषधे नाहीत, डॉक्टर्स नाहीत. तेथे कोणी तरी डॉ. बंग यांच्यासारखे, डॉ. प्रकाश आमटे, डॉ. विकास आमटे यांच्यासारखे सेवाभावी डॉक्टर्स काम करीत असतील पण बाकी परिस्थिती फार गंभीर आहे. आपण तेथील सरकारी दवाखान्यांचा रिपोर्ट काढावा. मानवतेला काळीमा फासणारी घटना आहे. दवाखान्यामध्ये औषधे नाहीत, डॉक्टर्स नाहीत. त्या ठिकाणी दवाखान्यांची स्थिती खराब आहे. शाळांची स्थिती खराब आहे. मला सांगावयास शरम वाटते. 16 वर्षापासून छत्तीसगड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश या राज्यांना जोडणाऱ्या नॅशनल हायवेचे काम चालू आहे. त्या हायवेवर पराणा येथील नदीवरचा एक पूल आहे. मी त्या ठिकाणी गेलो होतो. मी माझ्या काळात अतिशय प्रामाणिकपणे प्रयत्न केला पण मी काम करु शकलो नाही.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/ यापूर्वी श्री.बरवड 16:15

श्री.नितीन गडकरी....

मग श्री.खंडुरी मंत्री झाले त्यावेळी प्रयत्न करण्यात आला, परंतु तेव्हाही त्या पुलाचे काम झाले नाही. त्यानंतर माननीय श्री.लालकृष्ण अडवाणी उपपंतप्रधान झाल्यावर मी त्यांना अहेरीला घेऊन गेलो होतो. त्यावेळी मी आग्रह केल्यावर ते काम करण्याचे निश्चित झाले होते. परंतु लगेचच लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या. एका नॅशनल हायवेचे काम 16 वर्षापासून सुरु आहे. या रस्त्याच्या भूसंपादनाच्या कामाची, वन विभागाच्या क्लीअरन्सची काय परिस्थिती आहे ? हा जिल्हा महाराष्ट्रामध्ये सगळयात श्रीमंत आहे. परंतु लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्रात सगळयात गरीब असलेला जिल्हा आहे. नॅशनल हायवेवरील पराण नदीच्या पुलाचे काम बंद आहे. राज्याला जोडणारा 16 वर्षापासून हायवे सुरु आहे, त्याचे सर्वेक्षण झालेले नाही. त्यावर पुस्तक लिहिण्यासारखी परिस्थिती आहे. पण त्या रस्त्याच्या कामाची कोणाला गरज वाटत नाही. तेथील रेल्वेची परिस्थिती कशी आहे ? वडसापासून पलिकडे सिरोंचापर्यंत रेल्वे नेण्याचा प्रस्ताव आहे. कारण तेथे दळणवळणाचे दुसरे साधन नाही. तुम्ही सर्वजण सरळ गडचिरोलीला जाता. परंतु गडचिरोली ते सिरोंचामधील अंतर 200 कि.मी.इतके आहे. सिरोंचा-एटापल्ली-अहेरी-धानोरा या भागाचे अंतर गडचिरोलीपासून खूप लांब आहे. या भागांचा मिळून एक जिल्हा होऊ शकेल इतके लांबचे अंतर आहे. आमचे माननीय मुख्यमंत्री, माननीय गृहमंत्री किंवा अन्य मंत्री महोदय तेथे जातात, पोलिसांची सलामी घेतात, तेथील पोलिसांना भेटतात, छावण्यांना भेट देतात आणि परत येतात. पण त्या भागात कोणी जात नाही. त्या भागाला पोलीस अधिकारी तरी भेट देतात का ? महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक एकदा तरी सिरोंचा येथे गेले आहेत काय ? शासनाने एसआरपीचे मुख्यालय नागपूरला येथे केले आहे. गडचिरोली जिल्हयासाठी एसआरपीचा फोर्स रिझर्व्ह करण्यात आला, परंतु मुख्यालय मात्र नागपूरला केले आहे. गडचिरोली जिल्हयात युध्दजन्य परिस्थिती असताना एसआरपीचे मुख्यालय नागपूरला का करण्यात आले ? नागपूरहून गडचिरोलीला जाण्यासाठी साडेतीन तास लागतात आणि गडचिरोलीहून सिरोंचाला जाण्यासाठी चार तास लागतात. म्हणजे नागपूरहून सिरोंचाला जाण्यासाठी साडेसात तास लागतात. आग तेथे लागते आणि मुख्यालय मात्र नागपूरमध्ये आहे. शासन या गोष्टींचा विचार का करीत नाही ?

2...

NTK/ KGS/ MMP/

श्री.नितीन गडकरी....

जेथे घटना घडत आहेत तेथे एसआरपीचे मुख्यालय केले पाहिजे. त्या भागात पोलीस फोर्स तैनात केला पाहिजे. त्या भागासाठी केंद्र सरकारने हेलिकॉप्टर देण्याची घोषणा केली आहे, परंतु कोठे आहे हेलिकॉप्टर ? आज नक्षलवाद्यांकडे सेटलाईट फोन आहेत, वायरलेस यंत्रणा आहे, चिनी बनावटीच्या एके47 बंदुका आहेत, बॉम्ब गोळे आहेत, रॅाकेट लॉचर आहेत. त्यांच्याकडे मिलिटरी सारखी सक्षम सिस्टिम आहे. परंतु राज्याच्या पोलीस यंत्रणेला गृह विभागाकडून कोणते प्रशिक्षण दिले आहे ? शेळीला वाघाच्या तोंडाला दिल्यामुळे त्या पोलिसांचे मृत्यू झाले, दिनांक 21 मे रोजी 16 जण मरण पावले, 1 फेब्रुवारीला 15 जण मरण पावले, 3 पोलिसांना नक्षलवाद्यांनी ठार केले आहे. खबऱ्यांची हत्या करणे चालूच आहे. या पोलिसांना कोणतेच प्रशिक्षण दिलेले नाही. नागपूर आणि मुंबईमध्ये वाहतुकीचे काम करणे आणि नक्षलग्रस्त भागात काम करणे यामध्ये खूप फरक आहे. आज पोलिसांची परिस्थिती अशी आहे की, त्यांना पोलीस दलाला प्रशिक्षण दिले जात नाही, त्यांची शस्त्रे असतील, इंटेलिजन्स असेल हे सर्व कमजोर आहे. नक्षलवाद्यांची माहिती मिळत नाही. ज्यांच्याकडून माहिती मिळते त्यांना मारले जाते. मला पोलिसांबद्दल सहानुभूती आहे, माझ्या वाक्याचा कोणी वेगळा अर्थ काढू नये. धानोरा तालुक्यामध्ये 47 अंश तापमानामध्ये दुपारी 1 वाजता मी गेलो होतो. तेव्हा बाजूच्या घरावरील कौलांवर, पत्र्यांवर ते लोक काळे फडके बांधून उभे होते. त्यांना बघून माझ्या डोळयात पाणी आले. मी येण्यापूर्वी 2 तास अगोदर 60 ते 70 जण घरावर 47 अंश तापमानामध्ये उभे होते. त्यात दोन मुली होत्या. मी त्याठिकाणी क्षणभर थांबलो होतो. मी हेलिकॉप्टरमधून जात असताना माझी वाईट अवस्था झाली होती. परंतु ते लोक दोन तास उन्हात उभे होते, त्यांच्याबद्दल मला काहीच म्हणावयाचे नाही. परंतु एक गोष्ट मात्र तेथे घडत आहे. प्रशिक्षणाचा अभाव असल्यामुळे पोलीस अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या तेथील जनतेवर काही वेळा अन्याय व अत्याचार होतात. मी त्याबाबत अधिक बोलू इच्छित नाही. त्या गरीब आदिवासींची परिस्थिती कशी आहे ? येथून शासकीय अधिकारी अत्याचार करतात आणि तिकडून नक्षलवाद्यांकडून अत्याचार होतात.

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 16:20

(श्री. नितीन गडकरी..

खबर दिली म्हणून नक्षलवादी खब-यांचे शिरच्छेद करतात आणि नाही दिली म्हणून पोलीस मारतात. सभापती महोदय, आदिवासी महिलांच्या स्थिती बाबत काय बोलायचे ? आदिवासी क्षेत्रातील महिला म्हणजे काही सार्वजनिक प्रॉपर्टी असा समज आहे. मला त्याबाबतीत बोलावयाचे नाही आणि कोणावर टीकाटिपणी करावयाची नाही. पण हे प्रशासन संवेदनशील नाही. या जिल्ह्याचा जोपर्यन्त विकास होत नाही तोपर्यन्त बेरोजगारीचा प्रश्न सुटणार नाही. जमशेदजी टाटा हे टाटानगरला जाण्याआधी सुरजागडला गेले होते. तेथील आयर्नओर हे चांगल्या प्रतीचे होते. त्या ठिकाणी उद्योग सुरु करण्यासाठी जमशेदजी टाटा तेथे गेले होते. परंतु त्या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता नाही. रेल्वे नाही. त्यामुळे ते तेथे गेले नाहीत. ते टाटानगरला गेले. माननीय मंत्री महोदय, श्री. बबनराव पाचपुते, मी आपणास का थांबविले ? वन आणि पर्यावरणासंबंधी 1980मध्ये आपण कायदा पास केला. त्यामुळे गडचिरोली जिल्हयात एकाही सिंचन प्रकल्पाचे काम सुरु नाही. सर्व कामे बंदइ आहेत. रस्त्याची कामे बंद आहेत. वन विभाग ती कामे करु देत नाही. रस्त्यांची कामे बंद, सिंचनाची कामे बंद. 1980च्या कायद्यामुळे या कामाच्या सर्व नस्त्या दिल्लीत अडकल्या आहेत. वैनगंगा नदी ही गडचिरोली जिल्ह्यामधून वाहते. मी जेव्हा अकलूज येथे हेलिकॉप्टरमधून फिरलो त्यावेळी भर उन्हाळ्यामध्ये ती नदी पाण्याने पूर्ण भरलेली पहावयास मिळाली. याचे कारण असे की अकलूजच्या भोवती जी नदी आहे तिला ठिकठिकाणी के.टी.वेअर्स् बांधलेले आहेत. सभापती महोदय, कोणत्याही प्रकल्पाचे काम गडचिरोली जिल्ह्यामध्ये सुरु नाही. कामासाठी वन विभागाचा क्लिअरन्स लागतो. 1980 चा जो कायदा आपण केलेला आहे त्याबाबतीत सर्वोच्च न्यायालयाने देखील निर्णय दिलेला आहे.... माणसे मेली तरी चालतील.. आपण आदिवासी विकास महामंडळ तयार केले. मी बायोडिझेलकरिता रतनज्योत मोहसाल करंजी तेल बिया 8रु. किलोने घ्यावयास तयार आहे. परंतु महामंडळ त्या बिया साडेचार रुपयाने घेते. त्यांना ते बाहेर विकू देत नाही. आदिवासी जी वनउपज गोळा करतात त्यांची बाजार भावापेक्षा अर्धी किंमत दिली जाते. शासनाने आदिवासींचे भले करण्याकरिता कायदा तयार केला. त्यानुसार आदिवासींचा माल बाहेरच्या लोकांनी घ्यावयाचा नाही. मोहाची फुले ज्याला पाहिजे असतील तो त्यांची तेवढी किंमत देईल. किंमत जास्त मिळाली तर जास्त फुले गोळा होतील. आदिवासी वनात फिरत फिरत मोहाची

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी....)

फुले गोळा करतात. त्यांना साडेचार रुपया ऐवजी 10 रुपये मिळत असतील तर ते त्यांना मिळू द्यावयास पाहिजे. परंतु मोहाची फुले आदिवासींनी बाहेरच्या माण्साला विकावयाची नाहीत असा आपला दंडक आहे. मात्र 3 किंवा 4 रुपये किलोने ती फुले महामंडळाने विकत घेऊन त्यांचे शोषण करायचे. म्हणजे आदिवासींचे शोषण करणे हे आदिवासींचे कल्याण अशा पध्दतीचा आपला कारभार आहे. धानाची बाजारामध्ये 1200 रु. क्विटंल किंमत असताना तुम्ही त्यांच्याकडून 700 रु. क्विंटलने धान खरेदी करता. आदिवासी विकास महामंडळ हे आदिवासींचे रक्षण करण्याकरिता स्थापन केले आहे की त्यांचे शोषण करण्याकरिता स्थापन केले आहे ? श्री. सुधारकराव नाईक हे राज्याचे मुख्यमंत्री असताना विशेष कृती कार्यक्रम तयार करण्यात आला होता आणि त्या कार्यक्रमाचे प्रमुख म्हणून श्री.वामनराव गड्डमवार यांना लाल दिव्याची गाडी देण्यात आली होती. परंतु कसला कार्यक्रम आणि कसले काय ? तो विशेष कृती कार्यक्रम झाला नाही.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.शिगम 16:25

श्री.नितीन गडकरी....

आजही या विभागात रस्त्यांची कामे मोठया प्रमाणात अडकली आहेत. पुलांची कामे अडकली आहेत. मी सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून काम केलेले आहे. मंत्रालयात जे अवर सचिव बसलेले आहेत, त्यांना गडचिरोली जिल्हयात पाठवा. या अधिका-यांच्या बदल्या जोपर्यंत होत नाहीत, तोपर्यंत प्रशासनात सुधारणा होणार नाही. मंत्रालयात बसून फाईलवर कोंबडा काढणारे जे अधिकारी आहेत, त्यांच्या बदल्या गडचिरोली जिल्हयात केल्या पाहिजेत. त्या ठिकाणी ऊन, वारा आणि पाऊस काय आहे हे त्यांना कळू द्यावे. मंत्रालयात अकलेचे शेती करणारे अधिकारी बसले आहेत. गडचिरोली जिल्हयातील आदिवासींकरिता सर्व नियमात शिथिलता करुन बांधकामांचे रजिस्ट्रेशन उपलब्ध करुन द्यावीत असा मी सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना नियम केला होता. तेथील ठेकेदाराला विविध नियमात तसेच विविध सवलतींमध्ये उपलब्ध करुन द्याव्यात. कारण त्या विभागात विकासाची कामे करण्यासाठी कोणीही ठेकेदार पुढे येत नाहीत. यासंदर्भात मी वित्त विभागाकडे फाईल पाठविली होती त्या विभागाने ती फाईल रिजेक्ट करुन टाकली. वित्त विभागाने असे करता येत नाही असे अभिप्राय दिले. आदिवासी विभागात रोजगार निर्माण करुन दिला पाहिजे, तेथील आदिवासी लोकांना कामे करण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. आदिवासी विभागात कामे करण्यासाठी ठेकेदार तयार केले पाहिजेत. आज गडचिरोली जिल्हयातील परिस्थिती अतिशय खराब आहे. माझ्या फाईलच्या संदर्भात सांगण्यात आले की, ही बाब नियमात बसत नाही. या विषयाच्या बाबतीत मंत्री मंडळाच्या बैठकीत चर्चा करा त्यानंतर त्याबाबतीत निर्णय घ्यावा. ज्या अधिका-यांनी माझ्या फाईलवर अभिप्राय दिले, त्या अधिका-यांना त्या विभागातील ग्राऊंड रिॲलिटी माहिती नाही. महाराष्ट्र राज्य वन विकास महामंडळ आणि आदिवासी विकास महामंडळ हे आदिवासींच्या जीवावर कु-हाड चालविण्यासाठी शासनाने निर्माण केलेली आहेत. या महामंडळांचा काहीही उपयोग नाही. आदिवासींना गुलामगिरीतून आणि शोषणमुक्त करावयाचे असेल तर त्यांच्या मालाला चांगली किंमत देण्यात यावी व त्यांना या समस्यांमधून मोकळे करावे. फॉरेस्ट एन्व्हायरमेंटच्या कायद्यामुळे जे प्रकल्प होत नसतील, ते प्राधान्याने पूर्ण केले पाहिजेत. या विभागात जे आंध्र प्रदेशच्या धर्तीवर कोल्हापूर टाईप बंधारे मंजूर झाले आहेत, ते पूर्ण केले पाहिजेत. त्या विभागात पाणी अडविण्यासाठी जलसिंचन प्रकल्प हाती घेण्याच्या बाबतीत व हाती

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

घेतलेले प्रकल्प पूर्ण करण्याच्या बाबतीत प्राधान्याने बैठक आयोजित करावी. शेतीसाठी पाणी उपलब्ध झाले तर अडीच पटीने शेतीचे उत्पादन वाढते. म्हणून याबाबतीत शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, दुसरी विनंती पोलीस व्यवस्थेच्या बाबतीतील आहे. गडचिरोली जिल्हयात आदिवासींचे संरक्षण करण्यासाठी पोलीस संवर्गाच्या विशेष पदे निर्माण करावीत. माझे तर यासंदर्भात असे मत आहे की, इयत्ता दहावी नंतर पोलीस संवर्गाचे प्रशिक्षण देण्यासाठी दोन वर्षाचा कोर्स काढण्यात यावा. वाटल्यास तो कोर्स तुमच्या शिक्षण सम्राटांच्या शाळांमध्ये काढला तरी त्यास आमची हरकत असणार नाही. परंतु तेथील आदिवासीं मुलांकडून मात्र दहा-दहा लाख रुपये डोनेशन मात्र घेऊ नका. इयत्ता दहावी झालेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना पोलीस प्रशिक्षणाचा दोन वर्षाचा कोर्सला प्रवेश देऊन त्यांना चांगल्या प्रकारचे प्रशिक्षित करा. सभापती महोदय, मी इस्त्राईलमध्ये दहा दिवस होतो. मी तेथील मोसादच्या डायरेक्टरांना भेटलो. त्या ठिकाणच्या ब-याचशा लोकांशी माझा चांगला संबंध आहे. मी त्या ठिकाणी टेक्नॉलॉजी पाहिली. त्यात खूपच फरक मला जाणवला. त्या ठिकाणी टेलिफोन, मोबाईल फोन्स, सॅटेलाईट फोन एका मशीनच्या माध्यमातून रेकॉर्ड केले जातात. चिनी बनावटीच्या एके-47 त्यांच्याकडे वारेमाप आहेत. श्रीमती अनुजा शंकर या मध्यप्रदेशातील भोपाळ येथे डी.जी.आहेत. महाराष्ट्रातल्या नक्षलवाद्यांसाठी बंदुका तयार करण्याचा कारखाना त्यांनी भोपाळ येथे उघडकीस आणला. कै. हेमंत करकरे हे चंद्रपूर जिल्हयात पोलीस अधीक्षक होते. त्यांनी त्या ठिकाणी चांगले काम केलेले आहे. जी प्रचलित व्यवस्था आहे, जे अधिकारी आहेत, त्यांच्याकडे अत्याधुनिक शस्त्रास्त्रे नाहीत. जोपर्यंत कम्युनिकेशन सिस्टीम आहे, त्यांच्याकडे टेलिफोन, मोबाईल फोन्स, सॅटेलाईट फोन रेकॉर्डींग करण्यासाठी अत्याधुनिक मशिन्स उपलब्ध नाहीत. मी मघाशीच सांगितले की, नेपाळच्या पशुपतीनाथ पासून ते तिरुपतीपर्यंत रेड कॉर्पेट एरिया तयार करण्याचे मोओवाद्यांचे, लाल बावटयांचे एक षडयंत्र आहे. या षडयंत्रामध्ये ओरिसा,छत्तीसगड, बिहार, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, असा हा रेड कॉर्पेट एरिया आहे. हा रेड कार्पेट एरिया नकाशात दाखविण्यात आला आहे. नक्षलवाद्यांना करोडो रुपये उपलब्ध होत आहेत. या नक्षलवाद्यांना पैसे कोण पुरवितो ? माननीय गृहमंत्री श्री.जयंत

3...



ABG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.शिगम 16:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन  गडकरी....

पाटील यांना सांगू इच्छितो की, या नक्षलवाद्यांना चंद्रपूर जिल्हयातील सर्व व्यापारी पैसे देतात. चंद्रपूर जिल्हयातील बल्लारपूर पेपर मिलला शासनाकडून गेल्या वीस वर्षापासून 600 रुपये टनाने बांबू देऊन फार मोठी मेहरबानी केली जात आहे.

श्री. बबनराव पाचपुते : आता त्या पेपर मिलला बांबू देणे बंद केलेले आहे.

श्री. नितीन गडकरी : तुम्ही त्या पेपर मिलला बांबू देणे बंद करु शकत नाही. मी या गोष्टीच्या खोलात आज जाऊ इच्छित नाही. मला त्या ठिकाणचे राजकारण काढावयाचे नाही. यही मास्टर है. मैं सम्माननीय सदस्य श्री जव्हेरी जी से पूछना चाहता हूं कि वे यहां पर खड़े होकर बताए कि आज बांबू का प्रति टन भाव इनका क्या है और वहां पर उनका क्या भाव है ?

श्री.बबनराव पाचपुते : आम्ही बांबुचा भाव प्रति क्विंटल 1495 रुपये केला आहे.

श्री. नितीन गडकरी : बाजारात बांबुचा भाव प्रति टन 30 हजार रुपये आहे. त्यांचा भाव प्रति क्विंटल 650 रुपये आहे आणि आता वन मंत्री सांगता आहेत की, आता आम्ही 1495 रुपये प्रति क्विंटल भाव केला आहे.

यांनतर श्री. भोगले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.......

ते 1495 रुपये द्या. करतात का? त्यापासून मिळणाऱ्या नफ्यामधून नक्षलवाद्यांना भीतीपोटी आर्थिक मदत दिली जाते. They are not the part and parcel of the Naxalite Movement. They are not supporting the Naxalite Movement. However, the Naxalites are blackmailing them at the cost of their trade. Hence, ते पैसे देतात. सिमेंट फॅक्टऱ्या आणि नक्षलवादी यांच्यात नियमित देण्याघेण्याचा व्यवहार चालतो. तेंदूपत्ता व्यापाऱ्यांशी व्यवहार आहे. जंगलात जाऊन खरेदी करतात त्यांच्याशी व्यवहार आहेत. आदिवासी विकास महामंडळ जंगलात जाऊ देत नाही. खरेदी करु देत नाही. तुम्ही जंगलात जायचे नाही, विकत घ्यायचे नाही. इकॉनॉमी ओपन केली पाहिजे. Let there be a competition. याच्यापेक्षा कमी दराने खरेदी करायची नाही असे आदेश काढा. इतक्या दराच्या खाली खरेदी केली तर तो गुन्हा ठरेल असे आदेश काढा.

सभापती महोदय, वन संरक्षण कायद्यामुळे विकासाची कामे बंद पडली आहेत. नॅशनल हायवे, स्टेट हायवे, व्हिलेज रोडची कामे बंद आहेत. बांधकाम मंत्र्यांना याची कल्पना आहे का हे मला माहिती नाही. सन्माननीय गृहमंत्री श्री.जयंत पाटील यांनी पहिले काम करावे ते म्हणजे मुख्यमंत्र्यांसमवेत बांधकाम विभाग, सिंचन विभाग, वन विभाग व आदिवासी कल्याण विभागाची संयुक्त बैठक घ्यावी. आदिवासी कल्याण विभागाने मशिन्स वाटल्या, सायकली वाटल्या. माल कमावला. लक्ष्मीदर्शन जोरात झाले. त्यापेक्षा या जिल्हयात पैसा हा रस्त्याकरिता वापरावा. मी बांधकाम मंत्री असताना तेच केले होते. आदिवासी विभागाचा निधी हा पाटबंधारे आणि बांधकाम यासाठी डायव्हर्ट केला होता. त्या जिल्हयात पाणी मिळाले पाहिजे, चांगले रस्ते झाले पाहिजेत, हॉस्पिटल झाले पाहिजे, चांगली उपकरणे मिळाली पाहिजेत, चांगले डॉक्टर तेथे गेले पाहिजेत. माझे म्हणणे आहे की, नक्षलवादी आम्ही निर्माण करतो. मेडिकल कॉलेजमध्ये आदिवासींसाठी वेगळी मेरिट लिस्ट तयार करा. घटना दुरुस्तीसाठी केंद्र सरकारला शिफारस करा. एमबीबीएस झालेले डॉक्टर त्याठिकाणी जायला तयार नाहीत. त्या भागात रहायला तयार नाहीत. त्या आदिवासींनी फक्त तडफडून मरायचे का? आम्ही शासनाकडे कागद घेऊन येतो, त्यांची बदली करायची. आयुष्यभर आदिवासी क्षेत्रात काम करण्याची तयारी आहे त्यांची वेगळी लिस्ट करा. त्यांनी आयुष्यभर त्या भागात प्रॅक्टिस केली पाहिजे. श्री.दत्ता मेघे यांनी कै.बाबा आमटे यांच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.........

मुलाला एकही पैसा न घेता त्यांच्या मेडिकल कॉलेजमध्ये ॲडमिशन दिली होती. आज गरज आहे. ते गरीब आदिवासींची आज सेवा करीत आहेत. मी त्यांचे स्वागत करतो. एकही डॉक्टर तेथे जायला तयार नाही. श्री.बंग यांची संस्था तेथे काम करीत आहे. श्री.विकास आमटे यांच्या गडचिरोली प्रकल्पामध्ये वाघाचे बछडे त्यांच्यासोबत खेळत असल्याचे आपण पाहतो. त्यांना शासन मदत देत नाही. महारोगींना अनुदान मिळाले नाही म्हणून उपोषण करण्याची परिस्थिती येते तरी तुम्ही काही करु शकत नाही. जे चांगले काम करीत आहेत त्यांना तरी मदत करा. तुमचे कल्याण अधिकारी, वेल्फेअर अधिकारी माल घेतल्याशिवाय केस मंजूर करीत नाहीत. अनुदान मिळणे म्हणजे काय? पैसे दिल्याशिवाय फाईल काढत नाहीत. शेवटी ज्यांना अनुदान हवे ते म्हणतात, भीक नको. सर्च नावाची संस्था त्या भागात चांगले काम करीत आहे. हा प्रश्न केवळ गृह विभागाचा नाही. हा युनिव्हर्सल सेन्सिटिव्ह प्रॉब्लेम आहे. पशुपतीनाथ ते तिरुपतीपर्यंत रेड कार्पेट एरिया प्लॅन आहे. त्यांच्याकडे रॉकेट लाँचर आहेत. चांगली उपकरणे आहेत. आमच्या पोलीस दलाकडे वेल इक्वीपमेंट नाहीत. मी विनंती करतो, मी सरकारमध्ये होतो तेव्हा म्हणायचो, काही हरकत नाही, माझ्याबद्दल वाकडे लिहिले तरी हरकत नाही. मग मी म्हणायला लागलो. I like honest people who can get the things done. मग म्हणायला लागलो. Even, I like dishonest people who can get the things done. I also like dishonest people who can take the decisions. However, I dislike people who do not want to take the decisions. मी बरोबर बोलत नाही. हे फ्रस्ट्रेशनमधून निघालेले उद्‌गार आहेत.

(नंतर 2आय.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.......

लोक कसे बोलतात याचा इंटिग्रेटेड विचार करणे आवश्यक आहे. माझ्या काळात मी बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनकडे या भागातील रस्त्यांची कामे दिली होती. परंतु आज बीआरओचे लोक फुकट पगार घेत आहेत, त्यांची कामे बंद पडली, त्यांना कामे मिळत नाहीत आणि अनुदान सुध्दा नाही. याचे कारण कामे मिळण्यासाठी ते पैसे द्यायला तयार नसतात. त्यांच्याऐवजी कुणीतरी ठेकेदार इकडे येऊन संबंधित विभागाच्या सगळ्या डेस्क ऑफिसर्सना पैसे देतात आणि आपली कामे मंजूर करुन घेतात. बीआरओ आणि मिलेटरीवाले लोक असे काहीही करणार नाही. अशीच पोलिसांची स्थिती आहे. नक्षलवाद्यांसमोर आपले पोलीसवाले इक्विपमेंटच्या हिशेबाने, प्रशिक्षणाच्या हिशेबाने, टेक्नॉलॉजीच्या हिशेबाने कमी पडतात. मला असे म्हणण्याचा नैतिक अधिकार नाही परंतु अशी सूचना जरुर करणार की, पोलिसांमध्ये आपण ओव्हर टाईम सुरु करावा, चांगले काम करणाऱ्या माणसाला सन्मान मिळाला पाहिजे, वाईट काम करणाऱ्यांना शिक्षा मिळाली पाहिजे. आपल्या राज्यात एक राहूल गोपाल नावाचे पोलीस अधिकारी होते, त्यांच्या प्रकरणाच्या संदर्भात मी तत्कालीन गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांच्याकडे पाच वेळा गेलो होतो. कारण एका चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्याचा लहानशा प्रकरणात बळी घेतला गेला होता. हा अधिकारी एकदम चांगले काम करीत होता, रात्री-अपरात्री जात होता. माझी तर अशी सूचना आहे की, असे चांगले काम करणारे जे अधिकारी असतात त्यांच्या बाबतीत बोनाफाईड मिस्टेक आणि मालाफाईड मिस्टेक अशा प्रकारे विचार करावा. चिल्लर-चाल्लर प्रकरणांच्या बाबतीत अगदीच नियमांवर बोट ठेवून त्यांचे अशा प्रकारे खच्चीकरण करु नका. अशा प्रकारे महात्मा गांधी आणि विनोबाजींच्या विचारांनी या काळात काटेकोरपणे वागायला लागलात तर पोलीस दलात एकही चांगला अधिकारी शिल्लक राहणार नाही. मी हे अगदी मनापासून सांगत आहे. त्यातल्या त्यात कमीत कमी कोण मागतो, कोण कमीत कमी घेतो ते चालू द्या, त्यांचे काम ते इमानदारीने करतातच. अशा प्रकारे कोणी इमानदारीने काम करणारा असेल तर त्याला त्याचे काम करु द्या. एमपीएससीच्या बाबतीत जे प्रकरण झाले होते त्यात पुजारी नावाच्या अधिकाऱ्याच्या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्री लवकर निर्णय घेत नव्हते म्हणून मी उभा राहिलो आणि सांगितले की, कोर्टाची जर हिंमत असेल तर विधानसभेची निवडणूक लढवून दाखवावी. पुजारीची चौकशी करा, तो तुमचा अधिकार आहे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

त्यानंतर ते सस्पेंड झाले. अशा प्रकारे पोलीस अधिकाऱ्यांचे मनोधैर्य वाढविण्याचे काम केले पाहिजे व त्यासाठी डिटेल इंटिग्रेटेड प्रोजेक्टचे पॅकेज तयार करुन त्या सर्वांवर उपाययोजना केली तरच त्याचा फायदा होऊ शकतो. या अनुषंगाने मी अशी विनंती करतो की, अशा वेळेस काम करीत असताना जेथे जबाबदारीची जाणीव असते, त्यांना धोकाही असतो. म्हणून मी सूचना करु इच्छितो की, माझ्याबरोबर गडचिरोलीतील सिरोंचा, एटापल्ली या टोटल इंटिरियर एरियामध्ये आपण दौरा करा. The people will remember you for 100 years. कारण गेल्या 10-20 वर्षात एकही मंत्री गडचिरोलीतील इंटेरियर एरियामध्ये जात नाही.....अडथळा......आपण गेलात त्याबद्दल दोघांचेही अभिनंदन करतो. शेवटी जनतेचे मनोधैर्य राजानेच वाढविले पाहिजे. राजा जोपर्यंत जनतेच्या मागे उभा राहणार नाही तोपर्यंत जनतेची हिंमत वाढणार नाही. आताच झालेल्या निवडणुकांमध्ये आम्ही हरलो तर हरलो पुन्हा नव्याने लढू असे म्हणून माझ्या 250 कार्यकर्त्यांना गुलाब जामुनचे जेवण दिले, व पुन्हा कामाला लागावे, अशा प्रकारे पाठबळ देण्याचा प्रयत्न केला. म्हणून सरकारने देखील याचप्रमाणे पोलिसांचे मॉरल वाढविले पाहिजे. कारण कुठलाही पोलीस अधिकारी हा केवळ बंदुकीने लढत नाही, बुलेटने लढत नाही तर तो मनानेच खरी लढत देतो व त्यासाठी त्याचे मनोबल वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. मनोबल नसेल तर त्याच्या हातात एके-47 सारखे अत्याधुनिक शस्त्र जरी दिले तरी तो लढू शकणार नाही. अशा प्रकारे बंदूक नसली तरी मनोबल तरी आवश्यक आहे. हे मनोबलच आज ढासळलेले आहे. म्हणून माझी विनंती आहे की, गडचिरोली जिल्ह्यात जी खनिज संपत्ती आहे तिच्या आधारावर उद्योग उभे करण्यासंबंधी शासनाचे जे धोरण आहे त्याचा अहवालही शासनाकडे आहेच. या जिल्ह्यात चुनखडीचे प्रमाण भरपूर असून त्या माध्यमातून एसीसी, एल अँड टी सारख्या कंपन्याच्या माध्यमातून उद्योग उभे करण्याचा प्रयत्न करावा. तसेच गडचिरोलीमध्ये युरेनियमचा साठा देखील मोठ्या प्रमाणात आढळून येतो.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

जगातील जेवढी खनिज संपत्ती आहे तेवढी ती या ठिकाणी एकदम जंगलाच्या खाली आहे. दिल्लीचे वन विभागाच्या अधिका-यांना कोणीही आणि कितीही समजून सांगितले तरी ते काही एक ऐकत नाही. ते शोषक आहेत, ते सावकारांचे सुध्दा बाप आहेत. सेशन साहेबांनी 1980 सालाममध्ये कायदा करुन पूर्ण विदर्भाची मान कापून टाकली. आता या ठिकाणी काही सुध्दा झुडपी जंगल शिल्लक नाही. आज 100 एकरावर एक झाड सुध्दा या ठिकाणी दिसत नाही तरी असे असतांना सुध्दा झुडपी जंगल, झुडपी जंगल म्हणून या ठिकाणी कोणतेही प्रोजेक्ट आणले जात नाहीत. या अधिका-याचे डोळे फुटले आहेत काय? अधिकारी असे म्हणतात की, "No, we are not concerned with the records, we do not believe on records." But, whatever is written with in revenue department's record is final for that purpose. या ठिकाणी कोणतेही काम करावयाचे नाही, रस्ता करावयाचा नाही, नळाची पाईपलाईन टाकायची नाही, विजेचे खांब सुध्दा टाकू द्यायचा नाही असा प्रकार विदर्भात चालला आहे. विदर्भाचे सगळया बाजून शोषण होत आहे.

सभापती महोदय, 47 डीग्री सेल्सिअस टेंपरेचरमध्ये पोलीस जवान काम करीत असतात त्यामुळे त्यांच्या त्यागाला मी सलाम करतो. त्यामुळे या पोलीस जवानांना नाहक मरु देऊ नका. जेव्हा माननीय पंतप्रधानांची गाडी येते, विरोधी पक्ष नेते श्री. अडवाणी यांची गाडी येते तेव्हा भुसुरुंगाचा शोध घेण्यासाठी अगोदर दोनच गाडया पुढे पाठविल्या जातात. आपली काय एवढी आर्थिक स्थिती खराब आहे की, आपल्याला भुसुरुंग शोधण्याच्या चार गाडया घेता येत नाहीत? एवढया मोठया व्यक्ती आलेल्या असतांना सुध्दा त्यांना चांगल्या प्रकारची सुरक्षा देता येत नाही? नक्षलवाद्यांजवळ रॉकेट लॉंचर आहेत, सॅटेलाईट फोन्स आहेत परंतु आपल्या जवनाकडे अत्याधुनिक शस्त्रास्त्रे का दिली जात नाहीत हे मला काही समजत नाही. आपल्या जवानांना तुम्ही जगातील अत्याधुनिक शस्त्रास्त्रे का देत नाहीत? आमच्या पोलिसांकडे आज ज्या बंदुका आहेत त्या दुस-या महायुद्धातील उरलेल्या बंदुका आहेत. पोलिसांना युनियन करता येत नाही, त्यांना काही बोलता येत नाही याचा फायदा घेऊन पोलीस जवानांना तुम्ही अशा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

प्रकारे बळीचा बकरा करता का ? माझी माननीय गृहमंत्र्यांना हात जोडून विनंती आहे की, शहरात दोन चार गोष्टी कमी करा, बजेट मधील दोन तीन शे कोटी रुपये वेगळे काढा, टाईम बाऊंड प्रोग्राम तयार करा, आदिवासी, पीडब्ल्यूडी, एरिगेशन, पब्लीक हेल्थ आणि होम या चार डिपार्टमेंटचा टर्न की बेसीसवर टाईम बाऊंड प्रोग्राम तयार करुन जिल्हयाचा मास्टर प्लॅन तयार करा. जर तुम्ही अशा प्रकारे एकाच वेळी तीन चार गोष्टी केल्या तर चांगले होईल. 1980 च्या पर्यावरण कायद्याच्या विरुध्द सुप्रिम कोर्टात शासनाने गेले पाहिजे. विदर्भातील सर्व खाणी उघडल्या पाहिजेत. या ठिकाणच्या तरुण आदिवासींना रोजगार मिळाला पाहिजे, तेथे रेल्वे लाईन झाली पाहिजे, त्यांना आवश्यक असणा-या सर्व सोयी सुविधा पुरवल्या पाहिजेत. या ठिकाणचा हायवे 16 वर्षापासून बंद पडलेला आहे. या राज्याचे माननीय मुख्यमंत्री पार्लमेंटचे अधिवेशन असतांना दर वेळेस राज्यातील सर्व खासदारांना बैठकीसाठी बोलवित असतात परंतु एकदा तरी या ठिकाणच्या बंद पडलेल्या हायवेचा विषय चर्चेत घेण्यात आलेला आहे का हो? या ठिकाणच्या प्राणहिता नदीवरील पूल झालेला नाही तसेच छत्तीसगड-महाराष्ट्र व मध्यप्रदेशला जोडणारा रस्ता पूर्ण होऊ शकला नाही परंतु या रस्त्याच्या संदर्भात कधीही चर्चा होतांना दिसत नाही. नक्षलवादी भागात रेल्वे, रोड, शाळा, उत्पन्नाची साधने वाढली पाहिजेत तसेच सर्व सुविधा मिळाल्या पाहिजेत. गडचिरोली जिल्हयात मोहाच्या फुलांची टोळ आहे. मी दररोज नॉन एडीबल ऑईल सीड पासून 3000 लिटर डिझेल तयार करतो. जर गडचिरोली जिल्हयातून अशा प्रकारेच डिझेल तयार केले गेले तर रोज 2 लाख लिटर डिझेल तयार होऊ शकेल. या ठिकाणी जर डिझेल तयार झाले तर त्याचा फायदा या ठिकाणच्या आदिवासींना मिळू शकेल. परंतु आपण या आदिवासींना इनकरेज करीत नाही. त्यामुळे येथील आदिवासींना रोजगार कसा मिळेल याचा विचार केला गेला पाहिजे. "मूल" येथे सन्माननीय पाटील साहेबांचा एक प्लँट आहे. या ठिकाणी ते राईस विकत घेतात व त्यामुळे या ठिकाणी चांगल्या प्रकारचा रोजगार निर्माण झाला आहे. रोजगार आणि विकास तसेच पोलिसांचे चांगली साथ मिळली अशा तिन्ही गोष्टींचा समन्वय केला तर या ठिकाणचे प्रश्न सुटू शकतील.

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MMP/ KGS/

श्री. नितीन गडकरी .....

या ठिकाणी आता 16 पोलीस जवानांचे जीव गेले आहेत, या आधी 15 पोलीस जवानांचे जीव गेले आहेत. यामध्ये खबरे सुध्दा मारले गेले आहेत. या ठिकाणी आतापर्यंत जवळ जवळ 700-800 लोक मारली गेली आहेत. या ज्या घटना आहेत त्या मानवतेला कंलंकित करणा-या आहेत. या घटनेच्या आधारावर चांगला कार्यक्रम तयार करा व या कार्यक्रमामध्ये जो फिल्डवर जाईल त्याला समितीवर घ्या अशी माझी आपल्याला विनंती आहे. मंत्रालयामधील उप सचिव, अवर सचिव जे आहेत ते इ ाारीतील शुक्राचार्य आहेत. त्यांना हा कार्यक्रम तयार करण्यास सांगू नका. त्यांचा या कार्यक्रमाशी काहीही संबंध नाही त्यांना या विषयाच्या संदर्भात काहीही माहिती नाही.गडचिरोली जिल्हयासबंधी त्यांना माहिती नाही.गडचिरोलीतील "ग " सुध्दा त्यांना माहीत नाही. तेव्हा या अधिका-याचे शासानाने ऐकू नये. आपण राज्यकर्ते आहात तेव्हा शासनाने प्रॅक्टीकल माहिती घ्यावी आणि त्या माहितीच्या आधारे ॲक्शन प्लॅन तयार केला पाहिजे. जो काही ॲक्शन प्लॅन तयार करण्यात येईल तो टाईम बाऊन्ड एक्झिक्युट करण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली पाहिजे. दर महिन्याला आढावा बैठक घेण्यात आली तर काही प्रमाणात हा प्रश्न सुटू शकेल व पोलिसांचे प्राण वाचू शकतील. काही दिवसापूर्वी 16 पोलीस जवान मृत्युमुखी पडले त्याच्या अगोदर 15 पोलीस जवान मृत्युमुखी पडले होते व पुढील अधिवेशनात नियम 289 अन्वये या विषयावरच माननीय दिवाकर रावते साहेबांना प्रस्ताव टाकावा लागेल. आजची जी परिस्थिती आहे ती पाहून हे प्रकार थांबतील असे मला तरी वाटत नाही. ही सुरुवात आहे. भविष्यात यापेक्षाही मोठया घटना घडण्याची शक्यता आहे त्यामुळे संवेदनशील राजाचे स्वरुप सरकारने दाखवावे एवढी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

---------

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपुर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : आदरणीय सभापति महोदय, नक्सलग्रस्त क्षेत्र में 21 मई 2009 को 16 पुलिस अधिकारियों की हत्या हुई और इस विषय पर सभागृह में चर्चा उपस्थित हुई है. इस चर्चा के माध्यम से मैं यह कहना चाहता हूँ कि इससे पहले भी फरबरी के महीने में 15 पुलिस के लोग मारे गए थे. हर महीने, हर साल पुलिस के लोग मारे जा रहे हैं, पब्लिक भी मारी जा रही है, इस बारे में शासन को देखना चाहिए कि ऐसी घटनाएं क्यों हो रही हैं ? कौन लोग नक्सलवादी हैं और उनको पैसा कहां से मिल रहा है ? नक्सलवादियों के पास नए हथियार आ रहे हैं. हम देखते हैं कि हमारे देश में सीमा पर कितनी सिक्योरिटी है, हम लोग बाहर जाते हैं तो छोटी सी चीज या पिन भी नहीं ला सकते हैं तो फिर बड़े बड़े हथियार उनके पास कहां से आ रहे हैं. मैं पूछना चाहता हूँ कि क्या सरकार के पास इन बातों की जानकारी है ? पिछले कई सालों से इस प्रकार की घटनाएं हो रही हैं, शासन ने इस बारे में चौकशी तो की होगी.

सभापति महोदय, गडचिरोली और चंद्रपुर जिले में पुलिस अधिकारियों को जानकारी देने के लिए कई सी.आई.डी. होते हैं. अलग अलग गांवों के आदिवासी लोग पुलिस की मदद करते हैं और कई बार गांव के सरपंच खबर देने का काम करते हैं. ऐसे लोगों को नक्सलवादी जान से मार देते हैं. मेरा सरकार से यह प्रश्न है कि पुलिस की मदद करने वाले जिन लोगों को नक्सलवादियों ने मार दिया है, उनकी मदद करने के बारे में शासन का क्या धोरण है ? जो लोग मारे गए हैं, उनके परिवार को मदद देने के बारे में शासन की क्या नीति है ? शासन की तरफ से इन लोगों को पूरी मदद मिलनी चाहिए.

सभापति महोदय, गडचिरोली जिले का 60 से 65 प्रतिशत भाग वन से व्याप्त है और चंद्रपुर जिले का 40 से 42 प्रतिशत भाग वन से व्याप्त है. देश के लिए वन बहुत आवश्यक है और हमारे वैज्ञानिकों का कहना है कि कम से कम 27 प्रतिशत वन होना बहुत जरुरी है. चंद्रपुर और गडचिरोली जिले ने वन को संभालकर रखा है. इसलिए मैं माननीय वन मंत्री से पूछना चाहता हूँ कि आप हमें इस बात का फायदा देंगे या नहीं. हमारे बच्चे पुलिस विभाग में भर्ती हो रहे हैं और वही बच्चे शहीद हो रहे हैं. हम यहां पर जय महाराष्ट्र का नारा लगाते हैं. हम यहां पर जय विदर्भ का नारा नहीं लगाते हैं और मेरे दिल की भावना है कि हम यहां पर जय चंद्रपुर और जय गडचिरोली का नारा न लगाएं. महाराष्ट्र शासन का जी.आर. है, महाराष्ट्र

. . . भाषण जारी LL 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. जव्हेरी

शासन का कायदा है कि नक्सलग्रस्त भाग में जो लोग 2 साल से काम कर रहे हैं, उनको मर्जी की बदली देनी चाहिए. लेकिन पुलिस विभाग और अन्य विभागों में हमारे बच्चों की भर्ती की जाती है और नक्सलग्रस्त भाग में 10 साल काम करने के बाद भी उनको मर्जी की बदली नहीं दी जाती है. मैं शासन से पूछना चाहता हूँ कि ऐसे कितने कर्मचारियों को आपने मर्जी की बदली दी है ?

सभापति महोदय, सब से अहम प्रश्न यह है कि नक्लवादियों के पास पैसा कहां से आ रहा है ? सरकार के अधिकारी और कर्मचारी वहां पर एक रोड नहीं बना सकते. प्राईवेट लोग, प्राइवेट उद्योगपति वहां पर लाखों, करोड़ों रुपए का बम्बू, लकड़ी और कोयला जंगल में कैसे बनाते हैं, उनको कहां से संरक्षण मिलता है ? मैंने एक बार सभागृह में इन लोगों के बारे में जानकारी दी थी, लेकिन इस बारे में कोई कार्रवाई नहीं हुई. हेमंत करकरे जब हमारे जिले में अधिकारी थे, उनके पास इन लोगों की पूरी लिस्ट थी. हर पुलिस अधिकारी के पास जानकारी रहती है कि कौन आदमी क्या कर रहा है. पुलिस इतनी होशियार है कि चोरी होने के पहले ही उसके पास जानकारी होती है. पुलिस के पास पूरी जानकारी होती है, लेकिन शायद वह सरकार को बताना नहीं चाहती, क्योंकि अगर सरकार को बताया तो उस फाईल को पेन्डिंग रख दिया जाता है. नक्सलवादी कौन हैं और इनको फंड कौन दे रहा है, इस बारे में सरकार को मालूम है, लेकिन उनको सजा कौन देगा ? अगर सरकार हिम्मत दिखाए तो 15 दिन में पूरा नक्सलवाद साफ हो सकता है. राजुरा की तरफ आन्ध्र प्रदेश की सीमा पर नक्सलवाद था, वहां पर अब नक्सलवाद नहीं है. इसका कारण यह है कि वहां के नागरिकों ने, वहां पर रहने वाले लोगों ने नक्सलवादियों को समर्थन देना बंद कर दिया. इसलिए अब राजुरा की सीमा पर नक्सलवाद नहीं है. आन्ध्र प्रदेश की सरकार ने वहां की जनता की इतनी मदद की कि उन्होंने नक्सलवादियों का साथ छोड़ दिया. अगर नक्सलवादियों के बारे में सरकार के पास माहिती है तो उनके ऊपर कड़ी कार्रवाई करनी चाहिए.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.......भाषण जारी, नंतर तालेवार.

श्री जैनुद्दीन जव्हेरी......

आज नक्सलवादी 100-100 आदमियों को मार रहे हैं. क्या हिन्दुस्तान में कानून है ? मैं एक बार एक वकील के पास बैठा था. वह मुझे समझाकर बता रहा था कि भारत में ऐसा कानून है कि सौ गुनेहगार छूट जाए लेकिन एक भी बेगुनाह को सजा नहीं होनी चाहिए. तो इस तरह से सौ-सौ गुनेहगार छूट जाते हैं. इन 60 सालों में ऐसे कितने गुनेहगार छूट गए होंगे, इसका आप हिसाब लगा सकते हो. इसलिए मैं यह कहना चाहता हूं कि गडचिरोली और अन्य क्षेत्रों में व्याप्त नक्सलवाद को खत्म करना हो तो पहले वहां के निवासियों को, आदिवासियों को संरक्षण मिलना चाहिए. वहां के निवासियों के पास रहने के लिए घर नहीं है. आज भी उनके पास पहनने के लिए कपड़े नहीं है. औरतों को कपड़ा नसीब नहीं है. खाने के लिए अनाज नसीब नहीं है. वे फल-फूल खाकर रहते हैं. कई सामाजिक संस्था वहां काम रही है. मैं यह पूछना चाहता हूं कि सरकार के हाथ इतने लंबे होने बावजूद सरकार की योजनाएं वहां के निवासियों तक क्यों नहीं पहुंच रही है, क्या सरकारी योजना वहां तक पहुंच रही है ? सरकार अपने बजट में वहां के निवासियों के लिए जितनी धनराशि का प्रावधान करती है, क्या वह धनराशि वहां तक पहुंचती है ? आज भी उनके पास मकान, कपड़े और जमीन नहीं है. खेती करने के लिए पट्टे नहीं है. वन विभाग के कानूनों के कारण योजनाएं नहीं हो पा रही है. आज 60 साल हो गए हैं, मैं यह पूछना चाहता हूं कि सरकार ने वहां कितने लोगों को पट्टे दिए है ? इन्हीं कारणों के कारण वहां की जनता जानबूझ ाकर नक्सलवादियों का समर्थन कर रही है. नेतागण भी वहां जाने से डरते हैं. नेताओं का यह हाल है कि वे कुछ भी बताने से डरते हैं क्योंकि कहीं जान न चली जाए. माननीय श्री नितीन राऊत जी, जरुरत इस बात की है कि आप वहां की जनता को भरोसा दिलाए. गडचिरोली में गरीब, आदिवासी एवम् अनेक समाज के लोग रहते हैं. इन सभी लोगों तक सरकारी योजना पहुंचनी चाहिए. वहां के निवासियों के साथ हो रहे अन्याय को दूर किया जाए. मैं आपको एक उदाहरण देता हूं. वहां उद्योग स्थापित हुए लेकिन नक्सलवादियों के डर के कारण इंजीनियर वहां से भाग गए. नक्सलवादियों के डर से कुछ उद्योग बंद हो गए. कुछ उद्योग चल रहे हैं. मैं किसी का नाम नहीं लेना चाहता. कुछ प्राईवेट इंडस्ट्रीज वहां चल रही है. उनका 12 हजार टन का उत्पादन है. लेकिन वे 200 लोगों को भी काम नहीं दे रहे हैं. अगर वहां के निवासियों को उद्योगों में काम नहीं दिया जा रहा हो तो ऐसे उद्योग क्या काम के है ? वे उद्योग वहां के





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जैनुद्दीन जव्हेरी......

खनिज पदार्थो और अन्य सुविधाओं का लाभ उठा रहे हैं लेकिन वहां के निवासियों का कोई फायदा नहीं हो रहा है. उद्योग ऐसे होने चाहिए ताकि वहां के लोगों को रोजगार मिल सके. वहां के निवासियों को मूलभूत सुविधाएं मिलनी चाहिए. अगर सरकार नक्सलवाद खत्म करना चाहती है तो वहां के निवासियों को मूलभूत सुविधाएं मुहैया कराए. नक्सलग्रस्त क्षेत्रों के लोगों के लिए रोटी, कपड़ा, मकान, बिजली, पानी, रास्ते, यातायात, इत्यादि आवश्यक सुविधा उपलब्ध करायी जाए. दूसरा मेरा यह सुझाव है कि वन कानून, 1980 जो योजनाओं के आड़े आ रहा है, उसके बारे में भी गंभीरता से विचार किया जाना चाहिए. क्योंकि गडचिरोली, चंद्रपुर जिलों में ग्राम पंचायत, नगर परिषद, जिला परिषद की अनेक योजनाएं वन कानून के कारण शुरु नहीं हो सकी है. रोड बनाना हो तो वन कानून बीच में आता है. गडचिरोली के मुख्य कार्यकारी अधिकारी को महाराष्ट्र सरकार की ओर से इस आशय का पत्र भ्ेजा गया है कि अगर तीन मीटर के रास्ते की जगह 4 मीटर का रास्ता करने पर और उसके लिए वन जमीन का उपयोग किया जाएगा तो वह अपराध माना जाएगा और संबंधित अधिकारियों के खिलाफ अपराध रजिस्टर किया जाएगा और नौकरी से भी हटा दिया जाएगा. इसलिए मैं यह कहना चाहता हूं कि ऐसी स्थिति में वहां के प्रश्न हल कैसे होंगे, योजनाएं कैसे पूर्ण होगी ? ये परिस्थितियां ही नक्सलवाद को बढ़ावा दे रही है. नक्सलवाद को खत्म करने के लिए जनता का समर्थन जरुरी है.

इसके बाद श्री शर्मा...

असंशोधित प्रति/प्रकाशनार्थ नहीं

APR/MAP/KGS/SBT पूर्वी श्री. तालेवार . . . . 17:00

. . . . . श्री. जव्हेरी

वहां की जनता को, वहां के लोगों को चाहे वे आदिवासी हों या कोई और हो, उनको साथ में लेना बहुत जरुरी है. सरकार पुलिस डिपार्टमेंट के पास नक्सलग्रस्त क्षेत्र में जन जागरण सम्मेलन के लिए करोड़ों रुपए दे रही है और यह अन-ऑडिटेड पैसा है. मेरी सरकार से विनंती है कि इस अन-ऑडिटेड एमाउन्ट के ऊपर नजर रखें. एक सम्मेलन के लिए 1-2 लाख रुपए देते हैं. क्या यह पैसा वाकई इस्तेमाल होता है या सिर्फ इसका जमा खर्च किया जाता है. महाराष्ट्र शासन जिन गरीबों के लिए यह पैसा दे रहा है, उन लोगों तक यह पैसा पहुँचना चाहिए. हमें जन जागरण सम्मेलन के जरिए लोगों के दिल से डर निकालना पड़ेगा और उनको यह महसूस होना चाहिए कि सरकार उनके साथ है. इसके लिए हम एक साल में पूरा करने के लिए पैकेज बनाएं कि कोई भी व्यक्ति बिना मकान, बिना कपड़ा, बिना खाना खाए, बिना स्कूल के और बिना दवाखाने के नहीं रहेगा. उनको मूलभूत सुविधाएं देने के लिए हम एक साल का प्रोग्राम बनाएं. वहां के लोगों का हम सचमुच में जन जागरण करें और वहां के बच्चों को मेडीकल कॉलेज में एडमीशन दें.

सभापति महोदय, मैं आपको बताना चाहता हूँ कि गडचिरोली में बन विभाग में भर्ती के लिए इन्टरव्यू हुआ था. इस इन्टरव्यू के लिए पुणे, गडचिरोली, चंद्रपुर, भंडारा, नागपुर और मुंबई के भी बच्चे वहां पर आए. इस इन्टरव्यू में हमारे यहां का एक भी बच्चा पास नहीं हुआ. क्या हमारे यहां के बच्चे वन विभाग में नौकरी नहीं कर सकते हैं. इस इन्टरव्यू में मुंबई, पुणे और नाशिक के बच्चे पास हुए. जब हमने इस बारे में पूछा तो बताया गया कि पूरा महाराष्ट्र एक है और पूरे महाराष्ट्र के लिए एक ही कायदा है. हमारा विदर्भ का क्षेत्र बहुत पिछड़ा हुआ है, हमारे बच्चे कैसे पास होंगे ? आप उनके लिए ऐसी स्कीम बनाएं कि अगर मुंबई, पुणे के बच्चों का 55 प्रतिशत पर सलेक्शन होता है तो विदर्भ के बच्चों का 40 प्रतिशत पर सलेक्शन किया जाए. आप उनको 10-15 प्रतिशत का ग्रेस दीजिए.

सभापति महोदय, जब तक सरकार का धोरण वहां की जनता के साथ, वहां के गरीब और आदिवासी लोगों के साथ नहीं होगा, तब तक वहां पर नक्सलवाद खत्म नहीं होगा और हमारी पुलिस के लोग शहीद होते रहेंगे. चंद्रपुर और गडचिरोली नक्सलवाद के लिए बदनाम है. अगर

. . . NN2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री जव्हेरी

सरकार वहां से नक्सलवाद को पूरी तरह से खत्म करना चाहती है तो सरकार को खुले मन से वहां की जनता की समस्याओं को दूर करने के लिए विशेष रुप से ध्यान देना पड़ेगा और महाराष्ट्र की सरकार चाहेगी तो नक्सलवाद नहीं रहेगा.

. . . . .

भाषण पूर्ण. नंतर NN3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**सभागृहाच्या कामकाजाच्या वेळेबाबत**</u>

**तालिका सभापती (श्री.हेमंत टकले)** : मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या विषयावरील चर्चेसाठी एकूण अडीच तासाचा वेळ निश्चित करण्यात आला असून, 6.00 वाजून 01 मिनिटांनी ही चर्चा संपेल. अजून या विषयाच्या संदर्भात सात सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत. अशा वेळी प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी भाषण करताना स्वत:वर 10 मिनिटांची मर्यादा घालून घेतली तर सर्व सन्माननीय सदस्यांना या विषयावर भाषण करता येईल. आता सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी भाषणास सुरुवात करावी.

----

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, शिवसेनेचे नेते सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि मी नियम 289 अनव्ये जो प्रस्ताव मांडलेला आहे. त्याचे कारण असे आहे की, गेल्या तीन-चार महिन्यापासून महाराष्ट्रातील पोलिसांचे नीतिधैर्य खच्ची होईल अशा प्रकारच्या घटना सातत्याने घडत आहेत. या घटनांचे मूळ काय आहे? याबाबतचा उहापोह या सभागृहात चालू आहे. नक्षलवादी विचारांच्या मूळच्या तत्वप्रणालीचा किंवा वैचारिक प्रणालीचा थोडासा विचार केला तर असे स्पष्ट दिसते की, जे तरुण निराश आहेत, बेकार आहेत, जो आदिवासी समाज आहे. ज्यांच्यापर्यंत विकासाचे कोणतेही फायदे पोहचत नाहीत अशा लोकांच्या मनामध्ये कुठे ना कुठे हे सरकार कसे अर्थहीन झालेले आहे.अशा प्रकाकरे हिंसाचाराचे समर्थन करण्याचे विचार दिसून येतात. खरे तर हे सर्व मार्क्सवादी पक्षाचे लोक आहेत. त्यातील अनेक लोक संसदीय राजकारणामध्ये आहेत. मार्क्सवादी विचारांच्या छटांचा विचार केला तर सशस्त्र क्रांती हा मुद्दा घेऊन अनेक वर्षापासून बिहारमध्ये, महाराष्ट्रामध्ये आणि आंध्रप्रदेशामध्ये 40-50 वर्षापासून सशस्त्र लढयाची परंपरा ही मार्क्सवादी विचारांशी संबंधित आहे असे चित्र दिसते. या विचारांचे परिवर्तन करण्याचा प्रयत्न अनेक लोकांनी वारंवार केलेला आहे. परंतु याच्या मुख्य कारणांकडे वळून बघितल्यानंतर निश्चितपणे असे वाटते की, गडचिरोलीत किंवा महाराष्ट्रातील नक्षलवादी चळवळीला शासन रोखू शकेलेले नाही. धनोरा तालुकयात दि. 30 जानेवारी रोजी श्री. उपेंद्र गुडधेकर, याच्यासह मर्के गावामध्ये 15 पोलीस शहीद झाले होते. दि.21 मे रोजी 16 कमांडोचे पथक मृत्युमुखी पडले त्याच्यामध्ये श्री.ए.आर. अय्यर, साताऱ्यचे सुपुत्र श्री. शांताराम घोरपडे,श्री.दामोदर नैताम, श्री. भक्तीदास शेट्टीवार, श्री. हेमराज टेंभुर्णे, श्री. काशिनाथ रोहनकर, श्री. सदानंद मडावी, श्री.विलास मांदाळे, श्री. सुरेश किरंगे, श्रीमती अलका गावडे, श्रीमती शोभा ताडे, श्रीमती सुनिता कल्ले, श्री. गेनकुवर फिरोदिया आणि श्रीमती शकुंतला आलाम अशा अनेक लोकांचा मृत्यू झाला आहे. या सदनामध्ये चर्चा करीत असताना जे लोक शहीद झाले आहेत त्यांच्या बाबतीत कुठेतरी नतमस्तक होऊन विचार करावयाला पाहिजे.एवढयाचसाठी मी या लोकांची नावे सांगितलेली आहेत. यापैकी श्रीमती अलका गावडे यांचे पती सैन्यामध्ये काश्मीरमध्ये लढत होते. श्रीमती अलका गावडेचा मृत्यू गडचिरोलीत झाला, जवळ जवळ दोन ते तीन दिवस त्यांच्या पतीला संपर्क साधता आला नाही तोपर्यंत त्यांचा मृतदेह पडून होता. जो पर्यंत त्यांचे पती

...2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MAP/ SBT/

डॉ. नीलम गोऱ्हे......

काश्मीरहून गडचिरोलीला पोहचत नाहीत तोपर्यंत श्रीमती अलका गावडे यांचा मृतदेह त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात दिला जात नव्हता. त्यामुळे गडचिरोलीतील प्रशासनाच्या विरोधात खूप तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. इतकेच नव्हे तर काश्मीरपासून गडचिरोलीपर्यंत त्याच्या पत्नीच्या मृतदेहाचे दर्शन घेण्यासाठी रजा घेऊन येण्यासाठी तिच्या पतीला अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. मी मुद्दाम याचा उल्लेख यासाठी करीत आहे की, आम्ही अमरावतीला जाऊन श्री. उपेंद्र गुडधेकरांनी यांच्या मातोश्रीला भेट दिली होती. शिवसेना कार्याध्यक्ष श्री. उध्वजी ठाकरे यांनी त्यांची विचारपूस केली होती. त्यावेळी श्रीमती रजनी गुडधेकरांनी आम्हाला स्वत: सांगितले की, त्याचे ज्यावेळी फोन यायचे त्यावेळी तो आम्हाला सांगायचा की, आई आम्हाला काही त्रास नाही. परंतु त्यांच्या आईचे म्हणणे असे होते की, त्रास नसेल तर जेव्हा तो फिल्डवर रहात होता तेव्हा त्यांच्याकडे असलेल्या बंदुका कशा होत्या? मला सन्माननीय मंत्रिमहोदयांचे याकडे लक्ष वेधावयाचे आहे की, त्यांच्याकडे चांगले शस्त्र नव्हते आणि चांगले शस्त्र नव्हते म्हणूनच श्री. करकरे आणि साळसकर सारखे पोलीस अधिकारी शहीद झाले आहेत. आज गडचिरोलीमध्ये जे पोलीस शहीद होत आहेत त्यांच्या कुटुंबियांच्या मनामध्ये आज असेच चित्र निर्माण झालेले आहे. त्यांच्या कुटुंबियांनी आम्हाला असेच विचारले की, त्यांच्याकडे कशी आयुधे होती, त्यांच्याकडे चांगली आयुधे होती काय? त्यांच्याकडे बुलेटप्रुफ जाकिटे होती काय, त्यांच्याकडे चांगल्या प्रकारची हेल्मेट्स होती काय? तसेच या शहिदांच्या कुटुंबातील महिला, माता, भगिनी, पत्नी यांनी आमच्याकडे अशी इच्छा व्यक्त केली की, तुम्हाला विधिमंडळात या शहिदांबद्दल काही काम करावयचे असेल तर एवढेच करा. गडचिरोलीमध्ये त्यांचा मृत्यू कशा पध्दतीने झाला हे आम्हाला तेथे जाऊन पहावयाचे आहे. केवढी मोठी जाबाबदारी आहे, याची मला जाणीव आहे. परंतु मला असे वाटते् की, ज्यावेळी एका कुटुंबावर असा आघात होतो, त्यावेळी तो फक्त एका कुटुंबावरील आघात नसतो तर संपूर्ण महाराष्ट्रातील पोलीस दलाचे खच्चीकरण अशा प्रसंगातून होत असते. म्हणून ज्यावेळी मुंबईवरील हल्याचा विषय चर्चेला येईल त्यावेळी आम्ही याबाबतीत आणखी तपशीलवार बोलू. परंतु या गडचिरोलीतील हल्ल्याचा संबंध पोलीस रिफॉर्म् या महत्वाच्या विषयाशी आहे. पोलिसांच्या सुधारणेच्या बाबतीत आहे.

यानंतर श्री. बरवड....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ...

राजकीय स्वरुपाचा हस्तक्षेप पोलिसांच्या बदल्यांमध्ये होता कामा नये. पोलिसांना जशी गरज आहे त्या पध्दतीने आयुधे मिळाली पाहिजेत आणि पोलिसांच्या समन्वयामध्ये कोठेही राजकीय गटबाजीचे प्रदर्शन होता कामा नये, त्या पदतीने भूमिका बजावल्या जाता कामा नये. असे पोलीस रिफॉर्ममधील मुद्दे आहेत. कोट्यवधी रुपयांचा निधी येतो पण ते पैसे आल्यानंतर किती ठिकाणी चारचाकी वाहने जातात ? ग्रामीण भागापर्यंत जिथे अनेक ठिकाणी कोठलीही सोयीसुविधा नाही तिथपर्यंत त्या कशा पोहोचत नाही. हाही एक मोठा विषय आहे असे मला निश्चितपणे वाटते. सभापती महोदय, नक्षलवादाच्या विचारातील जी हिंसा आहे त्यामध्ये जागतिक प्रकारची कार्यपध्दती आहे. या ठिकाणी मी उल्लेख करीन की, ज्या वेळेला ही गडचिरोलीची घटना घडली त्यावेळी त्याची माहिती किती मराठी वाहिन्यांवर आली ? हिंदी, इंग्रजी वाहिन्यांवर त्याची माहिती आली. त्या व्यक्तीचा नक्षलवादाशी संबंध आहे असे मी म्हणणार नाही. कारण त्याबाबत सुप्रीम कोर्ट काय सांगावयाचे ते सांगेल पण कॉम्रेड विनायक सेन नावाची एक व्यक्ती जी चळवळीत आहे, त्यांची पत्नी आमच्या ओळखीची आहे. जेव्हा कॉम्रेड विनायक सेन सुटले त्यावेळी ज्या अहमहमिकेने इंग्रजी वाहिन्यांवरुन चर्चा चालू होती की, इनोसंट लोकांना आपण का पकडता त्याच वेळेला कोणी हा प्रश्न विचारला नाही की, हे जे लोक मेले ते सुध्दा इनोसंटच होते. म्हणून मला यामध्ये असा मुद्दा मांडावयाचा आहे की, नक्षलवादाला छुप्या पध्दतीने विचाराने सहानुभूती देणारा एक इंग्रजी भाषिक, हिंदी भाषिक विचारवंतांचा फार मोठा गट भारतामध्ये आणि भारताच्या बाहेर काम करीत आहे. आपण सगळे मान्य करतो. आपण या विधीमंडळातील सभासद आहोत म्हटल्यावर सिनेमात किंवा इतर ठिकाणी जसे दाखवतात तसे आपण आमदार आहोत असे मला वाटत नाही. गडचिरोलीमध्ये विकासाची योजना न राबविता ते सगळे महाराष्ट्रातील दुसऱ्या जिल्ह्यातील तालुक्याला घेऊन जा असे या सदनातील किंवा विधासभा सदनातील कोणीही प्रतिनिधी म्हणणार नाही. परंतु सातत्याने हे चित्र समोर येते की, लोकप्रतिनिधी अपयशी ठरलेले आहेत, हे राज्य शासन अपयशी ठरलेले आहे, सरकारी अधिकारी आणि पोलीस दल हे भांडवलशहांचे पिट्टू आहेत आणि त्यामुळे यांना खलास केल्याशिवाय, येथील लोकशाही खिळखिळी केल्याशिवाय आपल्याला खऱ्या अर्थाने न्याय मिळणार

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

नाही. 15, 20, 25 वर्षापूर्वी विद्यार्थी संघटनेमध्ये काम करीत असताना, पिढ्यानपिढ्या विद्यार्थी चळवळीतून काम करीत आलेले कित्येक तरुण मुले-मुली मला माहीत आहेत. कशा पध्दतीने हिंसाचार ओढवून घ्यावयाचा याबाबत देखील आम्ही नक्षलवाद्यांच्या काही कार्यपध्दती बघितल्या आणि तेव्हापासून मग आमच्या लक्षात आले की, विद्यार्थी संघटनांनी सुध्दा नक्षलवादी संघटनांपासून अंतर ठेवले पाहिजे. मी आपल्याला दोन उदाहरणे देईन. एका ठिकाणी आदिवासींवर प्रचंड असा लाठीहल्ला झाला. अनेक वेळा पोलीस अतिरेक करतात हे निश्चित आहे. पण ज्या वेळेला मी स्वत: त्याची पाहणी करीत गेले तेव्हा असे लक्षात आले की, जे पोलीस आदिवासींना चिरडावयास लागले, मारावयास लागले त्या ठिकाणी एक कार्यकर्ता जो त्यांच्या संघटनेशी संबंधित नव्हता तो एक पोलीस उभा असताना त्याच्या दोन पायांच्या मधून धावत गेला. असे केल्यावर पोलीस एकदम चिडले आणि लाठीहल्ला सुरु झाला. म्हणजे सामान्य माणसांनी शस्त्रे हातात घेतली नव्हती.

( माननीय तालिका सभापती घंटा वाजवितात )

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझाच स्थगन प्रस्ताव आहे. आता दुसऱ्या सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे नाही. आपण प्रोसीडींग काढून तुलना करु शकता. अशा वेळी आपण फक्त इकडे बघून घंटा वाजविता आणि तिकडच्या सन्माननीय सदस्यांचे भाषण चालू देता. असा अविश्वास दाखविणे योग्य नाही. मी कोणत्या मुद्यांपर्यंत जाऊन बोलत आहे याचा आपणच विचार करावा. अशा वेळी आपण या संदर्भामध्ये दहा दहा मिनिटांचे रेशनिंग आणणार असाल तर मग प्रश्नच काय आहे ? आम्ही असे गृहीत धरतो की, गडचिरोलीमधील सगळे आमदार जरी या ठिकाणी बोलत नसले तरी त्यांचे प्रश्न आणि त्यांच्या मुद्यांपर्यंत आम्ही कधी ना कधी खोलात जाऊन विचार करण्यासाठी हे सदन आहे. नाही तर संध्याकाळी सहा वाजून पाच मिनिटांनी कामकाज संपवून त्याच्यानंतर सगळ्यांना बाकीची भरपूर कामे करण्यास वेळ आहेच. त्यामुळे सहाचे साडेसहा झाले तरी चालतील. आज अधिवेशनाचा पहिलाच दिवस आहे. कोणी काही एवढे दमून आलेले नाही. थोडा वेळ सदनाचे कामकाज चालू द्यावे अशी माझी विनंती आहे. माझा मुद्दा असा होता की, अशा पध्दतीने पोलिसांना वेगवेगळ्या पध्दतीने कोंडीत पकडावयाचे, पोलीसांना

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

डॉ. नीलम गोऱ्हे .....

आणखी निर्दयी बनवावयाचे, पोलिसांमध्ये तर असे आहेच की, कोणी अधिकारी जर का जास्त शहाणपणा करावयास लागला तर प्रत्येक सत्ताधारी त्याला असे बोलत असतो की, तुझी गडचिरोलीला बदली करु का ? मला असे वाटते की, "तुझी गडचिरोली बदली करु का " हे वाक्य तरी बदलावयास पाहिजे. त्याची गडचिरोलीत बदली करण्यापेक्षा दुसऱ्या कोणत्या तरी जिल्ह्यात बदली करा. सातारा जिल्ह्यात बदली करा किंवा पुणे जिल्ह्यात बदली करा. एखादा चुकीचा मनुष्य असेल तर निदान आम्ही बघून घेऊ शकतो. त्याच्यावर आम्ही काही तरी उतारा काढू शकतो. परंतु असा कोणी तरी अधिकारी गडचिरोलीत पाठवावयाचा का असे म्हटल्यामुळे तेथील प्रशासन फार कोंडीत सापडलेले आहे, ठप्प पडलेले झालेले आहे. मी आपल्याला दुसरे उदाहरण देईन, आपण विकासाच्या योजना म्हणतो पण रोजगार हमी योजनेसारखी योजना त्या ठिकाणी राबविणेच शक्य नाही अशी परिस्थिती आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

मघाशी बोलत असताना काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, लोकांना विश्वासात घेऊन ज्या योजना राबविल्या पाहिजेत. त्या योजना राबविल्या जात नाहीत. अशा वेळी डॉ.प्रकाश आमटे, डॉ.मंदा आमटे यांच्यासारखी माणसे गडचिरोलीत जाऊन काम करीत आहेत. तेथे सौदामिनी बिग्रेड नावाच्या विद्यापीठाच्या प्राध्यापिकेने देखील नक्षलवादाच्या विरोध काम करण्यासाठी गट तयार केलेला आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी की, नक्षलवाद्यांमध्ये महिलांचा खूप मोठा समावेश आहे. या महिला वेगवेगळया दलाचे नेतृत्व करीत आहेत, ही वस्तुस्थिती आहे. म्हणून मला या विषयावर बोलत असताना पोलीस रिफॉर्मस् करुन त्याची व्यापक स्तरावर अंमलबजावणी केली पाहिजे अशी सूचना करावयाची आहे. इतर राज्ये आणि महाराष्ट्राचे एक पथक तयार झालेले आहे. 2 वर्षापूर्वी या पथकाची बैठक झाल्याचे वाहिन्यांवरुन पाहिलेले आहे. मग पथकाची बैठक झालेली असताना या भागामध्ये शस्त्रे कशी पोहोचतात ? पोलिसांपेक्षा अधिक संख्येने नक्षलवाद्यांकडे शस्त्र पोहोचतात. त्याठिकाणी शस्त्रे तर तयार होत नाहीत. म्हणजे गडचिरोलीला जोडल्या गेलेल्या रस्त्यांमधूनच ही शस्त्रे पोहोचत आहेत. त्याच्यावर निर्बंध का आणले जात नाहीत ? रस्त्यांवरुन त्यांच्या गाडया सोडणारे प्रशासनातीलच लोक आहेत. त्या गाडयांमधून ही शस्त्रे पुरविली जात आहेत.

सभापती महोदय, तिसरा महत्वाचा मुद्दा असा आहे की, विदर्भामध्ये शेतकरी आत्महत्या करीत आहेत. दुसरीकडे गडचिरोलीत नक्षलवाद फोफावत आहे. नक्षलवादी विचार हळूहळू यवतमाळ, वर्धा आणि इतर भागामध्ये पोहोचत चालला आहे. यवतमाळ जिल्हयामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीत कापसांच्या गाडया घेऊन आल्यावर 5-5 दिवस वाट पाहून सुध्दा आपला नंबर येत नाही असे वाटल्यामुळे शेतकऱ्यांनी कायदा हातामध्ये घेतलेला आहे. त्यावेळचे गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी आम्हाला उत्तर दिले होते, की त्यामध्ये काही जीन्स पॅण्ट घातलेले शेतकरी होते. त्यांचे म्हणणे असे होते की, त्या लोकांमध्ये नक्षलवादी घुसलेले होते. पण संपूर्ण काडया कोरडया झालेल्या असताना त्यात एखादी जळती काडी टाकली तरी त्या काडीमुळे संपूर्ण गवत पेट घेते. शेतक-यांना न्याय मिळत नसल्यामुळे अक्कू यादवचे प्रकरण नागपूरला झाले होते.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

त्यावेळी लोकांनी कायदा हातामध्ये घेतला होता. नांदेडमध्ये श्रीमती उषा फड यांनी हातात पिस्तुल घेऊन त्रास देणा-या माणसाचा खून करुन टाकला. लोक आज परत परत कायदा का हातामध्ये घेत आहेत, त्याचा जर विचार करु लागलो तर नक्षलवादी विचारांची बिजे रुजण्याचे कारण आमचे प्रशासन चांगले नाही हे आहे. सगळया प्रशासनावरील विश्वास डळमळीत झाल्याचे दाखविण्याचा त्यांचा हेतू आहे. जसे नेपाळमध्ये एक मुद्दा असा आला आहे की, माओवादी लोक म्हणतात त्या पध्दतीने शासन करु लागले आहे. त्या पध्दतीचा त्या लोकांचा विचार गडचिरोली जिल्हयाबाबत असावा असे मला वाटते. शेवटी असे म्हणेन की, शस्त्राला शस्त्र असे उत्तर आहे तसे सामान्य जनतेचे विचार परिवर्तन आणि त्यांना प्रेमाने विश्वासात घेऊन विकासांच्या योजनांमध्ये बरोबर घेणे हे पण त्याचे खरे उत्तर आहे. ते झाले नाही तर कोणी तरी नक्षलवादी म्हणून पकडले जातात, काही वेळा त्यातील काही जण अतिरेकी नसतात. पण त्यांना अतिरेकी असल्याचे ठरविण्यामध्ये राजकारण असते. हे अलिकडील घटनांमध्ये पाहिलेले आहे, त्यामधून आणखी अतिरेकी तयार होत असतात. कायदा हातात घेणा-या ज्या शक्ती आहेत, त्यामध्ये केवळ भारतातील लोक नाहीत तर त्यांच्या पाठीमागे आंतरराष्ट्रीय व दक्षिण आशियाई भागातील फार मोठे जाळे आहे. त्या जाळयाच्या माध्यमातून येथील शासन खिळखिळे करण्याचा त्यांचा सातत्याने हेतू आहे. आता केंद्र सरकारमध्ये स्पष्ट बहुमताचे युपीए सरकार अस्तित्वात आलेले आहे. त्यामुळे याठिकाणी हे प्रशासन आहे, त्याठिकाणी ते प्रशासन आहे अशी फुसकी कारणे देता येणार नाहीत. मध्य प्रदेश व गुजरात या राज्य सरकारांची नक्षलवाद्यांसंबंधीची भूमिका अतिशय स्पष्ट आहे. अशा वेळी राष्ट्रीय समस्या म्हणून नक्षलवादी विचारांचा मुकाबला जसा शस्त्रांनी करावयास पाहिजे तशा विचारांना सामोरे जाण्याची हिंमत दाखविली पाहिजे. स्वत:च्या डोळयावरील चष्मा काढून जर स्वत:कडे पाहिले तर आपल्या शासनामध्ये वा प्रशासनामध्ये ती हिंमत का नाही हे देखील स्पष्टपणे लक्षात येते. म्हणून आपल्याकडे सातत्याने हे हल्ले होत असताना दिसत आहेत. जे शहीद झाले त्यांच्या कुटुंबियांना 25 लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे, दोन मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी घेण्याचे, निवृत्ती वेतन सुरु ठेवण्याचे जाहीर केले आहे. परंतु त्याच्या

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

पलिकडे त्यांच्या कुटुंबातील माणसे जोपर्यंत परत येत नाहीत तोपर्यंत या मदतीचा उपयोग होणार नाही. श्री.उपेन्द्र गुडधेकर यांच्या आई-वडिलांनी सांगितले की, त्याने पुण्यातून सिम्बॉयसिस येथून एमबीए केले होते. एमबीए झाल्यानंतर देशाची सेवा करण्यासाठी पोलीस दलामध्ये तो गेला होता. त्यामुळे सगळेजण पैशासाठी हापापलेले आहेत, 10 लाख किंवा 25 लाख मदत देण्याचा मुद्दा नाही.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 17:20

(डॉ. नीलम गो-हे...)

पण जे देशसेवेसाठी तेथे गेले त्यांना चांगली आयुधे दिली गेली नाहीत तर आपण चांगली माणसे हकनाक बळी देण्यासाठी गडचिरोलीच्या कत्तलखान्यामध्ये पाठविल्यासारखे होईल. याबाबतीत शासनाने गांभीर्याने या सदनामध्ये उत्तर दिले पाहिजे. सन्माननीय राज्यमंत्री महोदय, श्री. नितीन राऊत यांना इच्छा असून देखील उत्तर देण्याची संधी मिळत नाही. आमचाही कॅबिनेट मंत्र्यांनी उत्तर द्यावे असा आग्रह असतो. परंतु कॅबिनेट मंत्री श्री. जयंत पाटील हे मध्येच काही तरी विनोद करतात, काही तरी बोलतात. पण अंमलबजावणी मात्र होत नाही याचा खेद वाटतो. कॉंग्रेस आणि राष्ट्रवादीच्या या काळात दुर्दैवाने बळी गेलेल्या लोकांचे स्मारक उभारावयाचे झाले तर समुद्रामध्ये भर टाकून ते उभारावे लागेल. मी माननीय मंत्री महोदय श्री. जयंत पाटील यांना सांगू इच्छितो की, सांगलीच्या बाहेरही खूप मोठा महाराष्ट्र आहे. नक्षलवादाच्या बाबतीत काही ठोस भूमिका घेऊन आपली प्रशासनावरील पकड आणि व्यवस्थापन कौशल्य त्यांनी दाखवावे. आम्ही दूरचित्रवाहीनीच्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना ठिकठिकाणी भेटी देत असताना पहातो. ते गडचिरोलीमध्येही गेले होते. माझे त्यांना असे सांगणे आहे की, केन्द्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी लातूर-उस्मानाबाद येथील भूकंपानंतर जसा कार्यक्रम राबविला होता तशा प्रकारचा कार्यक्रम राबवून प्रशासनावरील त्यांची पकड दाखवून द्यावी आणि वळवाच्या पावसाप्रमाणे सतत घडणारे हे भीषण क्रौर्य थांबवावे एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपविते.

----

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, गडचिरोली जिल्ह्यामध्ये होणारे नक्षलवादी हल्ले आणि त्यामध्ये मारले जाणारे पोलिस कर्मचारी तसेच निरपराध माणसे या गंभीर विषयावर उपस्थित करण्यात आलेल्या अल्पकालीन चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी या चर्चेला चांगल्या प्रकारची वैचारिक पातळी दिलेली आहे. माननीय मंत्री महोदय, घटनास्थळी गेले होते. त्यांनी शहीद झालेल्या पोलिस कर्मचा-यांच्या कुटुंबियांना 25 लाख रुपये, कुटुंबातील व्यक्तीस नोकरी, दोन मुलांचे शिक्षण अशा रेमेडीज सांगितल्या. रोगशास्त्राचा एक नियम आहे. रोग होण्यापेक्षा तो होऊ न देणे असे वातावरण आपण तयार केले पाहिजे. परंतु सभापती महोदय, आपण या गोष्टीचा गांभीर्याने विचार केलेला नाही. एका चर्चेच्या वेळी श्री. पवारसाहेब बरोबर होते. मी त्यावेळी असे म्हणालो की, या देशातील नक्षलवाद आणि अतिरेकी या काँग्रेसने निर्माण केलेले आहेत. हे काँग्रेसचे पाप आहे. मी असे बोलल्यावर ते माझ्यावर रागावले. या सर्व गोष्टींचा काँग्रेसने सत्तेसाठी उपयोग करुन घेतला. काश्मिरचा प्रश्न योग्य वेळी सोडविला असता तर त्याची चिंता आता करायला लागली नसती. आपल्या देशातील साडेचारशे ते साडेपाचशे जिल्ह्यापैकी जवळ जवळ दोनशे ते सव्वादोनशे जिल्हे हे नक्षलवाद्यांनी व्यापले आहेत. याचे गांभीर्य ना केन्द्र सरकारला कळले ना राज्य सरकारला कळले. शहीद झालेल्या पोलिसांच्या कुटुंबियांना 25 लाख रुपये देऊ, नोकरी देऊ, मुलांना शिक्षण देऊ अशा केवळ आपण घोषणा करता. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी नक्षलवाद कसा आणि का निर्माण झाला हे चांगल्या त-हेने सांगितले. पंश्चिम बंगालमधील सिलीगुडी जिल्ह्यात 1967मध्ये नक्सल गावात एक जमीनदार एका गरीब शेतक-याची जमीन हडप करीत होता. त्यावेळी तो शेतकरी कोर्टात गेला. त्यामुळे त्या जमीनदाराने त्या शेतक-याची अत्यंत निर्दयपणे हत्त्या केली. त्याचे हायपाय तोडले. मग त्यामधून पुढे नक्षलवाद असा शब्द रुढ झाला. बाकीच्या सगळया गोष्टी इलेक्ट्रॉनिक्स मिडियाकडून दाखविल्या जातात. मात्र गडचिरोलीसारख्या ठिकाणी हे इलेक्ट्रॉनिक्स मिडियावाले जाणार नाहीत. जेथे पोलीस दंडुके घेऊन जातात तेथे हे मिडियावाले दंगली वाढविण्यासाठी जातात. मात्र गडचिरोली जिल्ह्यामध्ये जेथे नक्षलवाद्यानी पोलिसांना ठार केले

...3..



MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 17:20

(श्री. मधुकर चव्हाण...)

त्या ठिकाणी मिडियावाले गेले नाहीत. जेथे 34 पोलीस शहीद झाले अशा ठिकाणी तुमची तिस्ता सेटलवाड, दत्त जाणार नाही. चारु मुझुमदार याने नक्षल चळवळ निर्माण केली. कारण त्याने ते कौर्य पाहिले होते. आपल्यावर होणारा अन्याय दूर करण्यासाठी नक्षलवादी चळवळ उभी राहिली आणि मग तिचे रुपांतर हळुहळू अन्याय करण्यामध्ये झाले. 1991मध्ये दाते नावाचे ॲडिशनल पोलीस कमिशनर होते. त्यांनी नक्षलवाद्यांच्या विरोधात काय केले पाहिजे यासंबंधी अहवाल दिला होता. तो अहवाल शासनाने बासनात बांधून ठेवला.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MMP/ MAP/ प्रथम श्री.शिगम 17:25

श्री.मधुकर चव्हाण....

आपल्या सोयीप्रमाणे नंतर तो बाहेर काढणार. दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी मुंबईत अतिरेक्यांच्या हल्ला झाल्यानंतरही महाराष्ट्रात सर्वत्र चैतन्याचे वातावरण निर्माण केले. तुम्ही लक्षात घ्या. त्यावेळी काही मंडळींनी कौशल्याने काय केले ? तेथे मणबत्त्या लावल्या. त्यांना असे वाटले की, सरकार या घटनेमुळे धुऊन निघणार आणि म्हणून सगळे राजकारणी वाईट आहेत असे वातावरण 15 ते 20 दिवसांच्या कालावधीत निर्माण केले गेले. जणु काही दिनांक 26 नोव्हेंबर,08 रोजीचा हल्ला हा सगळया राजकारणी लोकांनी एकत्र येऊन केला असे एक वातावरण त्यावेळी निर्माण केले गेले आणि एक डिफ्यूज करण्याचा प्रयत्न केला. तसे या चळवळीचे होणार आहे. त्या ठिकाणी लोकांना किती निर्दयपणे मारले गेले. गडचिरोली येथील घटनेच्या अनुषंगाने "नवशक्त्ी" या वृत्तपत्रात यासंदर्भात एक वाक्य छापून आलेले आहे. त्या घटनेच्या ठिकाणी राज्य शासनाकडून हेलीकॉप्टर उपलब्ध करुन दिले गेले होते. परंतु फुकट बाजीरावकी करणा-या आणि फालतू कामासाठी राजकारणी लोक ते हेलीकॉप्टर फिरवित बसले असतील. कदाचित राजकारणी लोक त्यात बसलेही नसतील. अशा त-हेचे वाक्य लिहिण्याची एका वृत्तपत्राच्या संपादकाला इच्छा का झाली असावी ? त्यांना वाटले असेल की, आपण अशा घटनांच्या बाबतीत गांभीर्याने चर्चाच करीत नाही. या चर्चेच्या अनुषंगाने राज्य शासनाकडून उत्तर दिले जाणार आहे. शासनाच्या हेतूबद्दल शंका घेत नाही. या चर्चेच्या माध्यमातून अनेक सन्माननीय सदस्यांनी महत्वाचे मुद्दे उपस्थित केले आहेत, मी देखील काही मुद्दे उपस्थित केले आहेत, त्यासंबंधीची नोंद माननीय गृहमंत्री महोदय घेत असतील. तुम्ही उत्तर देणार आणि त्याच मार्गाने तुम्ही निघून जाणार. या चर्चेच्या अनुषंगाने सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. नितीन गडकरी आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जे महत्वाचे मुद्दे उपस्थित केले आहेत, त्याची मी पुनरावृत्ती करणार नाही. मी या चर्चेच्या निमित्ताने काही महत्वाचे मुद्दे मांडणार आहे. गडचिरोली, चंद्रपूर विभागात 12-12,13-13 नक्षलवाद्यांचे एक दलम पूर्वी असावयाचे. त्यावेळी पोलीस 12-12,13-13 असावयाचे. परंतु त्यांनी आता नवीन पध्दत सुरु केलेली आहे. आता 4-4,5-5 दलम एकत्र येतात त्यांची संख्या 100 एवढी असते आणि तुमचे पोलीस मात्र 12 एवढेच असतात. परवा असेच झाले की, त्या ठिकाणी 14-15 पोलिसांना 400 नक्षलवाद्यांनी घेरले आणि पोलिसांच्या शरीराची अक्षरशः छाळणी केली. तुम्ही मृत पोलिसांना सलामी देणार. शोकाकूल धूंद वाजविणार. मृत पोलिसांच्या कुटुंबियांचे सात्वन करणार.

2..

श्री.मधुकर चव्हाण....

त्यांच्या कुटुंबियांच्या घरी जाऊन त्यांच्या नातेवाईकाच्या बाजुला जाऊन बसणार. राजकारणी नाटक करणार. सभापती महोदय, मला आठवते की, कै.वसंतराव नाईक हे मुख्यमंत्री असताना सीमा प्रश्नासाठी चर्चेला बसले आणि चर्चेला बसल्यानंतर वसंतराव नाईक बाहेर आले आणि म्हणाले की, सेनापती तुम्ही जोपर्यंत तुम्ही उठत नाही, तोपर्यंत मी देखील उठू शकत नाही. ते उठून आत गेले. त्यांना चहा वगैरे दिला. सीमा प्रश्न तेथेच राहिला. "सामना" सिनेमामध्ये यासंबंधी आपले अतिशय चांगले वर्णन केलेले आहे. आपण मृत कुटुंबियांच्या घरी जाऊन त्यांच्या नातेवाईकाचे सात्वन करणार आणि विषय तेथेच संपविणार. मला असे वाटते की, काही गोष्टींची पूर्तता करणे अत्यंत गरजेचे आहे.सभापती महोदय, गृह खात्याकडे 30 आसन असलेले ज्याला आपण एमएम-7 हेलीकॉप्टर म्हणतो. त्या ठिकाणी 100 नक्षलवादी होते, पोलीस आणि नक्षलवादी यांची चकमक सुरु होती. त्यावेळी तेथे हेलीकॉप्टर मागविण्यात आले होते, परंतु गृह विभागाकडून पोलिसांच्या मदतीसाठी सदर हेलीकॉप्टर उपलब्ध करुन दिले गेले नाही. नक्षलवाद्यांच्या बिमोड करण्यासाठी 113 कोटी, 115 कोटी रुपयांची तरतूद शासनाने उपलब्ध करुन दिलेली आहे. अशा घटनांच्या प्रसंगी पोलीस दलाला मदत होईल म्हणून अशा प्रकारचे हेलीकॉप्टर खरेदी करण्यास काय हरकत आहे ? सभापती महोदय, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, ओरिसा, छत्तीसगड, महाराष्ट्र या राज्यातील मुख्यमंत्र्यांनी एकत्र येऊन नक्षलवादी चळवळीचा बिमोड करण्यासाठी चांगल्या प्रकारची योजना आखली पाहिजे. त्या नक्षलवाद्यांना केंद्र केले पाहिजे. सगळया जगाने नाही म्हटले तरी सुध्दा ज्यावेळेला एल.टी.टी.चा अतिरेक झाला. त्यावेळेला अतिशय निर्दयपणे तो माडीत काढला. अशा चळवळी जर तुम्ही वेळीच थांबविल्या नाहीत तर राज्याला नव्हे तर देशालाही त्यापासून धोका निर्माण होऊ शकतो. भिद्रनवाल्यांना सत्तारुढ पक्षानेच राजकारणासाठी चढवून ठेवले होते. त्यांनीच या देशाच्या एका स्त्री पंतप्रधाना निर्दयीपणे मारले. या स्त्री पंतप्रधानांना काही बाहेरच्या लोकांनी मारले नाही. त्यांना रक्षण करणा-यांनीच मारले. या घटनेमुळे जगात भारताची मान खाली गेली. या भिद्रनवाल्यांना सत्तारुढ पक्षानेच वाढविले आणि त्यांनीच घात केला. सभापती महोदय, एल.टी.टी.चे धोरण चुकले. त्याचा परिणाम काय झाला ? कै.राजीव गांधी सारखा कॉग्रेसचा उमदा नेता आणि देशाचा माजी पंतप्रधान आपण गमावून बसलो. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, माझ्या घरच्या लोकांचे पुण्य व परमेश्वराची कृपा म्हणून मी

3...



ABG/ SBT/ MMP/ MAP/ प्रथम श्री.शिगम 17:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

गडचिरोली जिल्हयातून सुखरुप परत आलो. मी या ठिकाणी आवर्जून सांगू इच्छितो की, एक दिवस हे नक्षलवादी शासनकर्त्यांच्या घरात घुसतील. शासनकर्त्यांना सळो की पळो करुन सोडतील. म्हणून त्या विभागात मोठया प्रमाणात उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, मानवाधिकार आयोग शासनाकडून नेमला गेला आहे, त्या आयोगाला प्रथम समुद्रात नेऊन बुडविला पाहिजे. पोलीस कोणतीही कारवाई करण्यासाठी गेले की, त्यांना मानवाधिकार आयोग आडवा येतो.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सन्माननीय सदस्यांनी हरकतीचे मुद्दे नंतर काढावेत. मी माझे मत या ठिकाणी व्यक्त करीत आहे. यासंदर्भात सन्माननीय सदस्यांचे जे काही मत असेल ते त्यांनी त्यांच्या भाषणात व्यक्त करावे.

श्री. कपिल पाटील : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांना आपले मत मांडण्याचा पूर्णपणे अधिकार आहे. ते भाषणाच्या अनुषंगाने आपले मत मांडू शकतात. पण मानवाधिकार आयोगाची निर्मिती घटनात्मक आहे. अशा घटनात्मक आयोगाला समुद्रात बुडवावे असे गंभीर विधान सन्माननीय सदस्यांना करता येत नाही.

श्री. मधुकर चव्हाण : मानवाधिकार आयोगाची बाजू घेणा-यांना देखील समुद्रात बुडवा.

यानंतर श्री. भोगले...

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : हे सभागृह मानवाधिकाराच्या रक्षणासाठी निर्माण झाले आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी त्यांच्या भावनेशी सहमत आहे. परंतु भारतीय घटनेने प्रत्येकाला बोलण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. त्यामुळे एखाद्या सरकारला बुडवा, आयोगाला बुडवा असे म्हणणे असंसदीय नाही. असे बोलण्याचा सन्माननीय सदस्यांना अधिकार आहे. तुमच्या नियमाप्रमाणे मानवाधिकार आयोग समुद्रात बुडवा हे बोलण्याचा त्यांना अधिकार आहे. ते कोणाला पटेल किंवा पटणार नाही. पोलीस अधिकाऱ्यांच्या हातात त्यांनी हातकड्या घातल्या. ज्यांच्यावर आरोप होते ते सुटले.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, नक्षलवाद्यांचा बिमोड केला पाहिजे याबद्दल दुमत नाही. नक्षलवाद्याच्या नावाखाली विनायक सेन यांना वर्षानुवर्षे यांनी जेलमध्ये ठेवले. सुप्रीम कोर्टाने त्यांना बाहेर काढले. शोषणकर्ते संपले नाही तर शोषकवर्ग या मार्गाने जातात. लोकशाही टिकवायची असेल तर किमान मानवी बूज राखली पाहिजे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, यांचे सोशॅलिझम जगाने समुद्रात बुडविले आहे. पोलिसांनी आपल्या वरिष्ठांना रिपोर्ट पाठविला. पोलीस खात्यात मानवाधिकाराचा हस्तक्षेप वाढत आहे. त्यामुळे या भागात काम करण्यास भीती वाटते. कोणतीही कारवाई केली तर पोलिसांच्या अंगलट येते. त्यामुळे पोलिसांचे मनोधैर्य खचते. त्यामुळे नक्षलग्रस्त परिसरामध्ये त्यांचा हस्तक्षेप दूर करावा असे एका पोलीस अधिकाऱ्याने त्यांचे मत सरकारला कळविले. जो माणूस आहे त्याला मानवाधिकार द्या. परंतु जे राक्षस आहेत त्यांना कसला मानवाधिकार? एक उदाहरण देतो. सद्दाम हुसेनला मारण्याचा अमेरिकेला कोणताही अधिकार नाही. परंतु तो आपल्या उरावर बसेल, सगळे आपल्यावर येईल म्हणून कायदा इराकचा असताना, भूमी इराकची असताना अमेरिका सद्दामला फाशी द्यायला निघाले. मानवाधिकार हा माणसांसाठी आहे, राक्षसांसाठी नाही.

सभापती महोदय, जसे एखाद्या बलात्काराची केस चालविणाऱ्या वकिलाबद्दल लेख आला होता, काही प्रश्न विचारु नयेत, त्यांनी ताडकन प्रश्न विचारला. 1947 मध्ये सगळे निर्वासित दिल्लीमध्ये आले. निर्वासिताच्या छावणीमध्ये हाहाकार माजला होता. त्यावेळी फार मोठे काँग्रेसचे नेते समोरच्या माणसांना शांत रहा म्हणून सांगत होते. काँग्रेसच्या नेत्यांच्या बाजूला त्यांची मुलगी होती. समोर आपली पत्नी आणि तिच्यावर बलात्कार झाला, प्रॉपर्टी लुटली गेली अशा माणसाने

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MAP/ MMP/ 17:30

श्री.मधुकर चव्हाण......

त्या स्टेजवर जाऊन त्या मुलीचा हात धरला. त्या काँग्रेस नेत्याने थाडकन त्याच्या थोबाडीत मारली. लाहोरला माझ्या पत्नीला समोर बलात्कार करुन मारले. आपल्यावर वेळ आली की मग महत्व कळते. कम्युनिझमला शोभून दिसते. व्यवहारवादी व्हा. सभापती महोदय, मी याठिकाणी सूचना वाचून दाखवितो. राज्यात असा कायदा आहे की, नक्षलग्रस्त क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांनी दोन वर्षे तेथे सेवा केल्यानंतर त्यांनी मागितलेल्या इच्छूक ठिकाणी पोस्टींग केली जाईल. गडचिरोलीबाबत तसे होत नाही म्हणून अधिकारी व कर्मचारी यांच्या मनात औदासिन्य निर्माण झाले आहे. एस.आर.पी.एफ.च्या 10 कंपन्या गडचिरोली येथे तयार कराव्यात आणि नक्षलग्रस्त क्षेत्रसासाठी महासंचालकाचे कार्यालय नागपूर येथे असावे. ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी केला. जेथे माणसाची भूक निर्माण होते तेथे भय निर्माण होते. वृत्तपत्रात वर्णन आले आहे. नक्षलग्रस्त क्षेत्रामध्ये गर्भारपणात नवव्या महिन्यापर्यंत महिला रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करतात. बाळंतपण झाल्यानंतर दोन दिवस पण ती महिला घरी रहात नाही. चार बायका सभोवताली एकत्र जमून त्या महिलेचे बाळंतपण केले जाते.

2यु.1.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ......

आणि पुन्हा दीड वीत पोटाची खळगी भरण्यासाठी ती कामाला जाते. अशा प्रकारे जोपर्यंत विकासाचे पॅकेज या नक्षलग्रस्त भागात शासन देत नाही तोपर्यंत या परिस्थितीत सुधारणा होणार नाही. माझी अशी सूचना आहे की, या कामासाठी स्वतंत्र मंत्री देऊन त्यांना त्या भागातील पाच सहा नक्षलग्रस्त जिल्ह्यांसाठी काम करायला सांगावे. त्यांनी त्या भागात विकासाच्या योजना, रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य इत्यादि प्रश्नांबाबत जी तरतूद केली आहे त्याचा पुरेपूर वापर करावा. मी हे केवळ भावनाविवश होऊन बोलत नाही तर या भागासाठी खरोखरच शासनाने अशा प्रकारे प्रयत्न करणे गरजेचे आहे. मानवाधिकार आयोगाची स्थापना झाल्यापासून खरे तर ज्यांच्यावर अन्याय होत आहे अथवा झालेला आहे त्यांचे कधी त्या आयोगाने ऐकले नाही आणि जो अन्याय करणारा आहे तोच मात्र मानवाधिकार आयोगाकडे जातो. मग आयोग त्याला वकील पुरवा म्हणून सांगतो. एक उदाहरण देतो की कसाबला सरकारी वकील दिला पाहिजे. ठीक आहे, कायद्याची प्रक्रिया पूर्ण केली पाहिजे पण ती ऑन पेपर करा. परवा मात्र त्या वकिलाने तर जम्मू-काश्मीर हा भारताचा भाग नाही असे आर्ग्युमेंट केले. ठीक आहे कायद्याची प्रक्रिया आपल्याला पूर्ण केली पाहिजे पण अशा वेळेस मानवाधिकार आयोग काय करतो हेच मला समजत नाही. आणखी एक उदाहरण सांगू इच्छितो आणि सर्वात जास्त धोकादायक मुद्दा असा आहे की, या नक्षलवादी चळवळीमध्ये माओवादी घुसलेले आहेत. सभागृहातील वातावरण पाहिले तर नक्षलाईट चळवळीसारख्या गंभीर विषयावर चर्चा सुरु असताना अगदी हसत-खेळत चर्चा झाली असा संदेश जाता कामा नये. उलट जनतेच्या सुख-दु:खाचे प्रतिबिंब म्हणजे आपण लोकप्रतिनिधी. या लोकप्रतिनिधींच्या मुखातून जनता बोलत असते आणि आपण काय या नक्षलवाद्यांची बाजू घेणार आहात ? यावरुन आपण तिष्टा सेटलवाडचे वकील दिसून येतात असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. नेपाळच्या राजाची कत्तल झाली त्याचे सर्व रिपोर्ट्स आता बाहेर येऊ लागले आहेत. त्यावरुन माओवाद्यांनी नेपाळचे कांड ठरवून आणले असे दिसते. अशा प्रकारे माओवादी घुसलेले जे नक्षलग्रस्त जिल्हे आहेत ते जवळपास 250 जिल्हे आहेत. आज गुजरातमध्ये नक्षलवाद नाही, राजस्थानमध्ये नक्षलवाद नाही, महाराष्ट्राच्या समुद्रकिनारी पट्टयात नक्षलवाद नाही, गोव्यामध्ये नाही, तामिळनाडूमध्ये नक्षलवादी नाहीत, तर केवळ जंगली पट्टा ज्या ज्या प्रदेशात आहे,

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MMP/ SBT/

श्री. मधुकर चव्हाण.....

जेथे विकास नाही, दारिद्रय आहे अशाच ठिकाणी नक्षलवादी आहेत. म्हणून सभागृहात जी चर्चा सुरु आहे त्या माध्यमातून सरकारकडून उत्तरही दिले जाईल, प्रसार माध्यमातून या चर्चेची माहिती बाहेररही जाईल परंतु या माध्यमातून नक्षलवादी चळवळीचा बिमोड करण्याच्या दृष्टीने निश्चित काही तरी धोरण ठरविले तरच आजच्या चर्चेचा फायदा होईल. आताच सभागृहात सांगण्यात आले की, नक्षलग्रस्त भागातील लोकांची क्रूर चेष्टा आहे. मला अभिमान वाटतो की, जसे मुंबईत काही लोकांनी बोर्ड लावले की, "मला मुंबईचा अभिमान वाटतो," "मुंबई किती सहनशील आहे," "कोणीही यावे आणि टिचकी मारुन जावे." अशा प्रकारे नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात जे शहीद झाले त्यांच्या पराक्रमाचा मला अभिमान आहे. कारण नक्षलवाद्यांकडे अत्याधुनिक शस्त्रे आणि या पोलिसांकडे काहीच नाही त्यामुळे नक्षलवाद्यांना ते मारु शकले नाहीत, त्यांची शस्त्रास्त्रे पळवून नेली. मुळात नक्षलवाद्यांकडे शस्त्रे कोठून येतात, काय त्यांची गुप्तचर यंत्रणा आहे याची चौकशी आपण करीत नाही काय ? म्हणून शासनाची इच्छाशक्ती असेल तर राज्यातील नक्षलवाद उखडून फेकून दिल्याशिवाय राहणार नाही, अन्यथा हा रक्तपात थांबणार नाही. शेवटी असे सांगू इच्छितो की, तालिबान, लष्कर-ए-तोयबासारख्यांना ज्या पाकिस्तानने डोक्यावर चढविले तेच आता पाकिस्तानवर बूमरँगसारखे उलटले आहेत. मागील वेळेस आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री श्री. चंद्रशेखर रेड्डी यांनी सगळ्या नक्षलवाद्यांबरोबर हातमिळवणी केली, त्यांचे अनेक लोक सोडविले अशा प्रकारे त्यांना अभय दिले जाते. म्हणून या सभागृहातील चर्चेतून चांगले नवनीत कोणते काढावयाचे असेल, यातून बोध घेऊन उपाययोजना केली तरच सर्व नक्षलग्रस्त भागातील लोकांना दिलासा मिळेल आणि नक्षलवाद्यांच्या मनात एक प्रकारची भीती निर्माण होईल की शासन आता नक्षलवादी चळवळीचा बिमोड करण्यासाठी उपाययोजना करीत आहे आणि आपण जर आपल्या कारवायांना पायबंद घातला नाही तर मृत्युशिवाय काही मिळणार नाही, अशी धास्ती त्यांना वाटेल. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

धन्यवाद.

--------

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>औचित्याच्या मुद्यासंबंधी</u>**

श्री. कपिल पाटील : आदरणीय सभापती महोदय, एका अत्यंत महत्वाच्या तसेच गंभीर आणि तातडीच्या प्रश्नाच्या संदर्भात, औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी मी उभा आहे. या राज्याचे थोर समाजवेक, भ्रष्टाचाराच्या विरुध्द सातत्याने लढणारे, संपूर्ण देशात माहितीच्या अधिकाराचा कायदा लागू करण्याची मागणी करणारे श्री.अण्णा हजारे याची हत्या करण्याची सुपारी काही मंडळीनी दिली होती अशी माहिती उघडकीस आलेली आहे. कै.पवन राजे निंबाळकर याची ज्यांनी हत्या केली त्यांनीच माननीय अण्णा हजारे यांना मारण्याची सुपारी घेतली होती अशी धक्कादायक बाब निदर्शनास आलेली आहे. माननीय गृहमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत त्यामुळे ही सुपारी कोणी दिली होती याची माहिती या सभागृहाला मिळण्याची आवश्यकता आहे. माझी माननीय गृहमंत्र्यांना विनंती आहे की, ज्यांनी माननीय अण्णा हजारे यांची सुपारी घेतली होती व दिली होती त्या मंडळीवर कडक कारवाई झाली पाहिजे तसेच माननीय अण्णा हजारे यांना तातडीने संरक्षण देणे आवश्यक आहे त्यामुळे यासंदर्भात सभागृहाला सविस्तर माहिती मिळण्याची आवश्यकता आहे एवढंच मला या औचित्याच्या मुद्याद्वारे सांगावयाचे आहे.

श्री. जयंत पाटील : माननीय अण्णा हजारे यांच्या संदर्भात उद्या सभागृहात निवेदन करण्यात येईल तसेच माननीय अण्णा हजारे यांना संरक्षण देण्याची व्यवस्था देखील करण्यात येईल.

---------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: गडचिरोली जिल्हयातील धानोरा येथे नक्षलवाद्यांबरोबर झालेल्या भीषण चकमकीत 2 पोलीस अधिकाऱ्यांसह 16 पोलीस जवांनाचा झालेला मृत्यू

**मु.शी.**: गडचिरोली जिल्हयातील धानोरा येथे नक्षलवाद्यांबरोबर झालेल्या भीषण चकमकीत 2 पोलीस अधिकाऱ्यांसह 16 पोलीस जवांनाचा झालेला मृत्यू यासंबंधी श्री.दिवाकर रावते, डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

(चर्चा पुढे सुरु....

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, एक अत्यंत महत्वाच्या विषयावर राजकारणरहित चर्चा या सभागृहात होत आहे. 21 मे, 2009 रोजी गडचिरोली जिल्हयात 16 पोलीस जवान, अधिकारी व कर्मचा-यांची हत्या झाली. या ठिकाणी माननीय श्री. गडकरी साहेबांनी सांगितल्या प्रमाणे बंदुकीच्या गोळीने हा प्रश्न सुटणार नाही. कारण नक्षलवाद हा शेवटी एक वाद आहे. जसा साम्यवाद, समाजवाद, गांधीवाद, माओवाद त्याच पद्धतीने नक्षलवाद हा एक वाद आहे. या नक्षलवादाच्या पाठीमागे एक विचार आहे. हिंसेच्या माध्यमातून क्रांती करुन गरिबी नष्ट होण्याच्या संदर्भातील हा विचार आहे. नक्षलवाद हा लोकशाही विरोधी विचार आहे. ज्या घटनेच्या संदर्भात या ठिकाणी चर्चा सुरु आहे त्यासंदर्भात गृहखाते किंवा माननीय गृहमंत्री यांच्याकडून हा प्रश्न सुटणार नाही. फार व्यापक आणि विशाल दृष्टिकोन यामध्ये आहे, त्याची व्याप्ती फार मोठी आहे हे लक्षात घेऊन पुढच्या काळात आपल्याला पुढे जावयाचे आहे त्यामुळे वैचारिक लढा म्हणून आपण नक्षलवादी चळवळीकडे पाहिले पाहिजे. या ठिकाणी सांगण्यात आले आहे की, गरिबीतूनच नक्षलवाद तयार होतो. ज्या ज्या प्रांतामध्ये किंवा प्रांतांच्या विशिष्ट भागामध्ये गरिबी होत असते नक्षलवाद मोठया प्रमाणात फोफावला जातो त्यामुळे यासंदर्भात आपल्याला दुहेरी उपाययोजना करावी लागेल. गृहखात्याच्या माध्यमातून उपाययोजना तयार करुन विकास योजना राबवली तर नक्षलवादी चळवळीचा आपण बिमोड करु शकू.

यानंतर श्री. गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी ...

अन्यथा या देशातून नक्षलवाद जाणार नाही. माझ्या माहिती प्रमाणे माननीय श्री. आर. आर. पाटील गृह मंत्री असतांना नक्षलवादी चळवळीचा बिमोड करण्यासाठी 500 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. मी माननीय गृह मंत्र्यांना विचारु इच्छितो की , त्या पॅकेजचे काय झाले आहे?. जर अशा प्रकारचे पॅकेज जाहीर झाले नसेल तर अधिवेशन संपण्याच्या आत हे पॅकेज जाहीर केले पाहिजे. त्याचप्रमाणे या प्रश्नाशी केवळ एका खात्याचा संबंध नाही. या प्रश्नाशी प्रामुख्याने वित्त विभागाचा सबंध आहे तसेच उद्योग, शिक्षण, पाटबंधारे, आरोग्य, गृह इत्यादी खात्याचा सबंध देखील आहे. मी पुन्हा सांगू इच्छितो की 500 कोटी रुपये पॅकेज देण्याच्या संदर्भात जर शासनाचा निर्णय झाला असेल तर त्याप्रमाणे अंमजलबजावणी केली गेली पाहिजे आणि जर निर्णय झाला नसेल तर पॅकेज देण्यासंबंधी निर्णय घेण्यात आला पाहिजे. तो निर्णय सभागृहासमोर ठेवण्यात आला पाहिजे आणि पॅकेजच्या संदर्भात सभागृहात चर्चा झाली पाहिजे. इतकेच नव्हे तर त्या पॅकेज संबंधीची अंमबजावणी कशा पध्दतीने होईल याचासुध्दा विचार करण्यात आला पाहिजे. असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, नक्षलवाद्यांनी पोलिसांना घाबरले पाहिजे परंतु आज उलट परिस्थिती दिसून येत आहे. आज पोलीसच नक्षलवाद्यांना घाबरावयास लागले आहेत. ही मनोवृत्ती अत्यंत घातक आहे. या पूर्वी 15-20 नक्षलवादी हल्ला करीत होते परंतु आता 250 ते 300 नक्षलवादी हल्ला करण्यासाठी रस्त्यावर येत आहेत. या चर्चेच्या निमित्ताने मी हे सांगू इच्छितो की, परवाच्या घटनेमध्ये 250 ते 300 नक्षलवाद्यांनी हल्ला केला होता . तेव्हा त्याचे गांभीर्य किती मोठे आहे हे शासनाने लक्षात घेतले पाहिजे. या चर्चेत भाग घेत असतांना मी मघाशी असे सांगितले होते की, यावर दुहेरी पध्दतीने उपाययोजना केली पाहिजे. त्या भागाचा विकास करण्याच्या बाबतीत सुध्दा विचार झाला पाहिजे. त्या भागातील आदिवासी तरुणांना नोक-या देत असतांना त्या व्यक्तीचे वय किती आहे तसेच त्याचे शिक्षण किती आहे या बाबी बाजूला ठेवून स्थानिक आदिवासी तरुणांना नोक-या कशा पध्दतीने देता येतील याचा विचार शासनाने केला पाहिजे. त्या भागातील जे नागरिक आणि ग्रामस्थ आहेत त्यांच्या संदर्भात सांगावयाचे म्हणजे त्यांच्या संदर्भात देखील दोन वर्ग आहेत. एक वर्ग असा आहे की, तो नक्षलवाद्यांना सहकार्य करतो आणि दुसरा वर्ग असा आहे की ,

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी ...

तो नक्षलवाद्यांना धाबरतो. तेव्हा या लोकांमधील भीती कशा प्रकारे नाहीशी करता येईल याचासुध्दा विचार केला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी या ठिकाणी एक आठवण सांगितली आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, दोन वर्षापूर्वी सालेकसा येथे आम्ही प्रचार सभेसाठी गेलो होतो. सान्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे त्यावेळी पक्षाच्या महिला अध्यक्षा होत्या . दुपारी 3.00 वाजता त्यांचे भाषण सुरु झाले होते. त्या कार्यक्रमासाठी आम्हाला जावयाचे होते परंतु त्या वेळी पोलिसांनी आम्हाला अडवले आणि असे सांगितले की, "गुजराथी साहेब तुम्हाला पुढे जाता येणार नाही. " तेव्हा मी पोलिसांना त्याचे कारण विचारले होते. पोलिसांनी असे सांगितले की, " सालेकसा येथे हा कार्यक्रम सुरु असून तेथून एक किलोमिटर अंतरावर आंध्र प्रदेश राज्याची सीमा आहे व त्या ठिकाणी नक्षलवाद्यांनी खून केलेले आहेत . आपल्या संरक्षणाची जबाबदारी आमच्यावर असल्यामळे आम्ही आपल्याला तेथे जाऊ देणार नाही." त्या भागात नक्षंलवाद्यांनी खून केलेले असल्यामुळे नेत्यांना, प्रचार करणा-यांना, कार्यकर्त्यांना त्या ठिकाणी जाऊ देणार नाही असे पोलिसांनी सांगितले होते.

एक सन्माननीय सदस्य : त्या ठिकाणी छत्तीस गड राज्याची बॉर्डर आहे.

श्री.अरुण गुजराथी : माझ्या महिती प्रमाणे ती आंध्र प्रदेशची बॉर्डर आहे. माझी जर चूक होत नसेल तर ती आंध्र प्रदेशची बॉर्डर आहे. असो. श्री. नरेश माहेश्वरी हे जिल्हा अध्यक्ष होते आणि त्यांनी पोलिसांना असे सांगितले की, " या नेत्यांच्या संरक्षणाची जबाबदारी मी घेतो. काही घटना घडली तर ती जबाबदारी माझी राहील आपली जबाबदारी राहणार नाही त्यामुळे आता आम्हाला त्या ठिकाणी जाण्यास परवानगी द्यावी. " त्या ठिकाणी लहानशी घटना घडल्यानंतर पोलीस अशा प्रकारे वागत असल्याचे दिसून आले. कदाचित पोलिसांकडे पुरेशी शस्त्रास्त्रे नसतील म्हणून ते अशा प्रकारे वागले असतील. आपण अडचणीत येऊ नये म्हणूंन ते अशा पध्दतीने वागले असावेत असे मला वाटते. मघाशी असे सांगण्यात आले की, चीन मधून आपल्याकडे शस्त्रास्त्रे येतात, 303 गन्स आणि स्फोटके येत असतात. या ठिकाणी मला असे सांगावयाचे आहे कीश आपल्या पोलीस खात्याचे आधुनिकीकरण करणे देखील खूप महत्वाचे आहे. मी माननीय गृह

3..



VTG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 17.45

श्री.अरुण गुजराथी ...

मंत्र्यांच्या एक बाब निदर्शनास आणून देतो . माननीय वित्त मंत्र्यांच्या माध्यमातून काही पॅकेज दिले जात असेल तर ते येऊ द्यावे परंतु गृह खात्याच्या माध्यमातून सुध्दा त्या भागात काम करणा-या पोलिसांसाठी एक वेगळे पॅकेज आपणसुध्दा तयार केले पहिजे.

नंतर श्री.सुंबरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुजराथी ....

आपण त्यांच्यासाठी प्रोत्साहन भत्ते देता. परंतु नागपूरचे अधिकारी किंवा जिल्ह्याचे अधिकारी असतात त्यांना हा भत्ता दिला जातो, मिळतो मात्र प्रत्यक्षात त्या भागामध्ये जे आपले कर्मचारी अधिकारी काम करतात त्यांना मात्र हा भत्ता मिळत नाही, ही वस्तुस्थिती देखील आपण लक्षात घेतली पाहिजे. सभापती महोदय, मी या निमित्ताने माननीय गृहमंत्र्यांना सांगेन की, छत्तीसगड सरकारने तेथे एक चांगली सोय केली आहे म्हणजे तेथे त्यांनी हेलिकॉप्टरची योजना केली आहे. प्रसंगी 5-10 मिनिटांमध्ये तेथे पोहोचता येते. तसेच आंध्र शासनाने देखील प्रशिक्षणाच्या बाबतीत आघाडी घेतलेली आहे. हे प्रशिक्षण आपल्या पोलीस कर्मचाऱ्यांनाही देण्याचा विचार गृहखात्याने केला पाहिजे अशी माझी या निमित्ताने मागणी आहे. सभापती महोदय, मी आपल्याला निश्चितपणे सांगेन की, या नक्षलवाद्यांचा बिमोड केला नाही तर आज पाकिस्तानामध्ये जी परिस्थिती निर्माण झाली आहे ती परिस्थिती भारतात निर्माण होऊ शकते. म्हणूनच याचा इतक्या गांभीर्याने आपण विचार केला पाहिजे. सभापती महोदय, आजचे आपले गृहमंत्री यापूर्वी वित्तमंत्री होते. त्यांना मी सांगू इच्छितो की, त्या संपूर्ण भागामध्ये रोजगार निर्माण करण्याच्या बाबतीत आपण उद्योजकांना, उद्योगपतींना प्रोत्साहन दिले तर त्याचाही फायदा आपल्याला या संदर्भात निश्चितपणे मिळाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून एक सर्वंकष असे पॅकेज निर्माण करून पुढील भविष्यामध्ये या नक्षलवादाची पाळेमुळे उखडून काढण्याबद्दल शासनाने जरूर विचार करावा असे सांगून मी माझे चार शब्द संपवितो. धन्यवाद.

***

..... एक्सएक्स 2 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय सदस्य आणि आमच्या पक्षाचे गटनेते श्री.दिवाकर सावंत यांनी या ठिकाणी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, माझ्या अगोदरच्या वक्त्यांनी, जवळपास सगळ्यांनीच सांगितले आहे की, नक्षलवाद, माओवाद कसा वाढतो आहे आणि त्याला कसे रेडकार्पेट मिळत गेले आहे किंवा तिरूपतीपर्यंत तो कसा वाढत गेला हे सारे सांगितले. पण सभापती महोदय, आपण एक अभ्यास म्हणून जरी याकडे पाहिले आणि हा नक्षलवाद कसा फोफावला गेला हे पाहिले तर आपल्याला समजून येईल की, 1980 पासून आजपर्यंत या नक्षलवाद्यांनी 400 पोलिसांच्या हत्या केलेल्या आहेत. सरकारी कर्मचारी काही हजारामध्ये मारले गेले आहेत. एकंदरीत 25 वर्षात 30 पोलीस पाटील, 10 सरपंच, 10 कोतवाल, स्थानिक नेते, आदिवासी आणि स्थानिक रहिवासी यांना या नक्षलवाद्यांनी मारून टाकले आहे. नक्षलवादाचा जन्मच मुळी प्रस्थापितांच्या विरोधातील संघर्षातून झालेला आहे. त्यातूनच याला एक रक्तरंजित स्वरूपव मिळाले आहे. सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी सांगितले की, आदिवासी कसा राहतो आणि त्याला तेथे काय मिळते. त्याची मुलेबाळे कशी राहतात याच्याकडे कोणीच लक्ष दिले नाही, सरकारने तर नाहीच नाही. सभापती महोदय, कुपोषणाच्या प्रश्नावर काम करीताना मी गडचिरोलीला मेंदूज्वराच्या संदर्भात आलो होतो त्यावेळी या सर्व भागामध्ये अगदी आतपर्यंत जाण्याची पाळी मला आली त्यावेळी मी तीन-चार वेळा तेथे गेलो होतो. तेव्हा या आदिवासींचे आयुष्य अगदी जवळून पाहण्याचा योग मला आला. त्या आदिवासींना कोणाचेच देणेघेणे नाही. अंगावर कपडा मिळाला तर मिळाला, नाही मिळाला तरीही काहीही त्याला वाटत नाही. मात्र संध्याकाळी दारू पाहिजे हे त्यांचे प्राईम जीवन आहे. त्यांनी केव्हाही कोणाकडूनही कशाचीही अपेक्षा केली नाही की, मला अमुकच पाहिजे, मला अमकीच गोष्ट पाहिजे अशी त्यांनी कधीच अपेक्षा केली नाही म्हणूनच कदाचित राज्यकर्त्यांनी देखील त्यांच्याकडे ढुंकूनही पाहिले नाही. मात्र निवडणुका आल्याकी त्यांच्या कोठल्याही तरी गावांमधून निवडणुकीवर बहिष्कार टाकला गेल्याच्या बातम्या येतात. आजही त्या ठिकाणी 42 खेड्यांमध्ये वीज नाही ही गोष्ट माननीय मंत्री महोदयांनी लक्षात घ्यावी. आपण महाराष्ट्रात राहतो आहोत पण आज देखील तेथील 42 खेड्यांमध्ये वीज नाही. याचे कारण काय ? याला मुख्यत्वे कोण जबाबदार असेल तर माझ्या मते

..... एक्सएक्स 3 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

वन खाते जबाबदार आहे. वन खाते त्यासाठी परवानगी देत नाही तर मग तेथे विजेचे खांब कसे काय टाकणार ? परिणामी त्यासाठी बजेट मंजूर असूनही हे काम होत नाही. म्हणजे आपण निर्माण केलेल्या चक्रव्यूहामध्ये आपणच कसे गुरफटून जातो याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.

सभापती महोदय, हा आदिवासी पूर्वी देखील जगत होता. .....

( यानंतर श्री.सरफरे ...वायवाय 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

पूर्वी आदिवासी माणूस निर्धास्तपणे जगत होता. आज त्या आदिवासीने एखादी रानटी कोंबडी मारली तर त्याच्यावर पोलिसांचा दट्टया बसतो, तो घाबरतो व जंगलात पळून जातो. आज जर त्याने मोहाच्या झाडावरील फुले तोडली, पाने तोडली, तेंदू पत्ते तोडले तर त्याला तात्काळ अटक केली जाते. ही जी पोलिसांची सायकल तयार झाली आहे, त्यामधून नक्षलवाद तयार झाला आहे. तो तयार करण्यास आपणच जबाबदार आहोत, आपले अधिकारी जबाबदार आहेत. त्याठिकाणी ज्या अधिकाऱ्यांची बदली केली जाते त्यांना ते पनिशमेंट पोस्टींग वाटते. त्यामध्ये पोलीस असतील, वैद्यकीय अधिकारी असतील, तहसिलदार असतील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी असतील. या सर्व अधिकाऱ्यांना आपल्याला पनिशमेंट पोस्टींग दिली आहे असे वाटते. त्यामुळे ते आपला राग या आदिवासी लोकांवर काढीत असतात. ही चळवळ पसरण्यामागील खरी मेख आहे. या आदिवासी लोकांबरोबर कुणीही सुसंवाद करीत नाही, त्या माणसांचे दुःख कुणालाही माहीत नाही. त्या भागामध्ये बदली झालेल्या अधिकाऱ्याला आपल्या बायको-मुलांपासून लांब अंतरावर टाकल्यामुळे आपल्या हाताखाली काम करणारा माणूस कसा चिरडून जाईल अशाप्रकारे तो आपला संताप त्याठिकाणी व्यक्त करीत असतो. हे या उद्रेकामागील खरे कारण आहे. यामागे भौगोलिक परिस्थिती, आर्थिक परिस्थितीबरोबर समाज व्यवस्था सुध्दा कारणीभूत आहे. त्यामुळे हा नक्षलवाद फोफावला आहे. ज्यावेळी मेंदूज्वराची साथ पसरली होती त्यावेळी मी माननीय श्री. विजय वडेट्टीवार यांच्याबरोबर त्या भागात गेलो होतो. तेव्हा दोन दिवसापूर्वी त्या भागामध्ये हत्त्या झाली होती. त्यावेळी पोलिसांनी आम्हाला सांगितले की, आपण त्या गावामध्ये जाऊ नका. तरी सुध्दा आम्ही त्या गावामध्ये गेलो तेव्हा आम्हाला कोणत्याही नक्षलवाद्यांनी हात लावला नाही. या उलट त्यांनी आम्हाला रस्ता दाखविण्यासाठी मदत केली. अशाप्रकारे त्या ठिकाणी नक्षलवाद फोफावला आहे. जर ते लोकांना मारतात तर मग त्याठिकाणी डॉक्टर कां जातात, एन.जी.ओ. कां जातात? पोलीस त्याठिकाणी जावून काम कां करीत नाहीत? याचा आपण विचार केला पाहिजे. याचे कारण त्यांच्याशी आपला सुसंवाद नाही. सुसंवादापासून ते लोक वंचित आहेत. तुम्ही हे काम कशासाठी करीत आहात? असे कुणीही त्यांना विचारीत नाही. आज आपण याठिकाणी आकडेवारी पाहिली तर ते त्यांनी ज्या ज्या लोकांना मारुन टाकले आहे त्याचे मी याठिकाणी समर्थन करणार नाही. त्यांनी पोलिसांना मारल्याबद्दल त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांना शासन झाले पाहिजे. हे करीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

डॉ. दीपक सावंत...

असतांना आपण त्यांच्यावर आणखी अन्याय करु नका हे मला आपल्याला सांगावयाचे आहे. नक्षलवादाचा बिमोड करण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी 1300 कोटी रुपये दिल्याचे अनेकदा सांगितले. मागील अर्थसंकल्पाच्या पुरवणी मागण्यांमध्ये नक्षलवाद्यांचा बिमोड करण्यासाठी विशेष शिर्षकाव्दारे ही तरतूद करण्यात आली होती. ही तरतूद करुन त्याव्दारे नक्षलवाद्यांचा बिमोड करण्यासाठी पोलिसांना अत्याधुनिक शस्त्रे खरेदी करण्यासाठी हे पैसे कां खर्च केले जात नाहीत? गेल्या वर्षभरामध्ये नक्षलवाद्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी किती रुपयांची शस्त्रे खरेदी करण्यात आली ? याचा लेखाजोखा मंत्रिमहोदयांनी दिला पाहिजे.सभापती महोदय, संवेदनशील जिल्हयामध्ये काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना 15 टक्के प्रोत्साहन भत्ता दिला जात नाही. यामध्ये जे पोलीस असतील, वैद्यकीय अधिकारी असतील किंवा अंगणवाडी सेविका असतील त्यांना प्रोत्साहन भत्ता देण्याच्या बाबतीत वरपासून खालपर्यंत भ्रष्टाचार पसरला आहे. हा प्रोत्साहन भत्ता आपण त्यांना देणार की नाही?

**तालिका सभापती ( श्री.हेमंत टकले)** : या अडीच तासाच्या चर्चेची वेळ 6 वाजता संपलेली आहे. अजून तीन-चार माननीय सदस्यांची भाषणे व्हावयाची असल्यामुळे भाषणासाठी देण्यात आलेली वेळ 10 मिनिटे वाढविण्यात येत आहे. त्यानंतर मंत्रिमहोदयांचे उत्तराचे भाषण सुरु होईल.

**(यानंतर सौ. रणदिवे)**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

सभापती महोदय, आपल्या विनंतीला मान देऊन मी माझे भाषण लवकर पूर्ण करतो. आम्हाला याचे उत्तर पाहिजे की, आज जो प्रोत्साहन भत्ता दिला जातो, तो कोणकोणत्या गावातील अधिकाऱ्यांना दिलेला आहे ? मला हे माहिती आहे, माननीय मंत्री महोदय उत्तराच्या भाषणामध्ये सांगतील की, आता माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही, मी ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवेन. पण मी तेथे सतत जात-येत असतो. त्यामुळे माझी माहिती अशी आहे की, तेथील अधिकाऱ्यांना गेली कित्येक वर्षे हा भत्ता पूर्णपणे देण्यात आलेला नाही. माननीय मंत्री महोदयांनी छातीठोकपणे सांगावे की, आम्ही अधिकाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता देण्यासाठी अमुक इतके पैसे दिले आहेत. मात्र येथील अधिकारी त्याला कुठेतरी काट लावतात. मग तेथील अधिकारी कसा काम करणार आहे ? तेथे हा अधिकारी कोणत्या स्पिरिटने काम करणार आहे ? तेथे त्याला कोणते इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करुन दिलेले आहे ? शेवटी तेथे राहणारा अधिकारी देखील माणूसच आहे. त्याला देखील इन्फ्रास्ट्रक्चर लागते. तो काय विचार करतो ? तर माझी बायको-मुले या जंगलामध्ये कशी राहणार? माझी मुले कुठे शिकणार आहेत ? माझी मुले आय.ए.एस.कशी होणार ? सभापती महोदय, हा सिस्टीमचा दोष आहे. नक्षलवाद हा क्रिएटेड आहे आणि तो या राज्यकर्त्यांनी तयार केलेला आहे, मग ते कोणाचेही राज्य असो. जर तुम्हाला हा नक्षलवाद मोडून काढावयाचा असेल तर तुम्हाला लोकांशी सुसंवाद साधला पाहिजे. तेथील आदिवासी जनतेशी सुसंवाद साधला पाहिजे. पोलिसांनी दोन पावले मागे यावयास पाहिजे. आपल्याकडील दंडुका खाली ठेऊन येथील जनतेशी प्रेमाने बोलावयास शिकले पाहिजे. असे झाले तरच नक्षलवाद नाहीसा होईल आणि मगच तेथील लोकांना आपल्या आयुष्याबाबत सुरक्षितता वाटेल. या भागातील आदिवासी नक्षलवाद्यांना का मदत करतात ? त्यांना धान्य का देतात ? त्यांना का माहिती देतात ? कारण त्यांना असे वाटते की, पोलिसांपेक्षा हे लोक बरे आहेत, आम्हाला यांच्याकडून जास्त सिक्युरिटी आहे. तेव्हा या बाबींचा आपण काठीने विचार करण्यापेक्षा मेंदूने विचार करणे, ह्दयापासून विचार करणे अत्यंत आवश्यक आहे तरच या नक्षलवाद्यांच्या प्रश्नाबाबत उत्तर मिळेल, एवढेच मला सांगावयाचे आहे. जय हिंद जय महाराष्ट्र.

----

. . . .2 झेड-2

01-06-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) ZZ-2

APR/MMP/SBT 18:00

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेबांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्याला अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे. मी फक्त दोन मिनिटेच बोलणार आहे.

सभापती महोदय, पहिली गोष्ट अशी की, या भागामध्ये भू-सुरुंगाचे स्फोट होऊन अधिकारी मरतात. जुन्या जमान्यामध्ये जेव्हा गाडी नव्हती, टेलिफोनची सोय नव्हती, लाईट नव्हता, तेव्हा सैन्य घोडयावरुन जात असे. त्या काळामध्ये, त्यावेळच्या राजांनी भू-सुरुंग शोधण्यासाठी एक पध्दत शोधून काढली होती. ही पध्दत म्हणजे घोडदळ जाण्यापूर्वी त्या रस्त्यावरुन डुकरांना पाठविले जात असे. जर भू-सुरुंग पेरलेला असेल, तर डुकराच्या नखांनी त्यांचा स्फोट होऊन डुकरे मरत असत आणि मग सैन्याला काही इजा होत नसे.

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

मी याबाबतीत जे काही ऐकलेले आहे, ते सांगत आहे. त्या काळामध्ये . . . .

(सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी खाली बसून बोलतात.)

अहो, जाऊ द्या, मला भाषण करण्यासाठी 2 मिनिटांचा अवधी मिळालेला आहे. त्यामुळे कृपा करुन मला भाषण करु द्यावे. म्हणजे ज्या काळामध्ये प्रगत विज्ञान उपलब्ध नव्हते, तेव्हा भू-सुरुंग ओळखण्याची अशा प्रकारची पध्दत होती. आता तर यासंदर्भात काहीतरी विचार करण्याची आवश्यकता आहे. कारण भू-सुरुंगामुळेच जास्त अधिकारी मृत्युमुखी पडतात. याठिकाणी आदरणीय श्री.नितीन गडकरीसाहेबांनी सांगितले की, या शासनाला ते कळत नसेल काय ? पण आदरणीय श्री.नितीन गडकरीसाहेब, या सरकारला कळते, पण वळत नाही. याचे कारण असे आहे की, माझ्या हातामध्ये केंद्र शासनाचा मसुदा आहे. जर हा मसुदा वाचला तर आपण सुध्दा फिके पडू, एवढे यामध्ये चांगल्या प्रकारचे शब्दांकन केलेले आहे. पण या गोष्टी कृतीमध्ये येत नाही ही सर्वात महत्वाची गोष्ट आहे. थूक चाटले तर भूक जात नाही. तसे माननीय श्री.अरुण गुजराथीसाहेब, या आदिवासी भागामध्येच हे सगळे होत आहे आणि ते कशामुळे होत आहे ? तर तेथे कुपोषण आहे, तेथे दारिद्र्य आहे, तेथे लोकांच्या अंगावर कपडे नाहीत, तेथे मीठ नाही म्हणून मुंग्या ठेचून खातात. तेव्हा या सगळया गोष्टींचे मूळ कशामध्ये आहे? तर ते दारिद्र्यामध्ये आहे.अशा वेळी जर तेथील दारिद्र्य हटविले नाही,तर त्याठिकाणी इतर काहीही केले तरी उपयोग होणार नाही. म्हणून तेथील दारिद्र्य नाहीसे करावे लागणार आहे आणि तेथील दारिद्र्य नाहीसे करावयाचे असेल तर

. . . .2 झेड-3



श्री.पाशा पटेल . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सगळयात महत्वाची गोष्ट म्हणजे ज्या भूमीमध्ये हे लोक आहेत, त्यांचा जो व्यवसाय आहे, तो फायद्यामध्ये आणल्याशिवाय, तेथे नक्षलवादाला मिळालेला लोकाश्रय थांबणार नाही. म्हणून येथे आपण कितीही चर्चा केली आणि त्या भागातील दारिद्र्य नाहीसे केले नाही तर याचा काही उपयोग होणार नाही. त्या भागासाठी पॅकेज देण्यामध्ये काही मतलब नाही. शेवटी ते लोक धानाची शेती करीत असतील किंवा मधमाशांचा व्यवसाय करीत असतील किंवा मोहाच्या फुलांचा व्यवसाय करीत असतील किंवा बांबूचे उत्पादन करीत असतील किंवा आणखी काही व्यवसाय करीत असतील, परंतु या लोकांना न्याय मिळाल्याशिवाय काही होणार नाही.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MAP/ प्रथम सौ. रणदिवे.... 18:05

श्री. पाशा पटेल....

सभापती महोदय, मी याठिकाणी फक्त दोन-तीन मुद्दे मांडणार आहे. केंद्र सरकारचे म्हणणे असे आहे की, ग्रामीण आणि शहरी भागात पडलेले मोठे अंतर ही आजच्या काळातील फार मोठी समस्या आहे. मागसलेपणा हा देखील एक महत्वाचा प्रश्न आहे. आता राज्यातंर्गत विकासाचा असमतोलाचा मुद्दाही आता गंभीर बनला आहे. मी सन्माननीय सदस्य श्री. गुजराथी साहेबांना केंद्र सरकारच्या अकराव्या पंचवार्षिक योजनेमधील केंद्र सरकारचे जे म्हणणे आहे ते सांगू इच्छितो. तसेच माननीय गृहमंत्र्यांनी सुध्दा ते ऐकावे अशी विनंती करतो. त्यानंतर मी माझे भाषण पूर्ण करणार आहे. अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की, "अन्याय आणि नैराशातून केवळ अतिरेकाचा जन्म होतो. देशातील शंभरहून अधिक जिल्हयात झालेल्या नक्षलवादाच्या प्रसाराने धोक्याचा इशारा दिलेला आहे. काही भागात जातीय संघर्षाच्या माध्यमातून जनतेचा असंतोष बाहेर पडत आहे. या सर्व असंतोषामागे सुयोग्य प्रशासन देण्यात आणि बहुतांश लोकांपर्यंत विकासाचे लाभ पोहचविण्यात शासन यंत्रणेला आलेले अपयश कारणीभूत आहे." गेल्या 60 वर्षात केंद्र सरकार कोणाचे आहे हे सन्माननीय सदस्य श्री. गुजराथी साहेबांना माहीत आहे. आता तुम्ही वेगळे झाला आहात त्याला आमची हरकत नाही. पण आता पर्यंत तुमचे एकच सरकार होते. म्हणजे आपली सगळयांची पुण्याई कारणीभूत लागलेली आहे. आणि म्हणून आपल्याला सगळयांना हे भोगावे लागलेले आहे. त्यासाठी हे येथेच थांबविणे गरजेचे आहे. पण त्याठिकाणचा विकास झाल्या शिवाय हे थांबणे शक्य नाही. पाचशे कोटी रुपयांच्या पॅकेजबद्दल माननीय गृह मंत्र्यांनी सांगितले आहे. नक्षलवादी चळवळीचे हल्ले थांबवावयाचे असतील तर त्या ठिकाणच्या विकासाठी मोठी रक्कम द्यावी लागणार आहे. आणि त्याठिकाणी ते त्यांच्या पध्दतीने कसे जगतील याचा विचार करावा लागणार आहे. तरच हा प्रश्न सुटू शकेल. अन्यथा हा प्रश्न सुटण्याची सुतराम शक्यता नाही, एवढेच मला याठिकाणी सांगावयाचे. धन्यवाद.

----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, शिवसेनेचे नेते आदरणीय आमदार श्री. दिवाकरजी रावते यानी नक्षलवाद्यांच्या हल्ल्यांच्या संदर्भात या सदनामध्ये जी चर्चा उपस्थित केली आहे त्यासंदर्भात माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. कारण या बाबतचे अनेक मुद्दे या ठिकाणी मांडण्यात आलेले आहेत. त्यामुळे या विषयावर मी फार कमी बोलणार आहे.

सभापती महोदय, मी हेमलकशाला दोन ते तीन वेळा गेलो होतो. त्यावेळी त्याठिकाणी रात्रभर राहिलो. त्याठिकाणी नदीच्या तीरावरच शासकीय विश्रामगृह आहे. माझ्या सोबत दोन-तीन पत्रकार होते. रात्रभर सतत ते मला सांगत होते की, आपल्यावर समोरुन वॉच आहे. त्यावेळी मी त्यांना असे सांगितले की, आपण पाप केलेले आहे काय? मग घाबरायचे कशाला? दुसऱ्या दिवशी आम्ही बाबा आमटेंना भेटलो. बाबा अमटेंना दोन वेळा भेटण्याचा मला योग आला. त्यांच्याबरोबर आदिवासींच्या अनेक वेगळया समस्यांची चर्चा करीत असतांना आम्ही नक्षवाद्यांच्या संदर्भात देखील चर्चा केली. आता सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल या ठिकाणी बोलत असताना त्यांनी शेवटचे वाक्य असे सांगितले की, दारिद्रय आणि नैराश्यातून आतंकवादाचा जन्म होतो. तीच वस्तुस्थिती आहे असे माझ्या लक्षात आले होते. बाबा आमटे त्या ठिकाणी रहावयाला गेले त्यावेळी तेथील आदिवासी लोक त्यांच्या जवळ सुध्दा येत नव्हते. आज श्री. प्रकाश आमटे आणि श्रीमती मंदा ताई हे दोघेही डॉक्टर आहेत. त्यांनी त्याठिकाणच्या लोकांवर अनेक शस्त्रक्रिया केलेल्या आहेत.. लोकांपुढे दुसरा काही पर्यायही नव्हता. पण त्यांनी लोकांमध्ये एक विश्वास निर्माण केला की, आपल्या आरोग्याची जपणूक ते करु शकतात. हा विशवास निर्माण केल्यानंतर आदिवासी त्यांच्याकडे यायला लागले. माडीया नावाची एक आदिवासी जमात आहे. त्यांची एक वेगळी भाषा आहे. महाराष्ट्राची मराठी भाषा त्यांना येत नाही हे सुध्दा या सरकारला अद्याप माहीत नसेल. मुळात त्यांची भाषा वेगळी आहे. म्हणून यासंदर्भात विचार करीत असतांना त्यांच्या भाषेत बोलले पाहिजे. भाषा संवाद साधण्याचे एक साधन आहे, ती दोन माणसांना जवळ आणू शकते. मला या गोष्टीचे अत्यंत दुःख वाटते की, श्री. अशोक अय्यर सारखा तडफदार माणूस तसेच आमच्या पाच पोलीस भगिनी त्या हल्यात मृत्यूमुखी पडल्या आहेत. याठिकाणी यासंदर्भातील आकडेवारी इतर वक्त्यांनी सांगितलेली असल्यामुळे मी त्या आकडेवारीत जात नाही.

....3..





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत. . .

याचे समूळ नष्ट करण्याचे दोन प्रकार याठिकाणी सांगण्यात आले आहेत. माननीय गृहमंत्र्यांनी पाचशे कोटीच्या पॅकेजचा विचार केला आहे. माझी याठिकाणी अशी सूचना आहे की, त्या ठिकाणी सॅटलाईट्ची व्यवस्था करण्यात यावी. हेलिकॉप्टरचा वगैरे विचार करण्यात यावा पण पहिल्यांदा सॅटलाईट्ची व्यवस्था झाली पाहिजे. इंटरनेटच्या गुगल यंत्रणेवर जसे आपल्याला सगळे दिसते पण चलत चित्र दिसत नाहीत. त्याला बंदी आहे म्हणून दिसत नाहीत अन्यथा तेही दिसले असते. म्हणून निदान तेवढया पट्टयाच्या बाबतीत आंतरराष्ट्रीय पातळीवर पवानगी घेण्यात यावी. एक मुद्दा असा आहे की, हे ठिकाण पूर्व सीमेवर आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

अगदी वर मिझोरामपासून खाली भारताच्या पूर्व सीमेवर या सगळ्या नक्षलवाद्यांचा अंमल आहे. एका बाजूला चायना, नेपाळ आहे तर दुसऱ्या बाजूला समुद्र आहे. या बाजूने त्यांना शस्त्रास्त्रे कशी मिळतात ? म्हणून यासाठी सटेलाईटची यंत्रणा निव्वळ राज्य सरकार करु शकणार नाही. याबाबतत केंद्र सरकारची मदत घेऊनच, दोन्ही खात्याचे लोक एकत्र येऊनच योजना आखली तर निदान त्यांच्या हालचाली आपल्याला पाहता येतील. आज ते पाहिले जात नाही म्हणून आपण पहिला मार त्या ठिकाणी खातो की, नक्की काय घडले हे समजत नाही. मग एखाद्या भावनेपोटी एखादे झाड आडवे पडले म्हणून श्री. अशोक अय्यर धडकन धावत गेले. कोणी तरी असे केले असेल याबद्दल त्यांच्या मनामध्ये संशय सुध्दा आला नाही. सगळ्यात महत्वाची गोष्ट अशी आहे की, पोलीस खात्यातील एवढ्या मोठ्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मनामध्ये संशयाची पाल सुध्दा चुकचुकली नाही की, अशा प्रकारे काही भूसुरुंग टाकले असतील आणि आपल्यावर हल्ला होईल. कारण त्यांच्या सगळ्या मूव्हमेंट्स कळत नाहीत. म्हणून त्या भाषेत बोलणारे, त्यांच्याशी प्रेमाने वागणारे, अनेकदा पोलीस खात्यातील लोक वेष बदलून बूटपॉलीश करत रस्त्यावर राहतात आणि गुन्हेगाराला पकडत असतात. तसाच थोडासा प्रकार वेगळ्या पध्दतीने करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. हेलिकॉप्टर्सची बाब आहे. जसे श्रीलंकेमध्ये एलटीटीईला पूर्णपणे उखडून काढले त्याच पध्दतीने या चळवळीला उखडून काढण्याची गरज आहे. चारु मुझुमदार यांनी जी चळवळ सुरु केली ती योग्य की अयोग्य हा वेगळा विषय आहे. तो भाकरीचा लढा होता. त्याला आता वेगळे वळण लागलेले आहे. आता त्यांच्यापासून भय अशी उलट परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यांनी समाजाला निर्भय करण्यासाठी, न्याय देण्यासाठी चळवळ उभी केली पण आता त्यांच्यापासून भय निर्माण झालेले आहे अशी ही चळवळ उभी राहिली. शस्त्रास्त्रे पळवून घेऊन गेले. त्यांना शस्त्रास्त्रे कोठून मिळतात ? ही साधी गोष्ट आहे काय ?

सभापती महोदय, मी हेमलकशावरुन गडचिरोलीमध्ये एका नदीच्या तीरावर एक मंदिर आहे त्या ठिकाणी गेलो. समोर नदीच्या पलीकडे आंध्र प्रदेश आहे. त्यांनी सांगितले की, रात्री या नदीच्या पलीकडून सगळे नक्षलवादी येतात, हल्ले करतात आणि हल्ले करुन झाले की, सकाळी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. अरविंद सावंत .....

निघून जातात. नदीचा तीर पार केल्यानंतर आंध्र प्रदेशची सीमा लागते. आपल्या पोलिसांचे आंध्र प्रदेशात जाणे शक्य होत नाही, कारण तो भाग त्यांच्या अखत्यारित येत नाही. हल्ले करुन ते आंध्र प्रदेशात निघून गेले. आम्ही मुंबईत राहून हे जे सांगतो ते काही नवीन आहे काय ? हे आपल्याला माहीत नाही काय ? सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. नितीन राऊत हे तळागाळात जाऊन काम करणारे आहेत. मी सांगेन की, बाबा आमटे आता हयात नाहीत पण डॉ. प्रकाश आमटे, डॉ. विकास आमटे यांच्यासारख्या माणसांचे सुध्दा सहकार्य घ्यावे. त्यांच्याबद्दल समाजामध्ये प्रतिष्ठा आणि विश्वास आहे. या चळवळीला जे सामाजिक स्वरुप सन्माननीय सदस्य श्री. गुजराथी यांना मान्य आहे त्याला अशा मंडळींचे सहकार्य मिळाले तर ही चळवळ आपल्याला आस्तेआस्ते पोखरता येईल्. म्हणून यादृष्टीने आपण प्रयत्न करावा. पॅकेज आणि बाकीच्या ज्या गोष्टी करावयाच्या आहेत त्या आपण कराव्यात. पण मला असे वाटते की, हेलिकॉप्टर आणि सॅटेलाईटच्या बाबतीत तसेच नैराश्य दूर करण्यासाठी त्यांच्या भाषेत बोलून त्यांच्यासाठी उद्योग कसा निर्माण करता येईल आणि त्यांची आर्थिक परिस्थिती कशी बदलता येईल, आरोग्याच्या सुविधा कशा पोहोचविता येतील याचा आपण विचार करावा. आपण ती चळवळ ताबडतोब उखडू असे मला वाटत नाही कारण ती चळवळ केवळ महाराष्ट्राच्या सीमेपुरती मर्यादित नाही. ती चळवळ सबंध पूर्व भागात आहे. म्हणून हा देशाचा सुध्दा प्रश्न आहे. आपण त्या कामी जाणीवपूर्वक लक्ष घालावे. वाईट एकच वाटते की, आमच्या पोलिसांचे बळी अशा पध्दतीने जात आहेत. एकच सांगतो की, मागच्या अधिवेशनात मी पोलिसांचे आठ कॉलममध्ये आलेले छायाचित्र दाखवले. त्यांना गणवेष नाही, बूट नाही. पोलीस हाफपॅन्टवर होते. कोणत्या तरी थ्री नॉट थ्री च्या जुन्या रायफली उलट्या घेऊन चालत असतानाचे छायाचित्र डिसेंबरच्या अधिवेशनात मी माननीय सभापतींकडे छायाचित्र दिले. आठ कॉलममध्ये आलेले ते छायाचित्र होते. त्याची आपण काय दखल घेतली ? त्यांचे सुध्दा हाल आपण पाहिले पाहिजेत. त्यांना आधुनिक शस्त्रास्त्रे पुरवावीत अशी विनंती करुन आपण मला बोलण्याची संधी दिली दिल्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

अॅड. उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या ठिकाणी अत्यंत चांगल्या विषयावर दोन अडीच तासापासून चर्चा चालू आहे. त्या सर्व मुद्यांशी सहमती दर्शवून मला काही बाबींना हात घालावयाचा आहे. या ठिकाणी मला आज गोदूताई परुळेकरांची आठवण येते. ठाणे जिल्ह्याच्या आदिवासी भागामध्ये त्यांनी आदिवासींना विश्वासात घेऊन काम उभे केले. 'जेव्हा माणूस जागा होतो' हे त्यांचे पुस्तक वाचले. गोदूताईच्या अनेक भेटी झाल्या पण त्यांच्या सहवासात फार कमी काम करण्याची संधी मला मिळाली पण 'जेव्हा माणूस जागा होतो' हे पुस्तक जर वाचले तर आदिवासी माणूस सुध्दा जागा होऊ शकतो, तोही माणूसच आहे. एकीकडे तो माणूस या देशाच्या विकास प्रक्रियेमध्ये सहभागी सुध्दा होऊ शकतो आणि नक्षलवादी म्हणून आपल्या समोर सुध्दा येऊ शकतो. ही दोन अंगे त्या आदिवासींची आहेत. आपण त्याला कसे बनवतो ही खरोखरच शासनाची आणि समाजाची जबाबदारी आहे. आज ज्या घटना घडल्या त्या ठिकाणी जे महिला आणि पुरुष पोलीस हुतात्मे झाले त्याची जबाबदारी फक्त सरकारवर टाकून चालणार नाही. ही एक सामाजिक जबाबदारी आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे....

मला सभागृहाला एक नम्रपणे विनंती करावयाची आहे की, प्रत्येक गोष्टीकडे नकारात्मक भूमिकेतून बघता येणार नाही. या सभागृहामध्ये बोलल्यानंतर त्याबाबतच्या बातम्या लोकांना समजतात. परंतु सभागृहात बोलत असताना सामान्य माणसांचे नीतीधैर्य खचणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. शेवटी नक्षलवादी सुध्दा माणसे आहेत. त्यांना विश्वासात घेऊन त्यांच्या या भूमिकेतून कसे बाहेर काढता येईल यादृष्टीकोनातून प्रयत्न केले पाहिजेत. त्या भागात डॉ.बाबा आमटे यांच्या कुटुंबियांचे योगदान फार मोठे आहे. मी हेमलकसा आणि सिरोंचा येथे जाऊन आलेली आहे. नागपूर येथील महिलांचा मेळावा संपवून रात्री 11 वाजता गडचिरोलीला निघाले होते त्यावेळी पोलिसांनी आम्हाला रात्रीच्या वेळी न जाण्याचा सल्ला दिला होता. परंतु पोलिसांनी नाही म्हटल्यावर काहीही करुन गेले पाहिजे अशा प्रकारचा माझा स्वभाव असल्यामुळे आम्ही सर्वजण रात्री 2 वाजता गडचिरोलीला पोहोचलो. पण त्यावेळी कोणताही दुर्धर प्रसंग आमच्यावर ओढवला नाही. त्या भागात एकवेळ जाताना आपण इतका विचार करतो. सालेकसा येथे पोहोचल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी हे मागाहून तेथे पोहोचले. पोलिसांनी नको म्हटल्यावरही मी तेथे गेले होते. मी स्वत: तेथे गेलो नाही तर मी भित्रा नेता आहे असे त्यांच्याबद्दल मला वाटेल म्हणून मला गेले पाहिजे या विचाराने त्या भागातील अडचणी माहीत असूनही ते तेथे आले. सामान्य कार्यकर्त्यांशी नेतृत्वाने कसे वागावे हे त्यांच्याकडून शिकण्यासारखे आहे. मला एकच बाब सांगावयाची आहे की, श्रीमती गोदाताई परुळेकर होऊ शकतात. डॉ.बंग, डॉ.आमटे यांचे कुटुंबिय होऊ शकतात तर आम्ही का नाही ? नक्षलवाद हा माओवाद आहे की, लेनिनवाद आहे की, मार्क्सवाद आहे ? यापेक्षा नक्षलवाद हा माणसांना देशाच्या विकास प्रक्रियेपासून दूर नेत आहे, प्रशासनाला हतबल करतो आहे. त्यामुळे त्या भागाच्या विकासाला खिळ बसत आहे. त्या माणसांमध्ये जाऊन विश्वास निर्माण करणे आणि विकास प्रक्रियेमध्ये त्यांना आणणे ही काळाची गरज आहे. पोलिसांचे आत्मबल खचणार नाही यासंबंधी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची भूमिका पोलिसांच्या पाठीमागे उभे राहण्याची असावयास पाहिजे. त्या भागातील लोकांच्या पाठीमागे उभी राहणे ही काळाची गरज आहे. त्या भागाच्या विकासाच्या दृष्टीने आलेल्या सर्व सूचना व पॅकेजच्या संबंधातील सूचना स्वागतार्ह आहेत.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे....

त्या ठिकाणचा कामगार, शेतकरी, आदिवासी, महिला यांच्यासह त्या भागाचा विकास म्हणजेच हे जे नक्षलवादाचे जे दुखणे आहे ते काढून टाकण्याची ती चावी आहे या मताशी मीही सहमत आहे. तेव्हा याठिकाणी जी काही चर्चा झालेली आहे त्याच्यातून काही तरी सकारात्मक निष्पन्न होईल आणि नक्षलग्रस्त भागातील लोकांना विकास प्रक्रियेमध्ये सामावून घेतले जाईल असा मी आशावाद प्रकट करते आणि सन्माननीय सभापती महोदयांना मला दोन मिनिटे बोलण्याची शेवटच्या क्षणी मी विनंती केल्यावर त्यांनी मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी त्यांचे आभार मानून माझे दोन शब्द संपविते.

--------

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन राऊत ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य व शिवसेना पक्षाचे नेते श्री.दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी गडचिरोली जिल्हयातील एका महत्वाच्या व ज्वलंत प्रश्नासंबंधी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 97 अन्वये चर्चा उपस्थित केली आहे. या चर्चेला उत्तर देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या चर्चेमध्ये एकूण 10 सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. मी आपल्याला सांगू इच्छितो की, नक्षलवाद्यांनी त्या भागात बंदचे आवाहन केले होते. परंतु दि.21.5.2009 रोजी गडचिरोली जिल्हयातील धानोरा पोलीस स्टेशन अंतर्गत हत्तीगोटा पहाडीजवळ पोलीस आणि नक्षलवादी यांच्यातील चकमकीत 16 अधिकारी व कर्मचारी शहीद झाले. यासंदर्भात मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर सभागृहात मते व्यक्त करण्यात आली आहेत. भारतीय कम्युनिस्ट पार्टीच्या माओवादी ग्रुपच्यावतीने सदर बंद पुकारण्यात आला होता. दिनांक 15.5.2009 ते दि.21.5.2009 पर्यंत हा बंद होता. दिनांक 20 मे पर्यंत काहीही झालेले नव्हते, परंतु दिनांक 21 मे, 2009 रोजी त्याठिकाणी ही घटना घडली आहे. कारागृहातील 8 नक्षल नेत्यांना मुक्त करावे, नक्षलच्या नावाने अटक केलेल्या सदस्यांना राजकीय कैद्यांची मान्यता द्यावी. कारागृहातील नक्षल सदस्यांवरील अत्याचार बंद करावेत. यासाठी हा देशव्यापी निषेध सप्ताह त्या लोकांनी आयोजित केलेला होता. या घटनेनंतर उपविभाग धानोरा अंतर्गत, पोलीस स्टेशन, धानोरा, धानोरा ते गडचिरोली मुरुमगाव मार्गे छत्तीसगढ राज्यात जाणा-या राजनांदगाव येथे राज्य मार्गावरील हत्तीगोटा पहाडीजवळ पोलिसांवर नक्षलवाद्यांनी धाड टाकली.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.बरवड 18:20

(श्री. नितीन राऊत...

पोलीस स्टेशन धानोरा पासून 17-18 कि.मी. पूर्वेस आणि गडचिरोली मुख्यालयापासून 50 ते 52 कि.मी. अंतरावर ॲम्ब्यूस पॉईण्ट होता. त्या पॉईण्टवर आमचे पोलीस मारले गेले. 2005 पासून 2009 पर्यन्त अशा प्रकारच्या अनेक घटना गडचिरोली जिल्ह्यामध्ये घडल्या. 2005 ते 2009 या काळात नक्षलवाद्यांनी पोलिसांवर 19 हल्ले केले, नागरिकांवर 108 हल्ले केले. त्यामध्ये 58 पोलिसांचे आणि 134 नागरिकांचे मृत्यू झाले. तसेच 41 नक्षलवाद्यांचे मृत्यू झाले. त्याठिकाणी सध्या 2360 इतके एसआरपी तैनात केलेले आहेत. आपण नक्षलवाद्यांचे 25 कॅम्प नष्ट केलेले आहेत.त्या ठिकाणी 41 वेळा संयुक्त कृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सभापती महोदय, नक्षलवाद्यांची पूर्वीची जी भूमिका होती त्या भूमिकेपासून ते दूर गेलेले आहेत. समाजातील आर्थिकदृष्टया धनदांडग्या आणि भांडवलवादी लोकांकडे संपत्तीचे केन्द्रीकरण झाल्यामुळे शोषितांना न्याय मिळत नव्हता आणि त्यामुळे आंदोलन उभे राहिले. अशा त-हेने लोकांची सहानुभूती मिळवित हा नक्षलवाद वाढीस लागला. आपल्या राज्याला लागून असलेल्या छत्तीसगड आणि आंध्रप्रदेशच्या सीमेवर गडचिरोली जिल्हा आहे. त्या जिल्ह्यामध्ये अतिशय घनदाट असे जंगल आहे. त्या जंगलामध्ये रस्ते नाहीत. ब-याच वेळा आमच्या पोलिसांना गन्स वगैरे घेऊन 25-25 कि.मी. पायी जावे लागते. अशा ठिकाणी आमचे पोलीस युनिट जात होते. पोलीस निरीक्षक श्री. अय्यर हे मौजे टवेटोला गाव पार करुन पुढे गेल्यानंतर नक्षलवाद्यांनी मागील बाजूने दोन झाडे पाडून तेथील रहदारी बंद केली. हत्तीगोटा पहाडीजवळ पोलिसांवर फायरिंग झाली. त्या ठिकाणच्या परिसराची पाहणी केल्यानंतर जवळ जवळ 80 ते 85 सशस्त्र नक्षलवाद्यांनी पोलिसांवर फायरिंग केल्याचे निदर्शनास येते. सदर पथक पोलीस स्टेशनहून ॲम्ब्युस पॉईण्टपर्यन्त जाण्यास 15.15 वा. रवाना झाले आणि 16.15 वा. वॉकीटॉकीवरुन कंट्रोल रुमला, आम्ही ॲम्ब्यूसमध्ये फसलो आहोत, फायरिंग सुरु झालेली आहे, आम्हाला मदत पार्टी पाहिजे, असे तुटक तुटक शब्द वॉकीटॉकीवरुन ऐकायला मिळाले. घटनास्थळापर्यन्त वाहन पोहोचण्याकरिता 30 ते 40 मिनिटांचा वेळ लागतो. जेव्हा पोलिसांचे दुसरे पथक मदतीला पोहोचले त्यावेळी त्या पथकाला देखील मध्ये झाडे पाडून अडविण्यात आले. गजामेंढी या भागामध्ये पोलीस पथक पोहोचले तेव्हा जवळपास 80 ते 85 नक्षलवाद्यांनी त्या पोलीस पथकाला घेरले आणि त्यांच्यावर फायरिंग केले. त्यामध्ये एक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.बरवड 18:20

(श्री. नितीन राऊत...

पोलीस निरीक्षक, एक पोलीस उपनिरीक्षक, 14 पोलीस जवान,ज्यामध्ये 5 महिला पोलीस होत्या, हे सर्वजण त्याठिकाणी शहीद झाले. अत्यंत दु:खद आणि दुर्दैवी अशी ही घटना आहे. त्या घटनेचे समर्थन जगाच्या पाठीवर कुणीही करु शकणार नाही. या नक्षलवाद्यांनी पाहिल्यांदाच महिलांना मारण्याचे पाप केले. सभापती महोदय, जी आदिवासी, गरीब पीडित, शोषित जनता आहे. तिच्यापर्यन्त विकास पोहोचत नाही. अजूनही त्यांच्या अंगावर वस्त्रे नाहीत, त्यांना धड जेवायला मिळत नाही. आजही त्याठिकाणी कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे तेथील आदिवासी महिला गरोदरपणामध्ये नऊ महिन्यापर्यन्त सतत काम करीत असते. त्यामुळे कुपोषित बाळ जन्माला येते. बाळंतपणानंतर लगेच दोन महिन्यांनी ती काम करु लागते. अशी एकूण त्या भागातील परिस्थिती आहे. अशा भागामध्ये आमच्या काम करणा-या महिलांना जेव्हा मारण्यात येते त्यावेळी एक बाब निश्चित होते की, आता ही नक्षलवादी चळवळ आपल्या मूळ विचारापासून दूर चालली आहे, ती भरकटली आहे. हे नक्षलवादी लोकांचे खून करायला, रक्त प्यायला निघालेले आहेत. त्यामुळे त्यांच्या गोळीला देखील गोळीनेच उत्तर दिले पाहिजे या मतापर्यन्त आम्ही येऊन पोहोचलो आहोत.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MAP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 18:25

श्री. नितीन राऊत....

पोलीस दलाकडे असेलेली शस्त्रात्रे एके-47, एसएलआर, वॉकी-टॉकी, एक जिप्सी गाडी, एक कमांडर गाडी मारहाण करुन नक्षलवाद्यांनी पळवून नेली. मी सांगू इच्छितो की, नक्षलवाद्यांनी आपल्या व्यूह रचनेत मोठया प्रमाणात बदल केलेला आहे. नक्षलवादी आता मोठया प्रमाणात नुकसान करीत आहेत. अशी वस्तुस्थिती असली तरी देखील पोलीस दलाचे मनोबल अजिबात खचलेले नाही. नक्षलवाद्यांच्या समाजविघातक कृत्यांचा मुकाबला सर्व स्तरावरुन झाला पाहिजे. तेथील पोलीस आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडीत आहेत. लोकांचा विश्वास संपादन करण्यासाठी मोठया प्रमाणात पोलीस दल काम करीत आहे. परंतु त्या भागाची भौगोलिक स्थिती ही नक्षलवाद्यांसाठी पोषक बनलेली आहे. अशा प्रकारच्या घटना घडविल्यानंतर नक्षलवादी छत्तीसगड राज्यात निघून जातात. सीमावर्ती भागात ते शिरतात. कसनपूर, झारावंडी, धानोरा-पिंढरी, व कोडगू-मेढगाव ही ठिकाणे नक्षलवाद्यांचे बालेकिल्ले झाले आहेत. ही ठिकाणे घनदाट अरण्याने वेढलेली आहेत. त्या ठिकाणी नक्षलवाद्यांचा नेहमी वावर असतो. या विभागात पोलीस दल अतिशय सक्षमपणे काम करीत आहे.

सभापती महोदय, नक्षलवाद्यांचा बिमोड करण्यासाठी अनेक उपायोजना केलेल्या आहेत. या कामी राज्य सरकारला केंद्र शासनाकडून वेळोवेळी मदत मिळते. दिनांक 1 फेब्रुवारी, 2009 रोजी 16 लोक मृत्यूमुखी पडले. त्यावेळी केंद्र सरकारने राज्य शासनास एक हेलीकॉप्टर उपलब्ध करुन दिले होते. बी.एस.पी.चा एक फोर्स त्यांनी उपलब्ध करुन दिला होता. त्यांच्या सांगण्यानुसार काम करण्यात आले होते. लोकसभेच्या निवडणुकांच्या दरम्यान सुध्दा एअर फोर्सचे एक हेलीकॉप्टर उपलब्ध करुन दिले होते आणि एक हेलीकॉप्टर राज्य शासनाने उपलब्ध करुन दिले होते. त्या हॅलीकॉप्टरच्या माध्यमातून नियंत्रण करण्याचे काम करण्यात आले होते आणि आता केंद्राकडे सी.आर.पी.एफ.च्या दोन बटालियन मागितलेल्या आहेत. ज्यांना जंगल वाक करता येते अशा ट्रेंड बटालियन्स मागितल्या आहेत. त्याचप्रमाणे अशा घटनांच्या ठिकाणी ॲन्टी इर्मजन्सी ऑपरेशन्ससाठी डॉक्टर उपलब्ध असले पाहिजेत त्यादृष्टीने देखील बटालियन्सची मागणी केंद्राकडे करण्यात आलेली आहे. राज्य शासनाची मागणी केंद्र शासनाने मान्य केलेली आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. मी असेही सांगू इच्छितो की, या विषयाच्या बाबतीत महाराष्ट्र, ओरिसा, छत्तीसगड, आंध्रप्रदेश या चार राज्याच्या गृह मंत्र्यांची आणि गृह सचिवांची बैठक सन्माननीय गृहमंत्री यांनी

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन राऊत.....

दिनांक 8.6.2009 रोजी सकाळी 11.00 वाजता सहयाद्री गेस्ट हाऊसवर बोलाविलेली आहे. नक्षलवाद्यांचा बिमोड करण्यासाठी कशा पध्दतीने कार्यक्रम राबविता येईल, नक्षलवाद कशा प्रकारे संपुष्ठात आणता येईल यावर त्या बैठकीत मोठया प्रमाणात भर देण्यात येणार आहे. त्या भागात आपल्याला विकासाची कामे सुध्दा करावयाची आहेत. विकासाची कामे करताना तेथील जनतेलाही सुरक्षितता द्यावी लागणार आहे. पूर्वी महाराष्ट्रात नक्षलवादी चळवळ मोठया प्रमाणात नव्हती, त्यामुळे केंद्र शासनाने 13 बटालियन छत्तीसगड राज्यास उपलब्ध करुन दिल्या आहेत. काही बटालियन ओरिसा राज्यास उपलब्ध करुन दिल्या आहेत. परंतु आता या राज्यासाठी केंद्राकडून काही बटालियन मागविण्यात येणार आहेत. गडचिरोली जिल्हयाचे जिल्हाधिकारी मला नुकतेच येऊन भेटून गेले. त्यांनी सांगितले की, प्लॅनिंग कमिशनचा एक अधिकारी या विभागाची पूर्णपणे पाहणी करुन गेलेला आहे. नक्षलवाद संपुष्ठात आणण्यासाठी केंद्र सरकारकडून एक पॅकेज तयार करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने 3 हजार कोटी रुपयांची योजना केंद्र सरकारकडे पाठविण्यात आली आहे अशीही माहिती त्यांनी मला दिली. त्यासंबंधीची कागदपत्रे सुध्दा केंद्र सरकारकडे पाठविण्यात आली आहेत. मी सांगू इच्छितो की, गडचिरोली जिल्हयात आमदार असताना ब-याच वेळा गेलो. मंत्री म्हणून देखील अनेक वेळा तेथे गेलो आहे. परंतु तेथील एकंदर परिस्थिती पाहता त्या विभागात अतिशय तीव्रतेने संरक्षणाचे काम करण्याची गरज आहे हे मी मान्य करतो. त्यासाठी सभागृहातील सर्व नेत्यांनी संघटीत होऊन एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे असे मला वाटते. या चर्चेच्या अनुषंगाने अनेक सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगले मुद्दे उपस्थित केलेले आहेत व त्याची मी नोंद देखील घेतलेली आहे. भारतीय जनता पक्षाचे नेते आणि या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य श्री. नितीन गडकरी आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या विषयाच्या अनुषंगाने मोठया प्रमाणात प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांनी आपल्या भावना देखील सभागृहात व्यक्त केल्या आहेत. मी या निमित्ताने एवढेच सांगू इच्छितो की, नक्षलवादी चळवळ थांबविण्यासाठी राज्य शासनाने एक ॲक्शन प्लॅन तयार केलेला आहे. एक शॉर्ट टर्म ॲक्शन प्लॅन आणि दुसरा लाँग टर्म ॲक्शन प्लॅन असे दोन प्लॅन शासनाने तयार केले आहेत. सन्माननीय

3..



ABG/ MAP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 18:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन राऊत...

सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपल्या भाषणात उल्लेख केला की, चंदन तस्कर श्री.विरप्पन यास अतिशय चांगली योजना करुन मारले, तशा प्रकारची योजना आपल्याकडे का राबविली जात नाही.

यानंतर श्री. भोगले...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन राऊत.......

तेथील परिस्थिती आणि याठिकाणची परिस्थिती वेगवेगळी आहे. परंतु या परिस्थितीचा पूर्णपणे अभ्यास करुन आता पोलीस यंत्रणा सजग व्हायला लागली आहे. इएनओ त्याठिकाणी काम करीत आहे, त्यांचे कार्यालय नागपूरमध्ये असले तरी युनिट गडचिरोली जिल्हयामध्ये काम करीत आहे. मुंबईमध्ये इएनओचे नियंत्रण कार्यालय आहे. त्या माध्यमातून ते युनिट काम करीत असते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी मनाची संवेदनशीलता पाहिली पाहिजे असे म्हटले आहे. हे सत्य आहे. संवेदनशील जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत प्रश्न सुटणार नाहीत. जे राज्य सरकारचे धोरण आहे त्या धोरणाची त्याठिकाणी पूर्णपणे अंमलबजावणी करण्यासाठी त्वरेने पावले उचलली पाहिजेत. राज्य सरकार नेहमी धोरणाचा पाठपुरावा करते. परंतु त्याचे लोण खालपर्यंत पोहोचले नाही हे आमचे दुर्भाग्य आहे. यानंतर हे लोण पोहोचेल यासाठी निश्चितपणे पावले उचलली जातील. इंटेलिजन्स योग्यप्रकारे काम करीत आहे. परंतु खबरे आहेत त्यांना मोठया प्रमाणात मारण्यात आले. या खबऱ्यांच्या कुटुंबांना न्याय मिळाला पाहिजे, त्यासाठी सुध्दा निश्चितपणे विचार केला जाईल. जिल्हयाचा विकास कृती कार्यक्रम मोठया प्रमाणात राबवित असताना आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त असा पोलीस फोर्स कसा निर्माण होऊ शकेल यादृष्टीने प्रयत्न करीत आहोत. मुंबईमध्ये 26/11 ला जो हल्ला झाला त्यासाठी फोर्स-1 तयार केला. त्याच धर्तीवर नक्षलवादी चळवळ समूळ नष्ट करण्यासाठी पोलिसांचे एक कृती दल तयार करण्यासाठी योजना आखण्यात आली आहे. त्यावर सध्या कार्यवाही सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी असेही सांगितले की, मोहफुलापासून इथेनॉल व आर.एस.निर्मितीचे प्रकल्प तयार करता येतील का हे पहावे. तेथील लोकांना रोजगार मिळण्यासाठी, त्यांचे उत्पन्न वाढण्यासाठी काय करता येणे शक्य आहे यासंबंधी वनविभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग योग्य ती कार्यवाही करीत आहे.

श्री.नितीन गडकरी : ते सगळे शक्य आहे. माझा प्लॅन्ट आहे. परंतु काही कारवाई होत नाही. आजच सकाळी सन्माननीय मंत्री श्री.गणेश नाईक यांनी सभागृहात उत्तर दिले की, सजेशन फॉर ॲक्शन.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन राऊत : राज्य उत्पादन शुल्क विभाग माझ्याकडे आहे. परंतु सन्माननीय श्री.गणेश नाईक हे ज्येष्ठ मंत्री उत्तर देत असल्यामुळे मी काही बोलू शकलो नाही. त्यांनी स्वत: वन विभागाच्या माध्यमातून राज्य सरकारकडे नोट पाठविली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, केंद्रीय नागरी उड्डयन राज्यमंत्री श्री.प्रफुल्ल पटेल यांच्याकडे त्या खात्याचा स्वतंत्र कार्यभार आहे. तसा राज्य उत्पादन शुल्क विभागाचा स्वतंत्र कार्यभार माननीय गृहराज्यमंत्री यांच्याकडे आहे का?

श्री.नितीन राऊत : नाही.

श्री.दिवाकर रावते : मग राज्याच्या राज्यमंत्र्यांना काही अधिकार नाही अशी आमची माहिती आहे. त्यामुळे तसे मंत्रीमहोदयांनी बोलू नये.

श्री.नितीन राऊत : धन्यवाद. सभापती महोदय, बल्लारपूर पेपर मिल, तेंदूपत्ता व्यापारी व सिमेंट उद्योगांकडून नक्षलवाद्यांना पाठिंबा मिळतो अशी माहिती देण्यात आली. त्यासंबंधी निश्चितपणे चौकशी करण्यात येईल. या भागात रोजगार, विकास आणि शिक्षणाच्या दृष्टीने निश्चितपणे योग्य ती पावले उचलली जाणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी आणि डॉ.नीलम गोऱ्हे यांनी महत्वाचे मुद्दे मांडले आहे. बुलेटप्रूफ जॅकेटचा उल्लेख केलेला आहे. आधुनिक फोर्स निर्माण करीत आहोत त्यावेळेला सगळी रिफॉर्मची कामे त्या माध्यमातून करु, यासाठी निश्चितपणे आपल्या सूचनांचा आदर करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांना मी सांगू इच्छितो की, गडचिरोली भागामध्ये दोन-दोन वर्षे, तीन-तीन वर्षे काम करणारे जे अधिकारी व कर्मचारी आहेत त्यांना पाहिजे तेथे बदली मिळत नाही. राज्य सरकारचे जे मूळ धोरण आहे त्या धोरणाचे पालन होईल यासाठी निश्चितपणे पावले उचलली जातील.

3जी.1......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन राऊत .......

सन्माननीय सदस्य सर्वश्री. अरुण गुजराथी, पाशा पटेल, अरविंद सावंत, श्रीमती उषा दराडे यांनी आपली मते व्यक्त करताना काही सूचना केल्या. त्यांचा विचार करुन गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी जो हल्ला केला त्यात शहीद झालेल्या जवानांना श्रध्दांजली अर्पण करतो आणि नक्षलवादी चळवळीचा बिमोड करण्याच्या दृष्टीने राज्यसरकार कटिबध्द राहील, अशी ग्वाही देऊन माझे भाषण पूर्ण करतो.

श्री. दिवाकर रावते : महोदय, माननीय मंत्री महोदयांना मी विनंती करुन इच्छितो की, या चर्चेला उत्तर देताना जे भाषण त्यांनी केले ते घरी गेल्यावर थोडेसे चिंतन करुन पाहिले तर त्यांच्या लक्षात येईल की, आपण काय बोललो ? कम्युनिस्ट आणि माओवाद्यांनी या भागात बंद पुकारला होता त्यातून ही घटना घडलेली आहे. माझी उत्तरातून अशी अपेक्षा होती की ज्यांच्यामुळे हा प्रकार घडला त्या कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्यांना शासनाने अटक करुन त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे काय ? यासंबंधी कुठलीच माहिती दिली नाही. एवढ्या मोठया प्रमाणात नक्षलवादी झुंडीने आले आणि अधिकृत रित्या जो राष्ट्रीय पक्ष आहे, रजिस्टर्ड पक्ष आहे त्या पक्षाच्या नेत्यांनी जर अशा प्रकारचा बंद पुकारला असेल तर त्यांच्याविरुध्द 120 (ब) खाली गुन्हा नोंदवून त्यांना तुरुंगात टाकणे बंधनकारक आहे. हा विषय अत्यंत गंभीर असून या हल्ल्यात जे 14 लोक शहीद झाले ते कशासाठी याचा मात्र खुलासा झालाच नाही. या लोकांनी एकही गोळी न झाडता सर्वचे सर्वच कसे मरण पावले, त्यांना चार-पाच नक्षलवादी सुध्दा टिपले नाहीत काय ?

श्री. नितीन राऊत : नक्षलवादी चळवळ आपल्याच राज्यात आहे अशातला भाग नाही. इतर बऱ्याच राज्यांमध्ये ही नक्षलवादी चळवळ कार्यरत आहे. तेथून त्यांचे आव्हान निघाले होते आणि त्या त्या राज्यांनी ती कारवाई केली. यात आमचे जे लोक मरण पावले त्यांनी गोळ्या का झाडल्या नाहीत याबाबत मी सांगू इच्छितो की, ज्यावेळेस एक कमांडर एका बाजूने गेला असता नक्षलवाद्यांनी मागील बाजूस झाडे पाडली होती आणि उजवीकडून फायरिंग करण्यात आली. दुसऱ्या बाजूने आपले दल गेले तर डावीकडे नक्षलवाद्यांची मोठी फळी होती. अशा परिस्थितीत नक्षलवाद्यांनी आपल्या गन सावरुन सर्वांनाच मारुन टाकले, आपल्या जवानांना प्रत्युत्तर देण्याची संधीच मिळाली नाही.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MAP/ KGS/

श्री. अरविंद सावंत : सर्वच पोलीस मरण पावले तर मग ही बातमी कोणी सांगितली ?

श्री. नितीन राऊत : ज्यावेळेस ही घटना घडली त्यावेळेस पोलिसांचे इंटेलिजन्सकडून अशी माहिती मिळाली त्या आधारावर मी सभागृहात माहिती देत आहे.

श्री. मधुकर चव्हाण : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी घटना स्थळाला भेट दिल्यानंतर त्यांच्याच उपस्थितीत श्री. पंकज गुप्ता या गृहस्थाने तीन गोष्टी सांगितल्या होत्या, त्याबाबत मंत्री महोदयांनी काहीच सांगितले नाही. त्याने अशी माहिती दिली की, नक्षलवाद्यांनी तोंड वर काढल्यास ठेचण्याची तयारी केलेली आहे. त्यांच्याकडे अत्याधुनिक शस्त्रे, 30 लोकांचे हेलिकॅप्टर अशी तयारी असून ही प्रवृत्ती ठेचून काढण्यासाठी शासन परिणामकारक उपाययोजना करणार आहे. तसेच यासाठी एक समिती अथवा अधिकारी नियुक्त करणार परंतु याबाबत काहीच सांगितले नाही.

श्री. नितीन राऊत : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, शासनाने नक्षलवादी भागासाठी जो ॲक्शन प्लॅन तयार केलेला आहे त्यावर वर्किंग सुरु असून त्यातलाच हा भाग आहे. माननीय मंत्री महोदय यासंबंधीची सविस्तर माहिती देतील.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील : माननीय राज्यमंत्र्यांनी माहिती दिली ती म्हणजे नक्षलग्रस्त एरियासाठी पोलीस दलाचे रिस्ट्रक्चरिंग करण्याच्या प्रस्तावावर शासन गांभीर्याने विचार करीत आहे.विशेषतः गडचिरोली जिल्हयाच्या लांबी आणि रुंदीचा विचार करता या एका जिल्हयाचे दोन जिल्हे समजून दोन एसपी देण्याचा प्रस्ताव आम्ही मान्य करीत आहोत. नागपूर रेंजचे रिस्ट्रक्चरींग करावयाचे आणि गडचिरोली जिल्हयाला दोन जिल्हे म्हणून ट्रिट करावयाचे. गडचिरोली व गोंदिया या दोन जिल्हयांना तीन जिल्हे मिळून एक क्षेत्र रेंज करावयाचे. हे करीत असतांना सिंगल कमांड आणि कंट्रोल असला पाहिजे हे सगळयात महत्वाची बाब आहे. अँटी नक्षल ऑपरेशनचे मुख्यालय आतापर्यंत नागपूरला होते ते आता गडचिरोली येथे शिफ्ट करण्याचे आम्ही ठरविले आहे. हे करीत असतांना आर्म आऊट पोस्ट वाढविण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे आता आपल्यावर जो अटॅक होतो तो काही 12-13 नक्षलींकडून होत नाही तर 150-200 नक्षलीकडून हा हल्ला होत असतो. त्यामुळे पोलिसांची रचना अधिक बळकट आणि टू दी पॉईट करण्यासाठी आम्ही बराच गृहपाठ केलेला आहे. सगळेच निर्णय या ठिकाणी जाहीर करणे योग्य होणार नाही असे मला वाटते. सभागृहाला मी मुद्दामहून सांगू इच्छितो की, नक्षलवादी चळवळीला आळा बसण्यासाठी त्यांच्यासाठी ज्या विरोधी उपाययोजना आहेत त्या अधिक धारदार आणि परफेक्ट करण्याचा प्रयत्न आम्ही केलेला आहे. या सगळयाचे रिस्ट्रक्चरींग करीत असतांना फिलींग ऑफ व्हेकन्सीज या ज्या प्रशासकीय बाबी आहेत त्यामध्ये देखील आम्ही बरेच लक्ष घातलेले आहे. बोलण्यापेक्षा परिणाम दिसला पाहिजे असे मानणारा मी आहे. गडचिरोलीमध्ये जी घटना झालेली आहे ती अतिशय दुर्दैवी आहे. टोटल कमांड होत असतांना ज्या सूचना असतात, ज्या ऑपरेटींग प्रोसिजर असतात त्याचे व्हायोलेशन होणे ही सगळयात सिरिअस बाब आहे. व्हायोलेशन्स न होता पोलिसांच्या सिस्टीम्स चालल्या पाहिजेत. नक्षलवाद्यांच्या संदर्भात माहिती मिळाल्यानंतर लागलीच त्या ठिकाणी पोहचणे हे शूर आणि धाडसी माणसाचे वैशिष्ट आहे याबाबत माझ्या मनात कोणतीही शंका नाही. परंतु त्याच बरोबरीने आपण नक्षलवाद्यांना किती संधी उपलब्ध करुन देतो याबाबत देखील विचार होण्याची आवश्यकता आहे. यामध्ये ऑपरेटींग प्रोसिजर कोणत्या असल्या पाहिजेत याबाबत ऑलरेडी वेळोवेळी काम झालेले

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील..

आहे व तशा सूचनाही दिलेल्या आहेत. पोलीस दल मजबूत झाले पाहिजे परंतु त्याच बरोबर लाँग रेंज पेट्रोलिंग आणि शॉर्ट रेंज पेट्रोलिंग यामध्ये कोणत्या सिस्टीम्स करावयाच्या यासाठी अनकन्व्हेशंनल ऑपरेशन्स ट्रेनिंग सेंटर जे नागपूरला आहे ते अधिक मजबूत करणे आणि नागपूरवरुन अनकन्व्हेंशनल वॉर, गोरीला वॉरच्या ट्रेनिंग अधिक मजबूत करणे आवश्यक आहे. या सगळया निर्णयाच्या बाबतीत मी सभागृहाला विश्वासात घेऊन सांगू इच्छितो की, याबाबतीत आम्ही जवळपास निर्णय केलेला आहे. अँटी नक्षल ऑपरेशन्सचे मुख्यालय गडचिरोली येथे शिफ्ट् केले जाईल. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणात खुलासा केला आहे की, आपल्या पोलिसांजवळ आधुनिक शस्त्रास्त्र नाहीत परंतु तशी वस्तुस्थिती नाही. आपल्या पोलिसांकडे सॅटेलाईट फोन्स सुध्दा आहेत.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.जयंत पाटील ....

त्याच प्रमाणें 40 डीप सर्च माईन डिटेक्टर्स पोलिसांकडे आहेत. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी असे विचारले की, पोलिसांकडे माईन प्रुफ व्हेईकल्स किती आहेत ? त्या बाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, पोलिसांकडे जवळजवळ 5 माईन प्रुफ व्हेईकल्स आहेत. मॉर्टर फेकण्यासाठी ज्या गन्स लागतात त्या गन्स पासून ते ए. के 47 पर्यत सगळया प्रकारच्या गन्स आणि योग्य ती यंत्रणा पोलिसांकडे आहे. ज्यावेळी या विषयाच्या संदर्भात चर्चा होते, त्यावेळी पोलिसांकडे चांगली व पुरेशी हत्यारे नाहीत अशा प्रकारचा उल्लेख केला जातो. परंतु मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या सगळया यंत्रणा काही प्रमाणात पोलिसांकडे आहेत. आजची जी परिस्थिती आहे, ती बघता ही यंत्रणा अधिक वाढविण्याची आवश्यकता आहे. ए.के. 47 असो, एस.एल.आर.असो, एल.एम.जी.असो, वा 303 गन असो, ही सगळी शस्त्रास्त्रे आपल्याकडे आहेत. त्या भागातील पोलिसांकडे 2000 पेक्षा जास्त एस.एल.आर. चे वाटप केलेले आहे. त्याच बरोबर ए.के. 47 सुध्दा तेथील पोलिसांकडे देण्यात आलेली आहेत. अशा प्रकारची शस्त्रास्त्रे आपल्याकडे असून या वर्षी या पेक्षा अधिक शस्त्रास्त्रे घेण्याचा प्रयत्न राज्य शासन करीत आहे. नक्षलवादी कारवाया ज्या पध्दतीने चालतात त्याला चांगल्या प्रकारे प्रत्युत्तर देण्याचा आपला प्रयत्न आहे. नाईट व्हिजन बायनाक्युलस आपल्याकडे काही प्रमाणात आहेत. हे प्रमाण आणखी वाढवावयास पाहिजे. त्या साठी एक कार्यक्रम हातामध्ये घेण्यात आला आहे. ही लढाई नक्षलवाद्यांशी आहे. नक्षलवादी चळवळीचे स्वरुप आता गेले असून, त्या भागात आता लढाईचे स्वरुप निर्माण झालेले आहे. श्रीलंकेमध्ये तेथील सैन्याने एल.टी.टी.ई. च्या विरोधी काम केले होते. काही दिवसापूर्वी श्रीलंकेतील सैन्याची आणि एल.टी.टी.ई.ची शेवटची लढाई झाली होती. परंतु आपल्याकडे नक्षलवादी जेथे हल्ले करतात तो देशातील अंतर्गत भाग आहे, त्यामुळे सैन्य दलाकडून आपल्याला प्रत्यक्षपणे मदत होऊ शकत नाही. त्यामुळे राज्याच्या पोलीस दलाला अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न केला जात आहे त्याचप्रमाणे केन्द्र सरकारकडून आय.आर.बी.च्या काही बटालियन्स आपण मागवत आहोत . ही बटालियन गडचिरोलीमध्ये स्टेशन करण्याचा निर्णय देखील राज्य शासनाने घेतला आहे. एस.आर.पी.एफ. ची एक बटालियन त्या भागात पाठविण्याच्या दृष्टीने सुध्दा राज्य शासन प्रयत्न करीत आहे. या संदर्भात जे काही प्रयत्न करावयाचे आहेत ते

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील ....

गांभीर्याने करण्यात येत आहेत. या संबंधी केवळ जास्त घोषणा किंवा जास्त भाषणे करण्या ऐवजी या सर्व यंत्रणा ग्राऊंड रिॲलीटीमध्ये आणण्याची गरज आहे व त्यासाठी ॲडमिनिस्ट्रेशनच्या बाजूने जवळपास निर्णय घेण्यात आहेत. त्याचबरोबर यामध्ये ज्या काही सुधारणा करावयाच्या आहेत त्या सुधारणा त्याभागातील लोकांच्या निश्चितपणे लक्षात येतील.

सभापती महोदय, सभागृहाला विश्वासात घेऊन मी सागू इच्छितो की, त्या ठिकाणी जी घटना घडलेली आहे, ती अत्यंत दुर्देवी आहे. अशी घटना घडत असतांना राज्याचे पोलीस खाते स्वस्थ बसणार नाही. पोलीस खात्यामध्ये ज्या काही यंत्रणा आहेत, त्या सर्व यंत्रणामध्ये रिस्ट्रक्चरिंग करण्यात येणार आहे व या घटनांना चोख् उत्तर देण्याचे काम राज्य शासनाकडून करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे् अशा प्रकारच्या घटना भविष्यात पुन्हा घडू नयेत म्हणून राज्यातील इंटेलीजन्स विभाग मजबूत करण्याच्या दृष्टीने, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी या ठिकाणी काही सूचना केल्या आहेत. त्या भागात पोलीस कधीही हाय हॅन्डेड वा हेवी हॅन्डेड नव्हते. तरी सुध्दा मी त्या भागात जेव्हा गेलो होतो, तेव्हा पोलीस दलातील काही
कर्मचा-यांनी मला प्रथम अशी माहिती दिली की, नक्षलवाद्यामध्ये आता माओवादी आहेत. विशेषत: नेपाळी लोक त्या ठिकाणी आता दिसू लागले आहेत. दोन्ही हल्याच्या वेळी हे लोक दिसून आल्याचे रिपोर्टींग मला करण्यात आलेले आहे. त्यामुळे अंतर्गत युध्द सदृश्य परिस्थिती नक्षलवाद्याकडून निर्माण केली जात आहे. याचा बिमोड करण्यासाठी अमुक करु, तमकु करु असे म्हणण्या पेक्षा त्यासबंधी नक्की रिझल्टस द्यावे लागतील,. त्यासाठी गोदिंया आणि गडचिरोली जिल्हयात रिस्ट्रक्चरिंग करण्यासाठी सरकार पावले उचलत आहे. या संदर्भात सभागृहाला विश्वासात घेतले जाईल. या बाबतीत राज्य शासनाने जे काही निर्णय घेतलेले आहेत, ते आपल्याला कळविण्यात येतील तसेच या उपाययोजना मोठया प्रमाणात जाहीर न करता, त्या ठिकाणी जास्त यंत्रणा उभी करण्याची आवश्यकता आहे एवढे मी आपल्याला सांगू इच्छितो. या ठिकाणी जी घटना घडलेली आहे.तिचा गांभीर्याने विचार करुन या पुढील काळामध्ये, पोलीस दल पूर्ण ताकदीने आणि पूर्ण क्षमतेने व अधिक शस्त्रास्त्रासह तेथे वावरेल एवढा विश्वास मी या निमित्ताने देतो आणि माझे भाषण संपवितो.

--------

..3...



VTG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.जुन्नरे 18.45

**तालिका सभापती** ( श्री.हेमंत टकले ) : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

सभागृहापुढील □म□ज आता संपलेले आहे. सभागृहाची बैठ□ आता स्थगि□ होऊ□ उद्या मंगळवार, दि□□ 2 जून, 2009 रोजी स□ळी 11.00 वाजता पु□ भरेल.

( सभागृहाची बैठ□ सायंकाळी 6 वाजू□ 49 मि□टां□, मंगळवार, दि□□ 2 जून रोजीच्या 2009च्या स□ळी 11.00 वाजेपर्य□ स्थगि□ झाली )

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही